कृषीवल
रायगड, मंगळवार, दि. १० डिसेंबर २०२४
किंमत ४ ₹

## जगदीप धनखड यांच्याविरोधात अविश्वास

**नवी दिल्ली :** संसदेच्या हिवाळी अधिवेशनात सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये दररोज खडाजंगी पाहायला मिळत आहे. दरम्यान, विरोधी इंडिया आघाडी राज्यसभेचे सभापती जगदीप धनखर यांना हटवण्यासाठी अविश्वास प्रस्ताव आणणार आहे. धनखर यांच्या विरोधात इंडिया आघाडी एकत्र आली असून, समाजवादी पक्ष आणि तृणमूल काँग्रेसदेखील अविश्वास प्रस्तावाच्या बाजूने असल्याचे सांगितले जात आहे. अविश्वास प्रस्ताव तयार असून, त्यावर ७० सदस्यांनी स्वाक्षरी केल्याचे सांगण्यात येत आहे.

## अखेर सतीश वाघ यांचा मृतदेह सापडला

**पुणे :** भाजप विधानपरिषदेचे आमदार योगेश टिळेकर यांचे मामा सतीश वाघ यांचे अपहरण करून खून करण्यात आला आहे. सतीश वाघ यांचे सोमवारी पहाटे अपहरण करण्यात आले होते. मॉर्निंग वॉकसाठी निघालेल्या वाघ यांना चौघांनी जबरदस्तीने एका गाडीत बसवले आणि अपहरण केले होते. हडपसर पोलीस ठाण्यात याप्रकरणी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. पुणे पोलीस आरोपींचा शोध घेत होते. मात्र, सायंकाळी यवत पोलीस ठाण्याच्या हद्दीत सतीश वाघ यांचा मृतदेह सापडला. या खुनाच्या घटनेने संपूर्ण पुणे शहर हादरून गेले आहे.

**आजचा अग्रलेख**
**संशय फिटायलाच हवा**

# शिष्यवृत्ती अडकली तिजोरीत

प्रमोद जाधव
**। अलिबाग ।**

**आर्थिक परिस्थितीमुळे अनुसूचित जातीमधील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यास अडथळे निर्माण होतात. परंतु, गेल्या तीन वर्षांपासून आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना केंद्राकडून शिष्यृत्तीच मिळालेली नाही. विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर त्याचा परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे दहा हजारांहून अधिक विद्यार्थी मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत.**



शैक्षणिक प्रगतीमधून सामाजिक विकास साधण्यासाठी अनुसूचित जाती, नवबौद्ध घटकांतील विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन उच्च शिक्षण, चांगले शिक्षण घेता यावे, यासाठी सरकारकडून शिष्यवृत्ती स्वरुपात अनुदान दिले जाते. केंद्र सरकारकडून ६० टक्के व राज्य सरकारकडून ४० टक्के, असा हा निधी वितरीत केला जातो. केंद्राकडून येणारा निधी विद्यार्थ्यांच्या खात्यात, तर राज्याकडून येणारा निधी महाविद्यालयाच्या खात्यात जमा केला जातो. महाविद्यालयात जमा झालेला निधी शालेय प्रवेश शुल्क आदींचा विचार करून विद्यार्थ्यांना महाविद्यालयात वितरीत करण्यात येतो.

रायगड जिल्ह्यातील अनुसूचित जातीमधील हजारो विद्यार्थी वेगवेगळ्या तालुका, जिल्हा व जिल्ह्याच्या बाहेर उच्च शिक्षण घेण्यासाठी जातात. २०२१ ते २०२४ या कालावधीत जिल्ह्यातील अनुसूचित जातीमधील १६ हजार ५८५ विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीसाठी अर्ज केला होता. त्यापैकी १५ हजार पान २ वर

### शिष्यवृत्तीची प्रक्रिया अशी चालते

विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीसाठी महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन अर्ज केल्यावर महाविद्यालयात त्याची ऑनलाईन माहिती उपलब्ध होते. त्याची पडताळणी महाविद्यालयातून झाल्यावर जिल्ह्यातील समाजकल्याण कार्यालयात मान्यतेसाठी पाठविले जाते. तेथून यादी मंजूर झाल्यावर अंतिम मान्यता व शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांच्या खात्यात देण्याची प्रक्रिया पुणे येथील समाजकल्याण कार्यालयाकडून केली जाते.

**केंद्राकडून शिष्यवृत्ती मिळण्यास दिरंगाई**

**तीन वर्षांपासून दहा हजार विद्यार्थी वंचित**

**सुमारे ४० कोटी रुपयांचा निधी शासनाकडे प्रलंबित**

### २२ डिसेंबरला शिष्यवृत्ती योजना परीक्षा

**पुणे : महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणेकडून राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना परीक्षा (एनएमएमएस) २२ डिसेंबरला आयोजित करण्यात आली आहे. महाराष्ट्रात एकूण ७४४ केंद्रांवर ही परीक्षा होणार आहे. परीक्षेसाठी महाराष्ट्रातून एकूण १३ हजार ४५७ शाळा व एकूण दोन लाख ४८ हजार ३१२ विद्यार्थ्यांची नोंदणी केलेली आहे. परीक्षेसाठी प्रविष्ट विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे परिषदेच्या www.mscpune.in व htttp://mscenmms.in या संकेतस्थळावर शाळांना शाळा लॉगिनवरून उपलब्ध करून दिली आहेत. प्रवेशपत्रे विद्यार्थ्यास उपलब्ध करून देण्याची जबाबदारी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांची असेल. शिष्यवृत्तीकडे ५१ हजार विद्यार्थ्यांची पाठ, तर ३१ हजारांहून अधिक विद्यार्थी देणार परीक्षा. प्रवेशपत्रामध्ये स्पेलिंग दुरुस्ती असल्यास कोणत्याही परिस्थितीत बदल होणार नाही तसेच जन्मतारीख, जात, आधारकार्ड इत्यादींमध्ये दुरुस्ती असल्यास त्यासाठी २१ डिसेंबर २०२४ पर्यंत संबंधित शाळेच्या शाळा लॉगिनमध्ये ऑनलाइन अर्ज उपलब्ध आहेत. ऑनलाइन अर्जाव्यतिरिक्त कोणत्याही पद्धतीने पाठविलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. दुरुस्त्या परीक्षेनंतर होणार आहेत, असे परीक्षा परिषद आयुक्त अनुराधा ओक यांनी निवेदनाद्वारे जाहीर केले आहे.**

## बुधवारी शेकापची आढावा बैठक

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

आगामी ग्रामपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शेकाप पदाधिकारी व कार्यकर्त्यांची आढावा बैठक बुधवारी (दि.११) सकाळी साडेदहा वाजता आयोजित केली आहे. अलिबागमधील शेतकरी भवन येथील सभागृहात ही बैठक पार पडणार आहे. विभागातील पदाधिकारी, प्रमुख कार्यकर्त्यांनी या बैठकीस उपस्थित राहण्याचे आवाहन शेकाप जिल्हा कार्यालयीन चिटणीस अजय झुंजारराव यांनी केले आहे. शेतकरी कामगार पक्षाच्या राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील, अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, जिल्हा कामगार आघाडी अध्यक्ष तथा माजी नगरसेवक प्रदीप नाईक, तालुका चिटणीस अनिल पाटील, माजी नगरसेवक ॲड. गौतम पाटील व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत ही बैठक होणार असल्याची माहिती झुंजारराव यांनी दिली.

**वे|ध|क**

## दिल्लीतील ४० शाळांना बॉम्बची धमकी

**नवी दिल्ली :** दिल्लीतील शाळा, विमानतळ, हॉटेल्स आणि इतर ठिकाणी बॉम्बने उडवण्याच्या धमक्या येण्याची मालिका संपण्याचे नावच घेत नाही. अशातच पुन्हा एकदा दिल्लीतील ४० शाळांना बॉम्बने उडवण्याची धमकी देण्यात आली आहे. सोमवारी (दि. ९) सकाळी सातच्या सुमारास एकूण ४० शाळांना धमकीचे मेल असून, यासंदर्भात पोलीस तपास करत आहेत. दिल्लीतील आरके पुरमच्या डीपीएस, पश्चिम विहारच्या जीडी गोएंका स्कूल, मदर मेरी स्कूलसह ४० शाळा व्यवस्थापनांना बॉम्बची धमकी देणारा ईमेल आला. अशा घटना थांबवण्यासाठी ३०,००० डॉलर्सची मागणी करण्यात आली आहे.

## विमानतळावर ड्रोन सापडल्याने खळबळ

**मुंबई :** विमानतळाच्या आत असलेल्या जुन्या एअर इंडिया हँगरच्या टॅक्सीवेजवळ ड्रोन सापडल्याने एकच खळबळ उडाली. विमानतळ परिसरात कोणत्याही प्रकारचा ड्रोन किंवा रिमोट कंट्रोल विमान उडवण्यास सक्त मनाई आहे. दरम्यान, ड्रोन सापडताच तात्काळ पोलिसांनी विमानतळ आणि आजूबाजूच्या रहिवासी परिसराची तपासणी केली. मात्र, ड्रोन ऑपरेटरचा छडा लागू शकला नाही. ड्रोन जप्त करून तपास करण्यास सुरुवात करण्यात आली आहे.

## ‘शंभू सीमा बंदच राहणार’

**नवी दिल्ली :** शेतकऱ्यांच्या आंदोलनामुळे बंद करण्यात आलेली शंभू सीमा खुली करण्याची मागणी करणारी जनहित याचिका सोमवारी सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली. केवळ लोकांना दाखवण्यासाठी आणि प्रसिद्धीसाठी याचिका दाखल केली जात आहे, अशी फटकारही न्यायालयाने लगावली. याप्रकरणीच्या आधीच चालू असलेल्या खटल्यात तुम्हाला हातभार लावायचा असेल तर तुमचे स्वागत आहे, असे न्यायालयाने याचिकाकर्त्यांना सांगितले. जालंधर येथील रहिवासी गौरव लुथरा यांनी ही याचिका दाखल केली होती. न्यायालयाने केंद्र सरकारसह हरियाणा आणि पंजाब सरकारला शेतकऱ्यांमुळे बंद केलेल्या शंभू सीमेसह सर्व राज्य-राष्ट्रीय महामार्ग वाहतुकीसाठी खुले करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी केली होती. परंतु, न्यायालयाने संबंधित याचिका फेटाळून लावली आहे.

# अपेक्षेप्रमाणे विश्वास!

## सरकारवर आवाजी मतदानाने विश्वासदर्शक ठराव मंजूर

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळावरचा विश्वासदर्शक ठराव सोमवारी (दि. ९) विधानसभेत आवाजी मतदानाने मंजूर झाला. विधिमंडळाच्या विशेष अधिवेशनाच्या अंतिम दिवशी सोमवारी (दि.९) दुपारी हा ठराव मांडण्यात आला. शिवसेनेचे आमदार उदय सामंत, भाजपाचे आमदार संजय कुटे, रवी राणा आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार दिलीप वळसे पाटील यांनी हा प्रस्ताव सादर केला.

प्रस्ताव विधानसभेत आवाजी मतदानानं मंजूर करण्यात आल्याचं विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी जाहीर केलं. दरम्यान, महायुतीकडे मोठ्या प्रमाणात आमदारांची संख्या असल्यामुळं सरकारचा विश्वासदर्शक ठराव आवाजी मतानं मंजूर झाला आहे.

राज्यपाल सी.पी. राधाकृष्ण यांच अभिभाषण विधिमंडळाच्या मध्यवर्ती सभागृहात झाले. यावेळी विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, विधान परिषदेच्या उसभापती नीलम गोऱ्हे यांच्यासह विधानसभा आणि विधान परिषदेचे आमदार उपस्थित होते. राज्यपालांनी आपल्या अभिभाषणात सरकारने केलेल्या विकासकामांची आणि योजनांची माहिती दिली. यावेळी सत्ताधारी आमदारांनी बाके वाजवून घोषणाबाजी केल्या.

राज्यपालांच्या अभिभाषणावरचा आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव भाजपा आमदार पराग अळवनी यांनी विधानसभेत मांडला. विधानसभेत दिवंगत उद्योगपती रतन नवल टाटा यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडण्यात आला. तसेच दिवंगत बाबा सिद्दीकी, मधुकर पिचड, सीताराम दळवी, रोहिदास पाटील आदी विधानसभा सदस्यांना सभागृहातर्फे श्रद्धांजली वाहण्यात आली.

### हिवाळी अधिवेशन १६ डिसेंबरपासून

**विधिमंडळाच्या विशेष अधिवेशनाचे कामकाज सोमवारी संस्थगित करण्यात आले. दरम्यान, विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन दि. १६ डिसेंबर रोजी नागपूर येथे होणार असल्याची घोषणा उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केली. दरम्यान, राष्ट्रगीताने अधिवेशन कामकाजाची सांगता करण्यात आली.**

- **राहुल नार्वेकर पुन्हा विधानसभा अध्यक्षपदी**
- **मंत्रिमंडळाचा विस्तार १३ डिसेंबरला होणार?**

## कोण होणार ‘होम मिनिस्टर’?

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

**तिढा सुटता सुटेना, महायुतीमध्ये धुसफूस**

देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री म्हणून तर एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. मात्र, या शपथविधी सोहळ्यावेळी या तिघांव्यतिरिक्त एकाही मंत्र्याने शपथ घेतली नाही. तसेच अद्याप खातेवाटप कधी होणार, मंत्रिमंडळ विस्तार कधी होणार, असे प्रश्न उपस्थितीत होत आहेत. त्यातच आता महाराष्ट्राचे गृहमंत्रीपद कोणाकडे जाणार, याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे. गेल्या काही दिवसांपासून महायुतीत गृहमंत्रीपदावरुन धुसफूस सुरु असल्याचे पाहायला मिळत आहे. विधानसभा निवडणुकीत महायुतीला बहुमत मिळाले. यात भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. पान २ वर

## संजय मल्होत्रा आरबीआयचे नवे गव्हर्नर

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरपदी संजय मल्होत्रा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. विद्यमान गव्हर्नर शक्तिकांत दास यांचा कार्यकाळ १० डिसेंबरला संपत आहे. मल्होत्रा ११ डिसेंबरपासून गव्हर्नरपदाचा कार्यभार स्वीकारतील. सध्याच्या घडीला ते महसूल सचिव म्हणून कार्यरत आहेत. मल्होत्रा यांचा कार्यकाळ ३ वर्षांचा असेल. २०२२ मध्ये डिपार्टमेंट ऑफ फायनान्शियल सर्व्हिसेसनं सचिव संजय मल्होत्रा यांना आरबीआयच्या संचालकपदी नेमलं होतं.



संजय मल्होत्रा आरबीआयचे २६ वे गव्हर्नर असतील. ते १९९० बॅचचे राजस्थान केडरचे आयएएस अधिकारी आहेत. नोव्हेंबर २०२० मध्ये ते आरईसीचे चेअरमन आणि एमडी झाले. त्याआधी त्यांनी ऊर्जा मंत्रालयात अतिरिक्त सचिव पदावर काम केलं आहे. संजय मल्होत्रा यांनी त्यांचं अभियांत्रिकीचं शिक्षण आयआयटी कानपूरमधून पूर्ण केलं. प्रिन्स्टन विद्यापीठातून त्यांनी पदव्युतर शिक्षण घेतलं. गेल्या ३० वर्षांत त्यांनी ऊर्जा, अर्थ, कर, माहिती-तंत्रज्ञान आणि खाण क्षेत्रात सेवा दिली आहे. सध्याच्या घडीला ते महसूल सचिव पदावर कार्यरत आहेत.

## नवीन एमआयडीसीसह नैनाला विरोध




**। पनवेल । वार्ताहर ।**

चिंध्रण गावात होणाऱ्या नवीन एमआयडीसी प्रकल्पाविरोधात तसेच नैना प्रकल्पाविरोधात चिंध्रण गावातील शेतकऱ्यांचा निषेध मोर्चा ग्रामस्थ आणि महिलांनी काढला होता.

एमआयडीसी क्षेत्रातील मोबदला न घेतलेल्या शेतकऱ्यांना योग्य भाव आणि पूर्ण मोबदला मिळत नाही तोपर्यंत एमआयडीसी क्षेत्रात कोणतेही जमिनीचे भराव तसेच रस्त्याचे काम करून देणार नाही, ही ठाम भूमिका शेतकऱ्यांनी घेतली होती. यावेळी मोर्चामध्ये अनिल ढवळे (मा. सरपंच शिवकर), स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष किरण कडू, ग्रामपंचायत सदस्य मनोज कुंभारकर, जीवन पाडेकर, संतोष देशेकर, सुरेश पाटील तसेच चिंध्रण गावातील ग्रामस्थ व स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ‘लाडकी बहीण’ची गरज संपली!

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

‘लाडकी बहीण’मुळेच पुन्हा सत्तेत आलो, असे भाजपा युतीचे नेते सांगत आहेत. पण, आता निवडणुका संपल्याने लाडक्या बहिणीची महायुतीला गरज राहिलेली नाही. लाडकी बहीणचा विषय आता संपला असून, आता अर्ज छाननीचा पुन्हा एकदा घाट घातला आहे. सरकारचा शपथविधी होताच दोन दिवसात एका ‘लाडक्या भावाला’ एक हजार कोटी रुपयांची संपत्ती परत मिळाली आहे. ही तर सुरुवात असून, ‘आगे आगे देखो होता है क्या?’ म्हणत महाराष्ट्रात सत्तेत आलेले भाजपा युतीचे सरकार हे ‘लाडक्या भावा’साठी काम करणारे सरकार आहे, अशी टीका नाना पटोले यांनी केली.

## आगीच्या भडक्यात तिघे गंभीर

**। नागोठणे । वार्ताहर ।**

घरगुती गॅस दुरुस्तीचे काम चालू असताना अचानक गॅस लिकेज होऊन लागलेल्या आगीचा भडका झाल्याने तिघेजण गंभीर जखमी झाले आहेत. तर, घरगुती सामानासह मंडप डेकोरेशनचे साहित्य या आगीत जळाल्याने सुमारे दोन लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. ही घटना नागोठण्यातील खडकआळी भागातील विलास विठू जोशी यांच्या राहत्या घरी रविवारी (दि.८) रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास घडली. या घटनेची खबर विशाखा विलास जोशी यांनी नागोठणे पोलिसांना दिली.

यासंदर्भात नागोठणे पोलीस ठाण्यातून उपलब्ध झालेल्या माहितीनुसार, खडकआळी येथील घरमालक विलास विठू जोशी यांच्या घरात गॅस दुरुस्तीचे काम करण्यासाठी योगेश ठमके हे आले होते. गॅस दुरुस्तीचे काम सुरू असतानाच अचानक आगीचा भडका उडाला. या आगीत घरमालक विलास विठू जोशी (४५) यांच्यासह दिनेश म्हाप्रळकर (१७) दोघेही रा. खडकआळी व योगेश गोपाळ ठमके (४८) रा. आंगरआळी हे तिघेजण जखमी झाले आहेत. या तिघांवर नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रात प्रथमोपचार करण्यात आले. त्यानंतर विलास व दिनेश यांना पुढील उपचारासाठी डॉ. कोकणे यांच्या हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. तर, पान २ वर



• (छायाचित्र : महेश पवार)

**पांढरा कांदा उत्पादक शेतकऱ्यांना मिळणार उभारी**

# कांद्याचे क्षेत्र गाठणार हजारी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबागचा पांढरा कांदा स्थानिकांसह पर्यटकांच्या पसंतीला कायमच उतरला आहे. अलिबागच्या कांद्याला जीआय मानांकन प्राप्त झाल्याने एक वेगळी ओळख अलिबागच्या पांढऱ्या कांद्याची निर्माण झाली आहे. तीनशे हेक्टर क्षेत्रात लागवड होणाऱ्या कांद्याच्या क्षेत्रात आता वाढ होण्याची शक्यता आहे. एक हजार हेक्टरपर्यंत क्षेत्र नेण्याचा निर्धार जिल्हा प्रशासनाने केला असून, त्यासाठी प्रशासन प्रयत्नशील राहणार आहे. यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांना उभारी मिळण्याची शक्यता आहे.

अलिबाग तालुक्यातील कार्ले, खंडाळे, वाडगाव, नेहुली आदी परिसरातील असंख्य शेतकरी पांढऱ्या कांद्याची लागवड करतात. दोन वर्षांपूर्वीच अलिबागच्या पांढऱ्या कांद्याला जीआय मानांकन मिळाले आहे. या कांद्याला रायगड जिल्ह्यासह वेगवेगळ्या राज्यांतून मागणी आहे. लाखोंची उलाढाल जानेवारी ते मे या कालावधीत होते. अलिबाग तालुक्यात पांढऱ्या कांद्याची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते. त्यानंतर रोहा तालुक्यातील एक ते दोन गावांमध्ये कांद्याची लागवड केली जाते. पांढऱ्या कांद्याचे क्षेत्र सध्या ३०० हेक्टर इतके आहे. मात्र, या क्षेत्रात अद्याप वाढ झालेली नाही. पान २ वर



### मागणीच्या तुलनेत उत्पादन कमी

**अलिबाग तालुक्यातही ठराविक गावीच पांढरा कांदा तयार होत असल्याने उत्पादन खूपच कमी आहे, तर औषधी गुणधर्मामुळे कित्येक पटीने जास्त मागणी आहे. तालुक्यात येणाऱ्या पर्यटकांकडून खरेदी केला जात असल्याने मोठ्या बाजारपेठांमध्ये पाठविण्यासाठी कांदा शिल्लकच राहात नाही. मागणीच्या तुलनेत उत्पादन कमी असल्याने ताळमेळ बसत आहे. त्यामुळे उत्पादनवाढीसाठी क्षेत्रवाढ होणे गरजेचे आहे.**

### बदलत्या हवामानाचा फटका

**पांढऱ्या कांद्याची शेती अद्याप पारंपरिक पद्धतीने केली जाते आहे, यात विशेष बदल झालेला नाही. कांदा पातीला येणाऱ्या बोंडामधून बी तयार केले जाते. बी काढल्यानंतर ते जपून ठेवावे लागते. हवामान बदलाचा या बियाण्यावर परिणाम होण्याची शक्यता असते. त्यामुळे ते वाया जाण्याची शक्यता अधिक असते. गतवर्षी अचानक आलेल्या पावसाने हे बियाणे वाया गेले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना बियाण्याचा तुटवडा जाणवत आहे.**

## मितेषच्या न्यायासाठी कँडल मार्च




**। गडब । वार्ताहर ।**

अलिबाग समुद्रकिनारी शनिवारी (दि. १) झालेल्या हत्याकांडात पेण तालुक्यातील गडब गावातील तरुण मितेष जनार्दन पाटील याची धारदार हत्याराने वार करून निर्घृणपणे हत्या करण्यात आली. या गुन्ह्यातील आरोपींना जास्तीत जास्त कठोर शिक्षा मिळावी व त्याच्या कुटुंबियांना न्याय मिळावा या मागणीकरिता तसेच प्रशासनाकडे घटनेचा जाहीर निषेध नोंदविण्यासाठी रविवारी (दि. ८) सायंकाळी शांततेच्या मार्गाने कँडल मार्चचे आयोजन केले होते. यामध्ये हजारोंच्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते. महिला व लहान मुलांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात होती.

या कँडल मार्चमध्ये जिल्हा परिषदेचे माजी सभापती संजय जांभळे, माजी जिल्हा पान २ वर

## स्पाच्या नावाखाली वेश्याव्यवसाय

**। पनवेल । वार्ताहर ।**

स्पा आणि मसाज पार्लरच्या नावाखाली वेश्याव्यवसाय चालविणाऱ्या खारघर, सेक्टर-८ मधील गुडविल गार्डन इमारतीमधील हॉट स्टोन वेलनेस स्पावर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने छापा मारुन कारवाई केली. दरम्यान, स्पा चालवणाऱ्या महिलेला ताब्यात घेतले आहे. या कारवाईत स्पामध्ये वेश्याव्यवसायासाठी ठेवण्यात आलेल्या तीन महिलांची सुटका केली आहे.

खारघर, सेक्टर-८ मधील गुडविल गार्डन इमारतीमधील हॉट स्टोन वेलनेस स्पामध्ये मसाज आणि स्पासाठी येणाऱ्या ग्राहकांना पान २ वर

# दैवज्ञ समाजोन्नती परिषदेचे अधिवेशन पुण्यात

## १९ ते २२ डिसेंबरपर्यंत भरगच्च कार्यक्रम, साहित्य संमेलनही होणार

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

अखिल भारतीय दैवज्ञ समाजोन्नती परिषदेचे राष्ट्रीय अधिवेशन १९ ते २२ डिसेंबरदरम्यान पुणे येथे होणार आहे. दैवज्ञ समाजोन्नती परिषदेचे अध्यक्ष व संमेलनाध्यक्ष डॉ. गजानन रत्नपारखी यांच्या मार्गदर्शनाखाली चार दिवस हा सोहळा होणार असून, श्री अष्टभुजा दुर्गादेवी इस्टेट ट्रस्ट संस्थेने त्याची जय्यत तयारी केली आहे.



देशभरातील असंख्य दैवज्ञ बांधव या अधिवेशनास उपस्थित राहणार आहेत. याचवेळी दहावे दैवज्ञ साहित्य संमेलनही पुण्यनगरीत रंगणार आहे.

दैवज्ञ समाजोन्नती परिषदेचे २१ वे राष्ट्रीय अधिवेशन व दहाव्या दैवज्ञ साहित्य संमेलनाचा भव्य सोहळा गुरूवारी १९ ते रविवारी २२ डिसेंबरपर्यंत पुण्यातील शुक्रवार पेठ येथील गणेश कला क्रीडा मैदानावर होणार आहे. गुरूवारी १९ डिसेंबर रोजी सायंकाळी ४ वाजता भव्य शोभायात्रा निघणार असून, शुक्रवारी २० डिसेंबर रोजी सकाळी ८.३० वाजता उद्घाटनाचा सोहळा होणार आहे. पद्माकरराव पांडुरंगपंत रत्नपारखी व स्व. सुमती रत्नपारखी नगरीत सकाळी १० वाजता केंद्रीय सहकार व नागरी वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या प्रमुख उपस्थितीत डॉ. गजानन रत्नपारखी व अजय कारेकर यांच्या हस्ते अधिवेशनाचे उद्घाटन होणार आहे. यावेळी दैसपचे उपाध्यक्ष डॉ. आनंद पेडणेकर, नाना शंकरशेठ प्रतिष्ठानचे अध्यक्ष, समाजश्रेष्ठी सुरेंद्र शंकरशेठ यांच्यासह डॉ. गजानन रत्नपारखी अध्यक्षीय भाषणात मार्गदर्शन करणार आहेत.

**परिसंवाद रंगणार**

शनिवारी सामाजिक कार्यात युवांची वानवा, ज्ञातीपत्रके व समाजप्रबोधन, कौटुंबिक जबाबदारी व महिलांचे सामाजिक योगदान, महिलांचा राजकारणातील सहभाग, वधू-वर मेळाव्यातील आजची वास्तविकता, कवीसंमेलन आदी परिसंवाद होणार आहेत. याचवेळी दुपारी दुपारी ३ वाजता दैवज्ञ साहित्य संमेलनाचे उद्घाटन साहित्य संमेलनाध्यक्ष कृष्णी वाळके यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी ज्येष्ठ अभिनेते राहुल सोलापुरकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

**साहित्य, नाट्य, ग्रंथ हंडी व कार्यकर्ता गौरव**

रविवारी २२ डिसेंबर रोजी संत साहित्य, प्रेरणादायी आत्मचरित्र, पत्रकारिता आणि साहित्य, नाट्य व साहित्य, ग्रंथ हंडी आदींवर मान्यवर लेखक, साहित्यिक मार्गदर्शन करणार आहेत. याचवेळी दैवज्ञ साहित्य मंच पदाधिकारी, यजमान संस्थेचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा गौरव करण्यात येणार असून, दुपारी तीन वाजता या चार दिवसीय अधिवेशनाचा समारोप होणार असल्याची माहिती स्वागताध्यक्ष विजय कारेकर व दैसपचे सरचिटणीस चंद्रशेखर दाभोळकर यांनी दिली.

# आज काळभैरव मंदिर जीर्णोद्धार सोहळा

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील किहीम-भंडारआळी येथे काळभैरव मंदिराचा जीर्णोध्दार सोहळा मंगळवारी (दि.१०) होणार आहे. यानिमित्त १३ डिसेंबरपर्यंत चार दिवस विविध धार्मिक कार्यक्रम होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

मंगळवारी (दि.१०) सकाळी आठ वाजता पुण्याहवाचन, देवता स्थापन, धान्य निवास, जलाधी निवास, हवन आदी धार्मिक विधी होणार आहेत. बुधवारी (दि. ११) डिसेंबरला सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास पुण्याहवाचन, देवता स्थापन, कलश अभिषेक, कलाशारोहण, देवता विवाह, धार्मिक विधी केली जाणार आहे. त्यानंतर सायंकाळी कामथ येथील श्री हनुमान प्रासादिक बालमित्र भजन मंडळ, श्रीकाळभैरव प्रासादिक भजन मंडळ श्री चामुंडा देवी भजन मंडळ, श्री वेताळेश्वर प्रासादिक भजन मंडळ, ब्राह्मण आळीमधील एकादशी भजन मंडळ यांचे भजन होणार आहे. गुरुवारी (दि.१२) रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास आवासमधील पाठक आळी येथील श्री सिध्देश्वर प्रासादिक भजन मंडळ, नगरमधील भक्ती संगीत प्रासादिक भजन मंडळाची भजने होणार आहेत. शुक्रवारी (दि.१३) रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास आनंद गंधर्व, आनंद भाटे, कल्याणी जोगळेकर यांचा आनंदगायनाचा कार्यक्रम होणार आहे.

# ध्वजदिनी निधी संकलन हे मोठे देशकार्य

**■ निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के**

**। अलिबाग । वार्ताहर ।**

देशाच्या सीमेचे रक्षण करण्यासाठी सैनिक कायम कार्यरत असतात. या सैनिकांच्या मदतीसाठी ध्वजदिन निधी संकलन करणे हे एक मोठे देशकार्य आहे. त्यामुळे जास्तीत जास्त जनतेपर्यंत पोहोचून सैनिकांसाठी भरघोस निधी जमा करावा, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे सोमवारी (दि. ९) शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली ध्वजदिन निधी संकलन शुभारंभ २०२४ करण्यात आले.

यावेळी अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क रविकिरण कोले, जिल्हा उपनिबंधक प्रमोद जगताप, जिल्हा उद्योग केंद्र, महाव्यवस्थापक जी.एस. हरळय्या, शिक्षणाधिकारी (प्रा.) पुनिता गुरव, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, कर्नल राहुल माने (निवृत्त), ॲडमिरल रामदास (लक्ष्मी नारायण परम विशिष्ट सेवा मेडल) यांच्या पत्नी ललिता रामदास आदी उपस्थित होते.



रायगड जिल्ह्यातील युद्ध विधवा, वीरमाता/वीरपिता, वीरपत्नी व सेना मेडलधारकांचा मान्यवरांच्या हस्ते विशेष गौरव करण्यात आला. ध्वज निधीसाठी सढळ हाताने निधी देणारांचा सत्कार तसेच माजी सैनिकांच्या पाल्याना शैक्षणिक शिष्यवृत्ती आर्थिक मदत आणि सन २०२३-२४ ध्वजदिन निधी संकलनाचे उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल विविध कार्यालयांना विशेष गौरवचिन्ह देऊन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. भारतमातेच्या संरक्षणासाठी ज्यांनी आपल्या प्राणांची आहूती देऊन सर्वोच्च बलिदान दिले अशा जवानांच्या कुटुंबियांच्या जीवनातील अडीअडचणी दूर करुन त्यांचे दैनंदिन जीवन सुसह्य व्हावे यासाठी तसेच युध्दात अपंगत्व प्राप्त झालेल्या आणि सशस्त्र दलातून निवृत्त झालेल्या जवानांच्या पुनर्वसनासाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यासाठी या निधीचा वापर केला जातो. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्ज्वलनाने झाली. कार्यक्रमांमध्ये उपस्थित मान्यवरांना सशस्त्र सेना दिवसाचे बॅचेस लावण्यात आले आणि ध्वजदिन निधीत सहभाग देणाऱ्यांकडून निधी संकलित करण्यात आला. यावेळी शासकीय कर्मचारी, निवृत्त जवान उपस्थित होते.

# पनवेलमध्ये नर्सिंग कॉलेजचे उद्घाटन

**। पनवेल । वार्ताहर ।**

तळोजा येथील कमलगौरी हिरु पाटील शिक्षण संस्थेच्या बबनदादा पाटील कॉलेज ऑफ नर्सिंगचे उदघाटन आज एमजीएम हॉस्पिटलचे चेअरमन डॉ सुधीर कदम यांच्या हस्ते करण्यात आल. बाळासाहेब ठाकरे लॉ कॉलेजच्या सभागृहात हा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाला पनवेलचे डॉ. गिरीश गुणे, कळंबोली येथील सत्यम हॉस्पिटलचे डॉ. हिमा बरनवाल, नोबल केअर हॉस्पिटलचे डॉ. खालिद देशमुख, तसेच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष चेअरमन बबनदादा पाटील, ट्रस्टी व शिवसेना उपजिल्हाप्रमुख रामदास पाटील, ट्रस्टी बाळा मुंबईकर आदी मान्यवर उपस्थित होते.

# कंटेनर अडकल्याने वाहतूक कोंडी

**। रसायनी । वार्ताहर ।**

जुना मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर सोमवारी (दि.९) दुपारी एक वाजण्याच्या सुमारास चौक हद्दीत मोठा कंटेनर अडकल्याने वाहतूक कोंडी झाली. या मार्गावर सतत वेगवेगळ्या गाडीतून फेरफटका मारणारे वाहतूक पोलीस दिसून न आल्याने प्रवासी नागरिकही संतापले होते.



जुना मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर ग्रामपंचायत वावंढळ हद्दीत मुंबई लेनवर हॉटेल अरुण येथे कांढरोली गावात जाण्यास पनवेल-खोपोली रस्त्याला मार्गिका आहे. पनवेल-खोपोली व खोपोली-पनवेल हे रस्ते एकमेकांना समांतर असले तरी अतिशय खाली-वर आहेत. त्यामुळे हॉटेलमध्ये विश्रांतीसाठी थांबलेल्या मोठ्या गाड्या पुन्हा खोपोलीकडे मार्गस्थ होताना पनवेल-खोपोली हा रस्ता उंच असल्याने मोठ्या गाड्या वळताना रस्त्याच्या मध्येच अडकून थांबतात. हे अनेक वेळा झाले असून, त्यामुळे वाहतूक कोंडी झाली होती.

सोमवारी दुपारी एक वाजण्याच्या सुमारास एम्एच/४६/सीयू हा लांब कंटेनर खोपोली दिशेला जात असताना वळण घेताना त्याची मागची बाजू उंच रस्त्याला अडकून पडली आणि मागची चाके हवेत राहिल्याने कंटेनर रस्त्यात अडवा झाला. दरम्यान, खोपोलीकडे जाणारी वाहतूक कोंडी झाली, तर काही गाड्यांनी खोपोलीकडे जाण्यास धोका पत्करून खोपोली पनवेल लेनवर उतरली. त्यामुळे दोन्ही रस्त्यांवर कोंडी झाली. मुळात, हे वळण आणि मार्गिका अतिशय धोकादायक आहेत. विशेष म्हणजे, या रस्त्यावरून वेगवेगळ्या खासगी गाडीतून वाहतूक पोलीस गस्त घालत असतात, मात्र अशा वेळी ते कुठे दिसत नाही. या रस्त्याची असणारी कमी-जास्त उंची याकडे या रस्त्याची मालकी असणाऱ्यांनी लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.





# पेडली येथे भैरवनाथ पालखी सोहळा

**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**

भैरवनाथ मंदिर पेडली ग्रामस्थ यांच्या वतीने मार्गशीर्ष शुद्ध पंचमी या तिथीप्रमाणे भैरवनाथ पालखी सोहळा मोठ्या उत्साहात साजरा झाला. पहाटे काकड आरतीने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर मूर्तीचे अभिषेक, सत्यनारायणाची महापूजा, हळदी कुंकवाचे कार्यक्रम, संगीतमय भजन व संध्याकाळी भैरवनाथ देवाची पालखी मिरवणूक फटाक्यांच्या आतषबाजीत काढण्यात आली होती. या मिरवणुकीत वारकरी संप्रदाय वीरेश्वर आसरे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

या कार्यक्रमाला ग्रामस्थांसमवेत पंचक्रोशितील ज्येष्ठ श्रेष्ठ मंडळींनी हजेरी लावली होती. संध्याकाळी हरिपाठ, त्यानंतर महाप्रसाद व रात्री जागर भजन असे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाला पंचक्रोशितील भाविक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. पेडली ग्रामस्थांच्या वतीने आलेल्या सर्व ज्येष्ठ श्रेष्ठ, राजकारणी, क्रीडा, कला, शैक्षणिक या मंडळींचे स्वागत करण्यात आले व आलेल्या पाहुण्यांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भैरवनाथ मंदिर पेडली ग्रामस्थांनी मेहनत घेतली. कार्यक्रमाच्या आयोजनाबद्दल सर्व स्तरातून आयोजकांचे आभार मानण्यात येत आहेत.

# खारघर परिसरात परदेशी नागरिकांचा वाढता वावर

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

नवी मुंबई पोलिसांच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने खारघरमधील एका घरावर छापा मारुन दोन महिला आणि एक पुरुष अशा तीन बांगलादेशी नागरिकांना अटक केली आहे. तर पसार झालेल्या चौथ्या व्यक्तीचा पोलीस शोध घेत आहेत. पोलिसांनी केलेल्या या कारवाईमुळे खारघर परिसरात मोठ्या प्रमाणात परदेशी नागरिक अवैधपणे राहात असल्याचे स्पष्ट झाले आहे. यामध्ये बांगलादेशी आणि आफ्रिकन वंशाच्या नायजेरियन नागरिकांची संख्या मोठी आहे.

खारघर परिसरात घर भाड्याने घेऊन अनेक परदेशी नागरिक वास्तव्य करत आहेत.जादा भाड्याच्या आमिषाने घरे भाड्याने देण्याचा व्यवसाय करणारे दलाल आणि घर मालक कोणत्याही कागदपत्रांची शहानिशा न करता घर भाड्याने देत असल्याने अवैधपणे राहणाऱ्या नागरिकांचे फावले आहे. अनेक बांगलादेशी नागरिकांनादेखील विविध गुन्ह्यांसोबत भारतात बेकायदेशीर मार्गाने घुसखोरी करण्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आल्याचे पाहायला मिळाले आहे. नवी मुंबई पोलिसांच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने केलेल्या कारवाईत ताब्यात घेण्यात आलेल्या व्यक्तींपैकी दोघे दहा वर्षांपासून भारतात वास्तव्य करत आहेत. त्यांच्याकडे आधार कार्ड, पॅनकार्ड आणि मतदार ओळखपत्रदेखील आढळून आल्याने ही बाब देशाच्या सुरक्षिततेसाठी गंभीर असल्याचे मत जाणकार व्यक्त करत आहेत.

# विज्ञान प्रदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

प.पू. गगनगिरी महाराज इंटरनॅशनल स्कूलमध्ये शाश्वत भविष्यासाठी विज्ञान व तंत्रज्ञान या थीमवर आधारित विज्ञान प्रदर्शन संपन्न झाले. या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी अनेक विषयांवर आधारित प्रयोग सादर केले होते. संशोधनात पाश्चिमात्य देश पुढे असल्याचा समज आहे. मात्र, ३ ते ४ हजार वर्षांपूर्वीपीसून भारत संशोधनात आहे. आपल्या देशातील नालंदा, ताक्षिणा युनिव्हर्सिटी जगातील अनेक विद्यार्थी शिक्षण घेत होते, अशी माहिती विज्ञान शाखेचे डॉ. अमोल नागरगोजे यांनी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना देत देशाच्या प्रगतीत शास्त्रज्ञ, शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे मोठे योगदान असल्याचे सांगत विद्यार्थी शिकत असताना मनात प्रश्न पडला पाहिजे, प्रश्न विचारल्यामुळे आपल्याला विषय समजतो, असे मार्गदर्शन नागरगोजे यांनी केले आहे.

केटीएसपी मंडळाचे प.पू. गगनगिरी महाराज इंटरनॅशनल स्कूलमध्ये विज्ञान प्रदर्शन आयोजित केले होते. या प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी विज्ञान शाखेचे डॉ. अमोल नागरगोजे, के.एम.सी कॉलेजच्या सेवानिवृत्त प्रा.डॉ. नलिनी रामास्वामी, नीता शर्मा, केटीएसपी मंडळाचे अध्यक्ष संतोष जंगम, कार्यवाह किशोर पाटील, गगनगिरी इं. स्कूलचे अध्यक्ष दिनेश गुरव, राजू अभाणी, सह्याद्री विद्यालयाचे अध्यक्ष संजय पाटील, छत्रपती विद्यालयाचे अध्यक्ष भास्कर लांडगे उपस्थित होते. प.पू. गगनगिरी महाराज इंटरनॅशनल स्कूलचे प्राचार्य गौरव तिवारी यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले.

ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी १९६० ते २०२० च्या दशकातील संगीताचे प्रात्यक्षिक करून दाखविले तसेच विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर तयार केलेल्या प्रोजेक्टचे प्रमुख पाहुणे आणि पालकांनी कौतुक केले.

विज्ञान प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी प.पू. गगनगिरी महाराज इंटरनॅशनल स्कूलचे प्राचार्य गौरव तिवारी यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मेहनत घेतली आहे.

पान १ वरून

## शिष्यवृत्ती अडकली तिजोरीत

९४४ विद्यार्थ्यांना पहिल्या टप्प्यात आणि चार हजार ३६५ विद्यार्थ्यांना दुसऱ्या टप्प्यात राज्य शासनाकडून शिष्यवृत्ती देण्यात आली. परंतु, गेल्या चार वर्षांत केंद्राकडून या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीच मिळाली नसल्याची माहिती समोर येत आहे. सरकारकडून अद्यापपर्यंत विद्यार्थ्यांना निधी वितरीत न केल्याने त्याचा फटका रायगड जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना बसत आहे. जिल्ह्यातील ११ हजार ८९७ विद्यार्थ्यांना सरकारकडून शिष्यवृत्ती मिळालेली नाही. सुमारे ४० कोटी रुपयांचा निधी शासन दरबारी प्रलंबित असल्याची माहिती उपलब्ध झाली आहे. शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यावरून गेल्या काही वर्षांपासून वाद सुरु होता. केंद्राकडील निधी विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा करण्याचे परिपत्रक काढण्यात आले. त्यामुळे त्यांना शिष्यवृत्ती मिळण्याचा मार्ग मोकळा झाला होता. मात्र, अजूनही विद्यार्थ्यांच्या खात्यात शिष्यवृत्तीची रक्कम जमा झालेली नाही. शिष्यवृत्तीअभावी विद्यार्थ्यांचे शिक्षण अपूर्ण राहण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

## आगीच्या भडक्यात तिघे गंभीर

गंभीर जखमी झालेला योगेश ठमके याला अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेची नोंद नागोठणे पोलीस ठाण्यात करण्यात आली असून, याप्रकरणी पुढील तपास नागोठणे पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस हेड कॉन्स्टेबल दया पाटील करीत आहेत.

## स्पाच्या नावाखाली वेश्याव्यवसाय

वेश्यागमनाकरिता मुली पुरविण्यात येऊन त्यांच्या माध्यमातून वेश्याव्यवसाय चालविण्यात येत असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाला मिळाली होती. त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक पृथ्वीराज घोरपडे आणि त्यांच्या पथकाने सदर स्पावर कारवाई करण्यासाठी या स्पामध्ये बनावट ग्राहक पाठवून खात्री केली. यावेळी स्पामध्ये वेश्याव्यवसाय चालविण्यात येत असल्याची खात्री पटल्यानंतर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने सदर स्पावर छापा मारला. यावेळी सदर स्पामध्ये तीन महिलांकडून स्पा आणि मसाजच्या नावाखाली जबरदस्तीने वेश्याव्यवसाय करुन घेण्यात येत असल्याचे आढळून आले. त्यामुळे पोलिसांनी हॉट स्टोन वेलनेस स्पाची चालक मालक जान्हवी उर्फ संध्या दिनेश चव्हाण (३१) या महिलेविरोधात खाघरघर पोलीस ठाण्यात पीटा कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करुन तिला ताब्यात घेतले आहे. या कारवाईत पोलिसांनी स्पामध्ये वेश्याव्यवसायासाठी ठेवलेल्या तीन महिलांची सुटका केली. तसेच सदर स्पामधून रोख रक्कम आणि इतर आक्षेपार्ह वस्तू जप्त केल्या आहेत.

## कॅन्डल मार्च

परिषद सदस्य प्रभाकर म्हात्रे, गडब सरपंच माणसी पाटील, उपसरपंच दिपक कोठेकर, शिवसेनेचे जिल्हा समन्वयक नरेश गांवड, शिवसेनेचे पेण विधानसभा समन्वयक समीर म्हात्रे, शिवसेनेचे उपतालुका प्रमुख हिराजी चोगले, डोलवी ग्रामपंचायतीचे सरपंच परशुराम म्हात्रे, भाजपचे युवा नेते ललित पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस परशुराम मोकल, मनसेचे तालुका अध्यक्ष मनोहर पाटील, युवासेनेचे कासु विभाग प्रमुख निशांत पाटील, माजी सरपंच अर्पणा कोठेकर, विजय पाटील, माजी उपसरपंच तुलशिदास कोठेकर, दिनेश म्हात्रे, मानव अधिकारी समितीच्या पेण तालुका अधक्षा अश्विनी ठाकूर, पत्रकार विजय मोकल, आदर्श युवा संघटनेचे संचालक के.पी. पाटील, अध्यक्ष के.जी. म्हात्रे, सचिव कमलेश ठाकूर आदींसह हजोरो नागरिक सहभागी झाले होते. यावेळी या निर्घृण हत्येचा निषेध व्यक्त करुन मितेशला न्याय मिळाला पाहिजे व आरोपींना कठोर शिक्षा व्हावी, तसेच हा खटला जलदगती न्यायालयात चालवावा, अशी मागणी करण्यात आली. यावेळी मितेशला न्याय मिळवून देण्यासाठी सर्वोतोपरी सहकार्य करणार आसल्याचे उपस्थितांनी सांगून, त्याला श्रद्धांजली वाहिली.

## कांद्याचे क्षेत्र गाठणार हजारी

म्हणूनच क्षेत्र वाढ करण्यासाठी जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी पुढाकार घेतला आहे.

कांदा उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी पावले उचण्यात आली आहेत.हवामान आणि विविध समस्यांमुळे शेती उत्पादकता आणि नफा वाढवण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान आणि नाविन्यपूर्ण पद्धतींचा वापर करून शेतकऱ्यांना शिक्षित करणे, ही काळाची गरज आहे. शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञान व बँकांचे सहकार्य यांच्या मदतीने शेतीत आवश्यक ते बदल करून उत्पादकता वाढविणे आवश्यक आहे. रायगड जिल्ह्यातील पांढऱ्या कांद्याचे क्षेत्र एक हजार हेक्टर करण्यासाठी जिल्हा प्रशासन प्रयत्नशील असल्याचे जिल्हधिकारी किशन जावळे यांनी एका कार्यक्रमात सांगितले. त्यामुळे पांढऱ्या कांद्याच्या क्षेत्राचा विस्तार वाढण्याची शक्यता आहे. भात पिकाची कापणी झाल्यानंतर लगेच पांढऱ्या कांद्याची लागवड करता यावी, यासाठी नव्याने लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांना बियाणे, लागवडीचे तंत्र समजावण्यासाठी जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालयाकडून मार्गदर्शन केले जात आहे. याच अनुषंगाने बँक ऑफ बडोदाच्या माध्यमातून अलिबागमध्ये २५ नोव्हेंबरपासून किसान पंधरवडा आयोजित केला होता. त्यानिमित्ताने जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी क्षेत्रवाढीसाठी कोणकोणते प्रयत्न केले जात आहेत याची माहिती दिली. यावेळी शेतकरीही मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## कोण होणार ‘होम मिनिस्टर’?

त्यामुळे मुख्यमंत्रीपद भाजपकडे गेले. यामुळे महायुतीचे घटकपक्ष असलेल्या शिवसेना शिंदे गटाने उपमुख्यमंत्रीपदासह गृहमंत्रीपदावर दावा केला होता. मात्र, भाजपने शिंदे गटाला गृहमंत्रीपद देण्यास नकार दिला. त्याऐवजी दुसरं खातं देऊ असे सांगण्यात आले. पण, शिंदे गटाने त्यांची मागणी तशीच ठेवली. त्यातच आता रविवारी रात्री वर्षा निवासस्थानी एक बैठक पार पडली. या बैठकीतही एकनाथ शिंदे गृहमंत्रीपदाबाबत अजूनही आग्रही असल्याची माहिती खात्रीलायक सूत्रांची दिली आहे. तर, दुसरीकडे गृहखाते न देण्यावर भाजप ठाम आहे. त्याऐवजी महसूल आणि इतर खाती घ्या, असा सल्ला देवेंद्र फडणवीसांनी एकनाथ शिंदे यांना दिला आहे. सध्या गृहमंत्रीपदावरुन एकनाथ शिंदे यांची मनधरणी करण्याचा प्रयत्न सुरु आहे. दरम्यान, येत्या १३ डिसेंबरला शपथविधी पार पडणार आहे. त्यापूर्वी जर गृहखात्याचा तिढा सुटला नाही, तर मंत्रिमंडळ विस्तार पुढे ढकलला जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# कौटुंबिक वादातून कोयता हल्ला

**। नवी मुंबई । वार्ताहर ।**

दुसऱ्या घरात राहण्याचा तगादा लावणाऱ्या पत्नीवर पतीनेच हातोडा, लोखंडी सळईने हल्ला केला आहे. या हल्ल्यात गंभीर जखमी असलेल्या महिलेवर महापालिकेच्या रुग्णालयात उपचार सुरू असून, हल्ला करणारा तिचा पती फरारी आहे.

कोपरखैरणेतील बोनकोडे येथे वाहिद शेख याचा भंगारविक्रीचा व्यवसाय आहे. त्याची पत्नी यास्मिन, तीन वर्षांच्या मुलीसह सगळे भाड्याच्या घरातच राहतात. नीट सांभाळ करत नसल्याचे कारण देत त्याची पत्नी माहेरी गेली होती. तसेच, राहत असलेले घर (दुकान) पत्र्याचे असल्याने चांगल्या घरात राहण्यावरून दोघांमध्ये वादही होत होते. अशातच वाहिदने यास्मिनला फोन करून मुलीला पाहण्याची इच्छा झाल्याचा बहाणा करत घरी येण्यास सांगितले. सकाळी साडेअकराच्या सुमारास यास्मिन मुलीसह दुकानावर आली; पण रागात असलेल्या वाहिदने तिला शिवीगाळ करून लोखंडी सळईने मारहाण केली. यावेळी यास्मिनने पळून जाण्याचा प्रयत्न केला; पण वाहिदने तिच्या डोक्यात हातोड्याने वार केला. या मारहाणीत गंभीर जखमी यास्मिनवर ऐरोलीतील पालिकेच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तर, वाहिदविरोधात कोपरखैरणे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल आहे.



# मजदूर महासंघाच्या कार्यकारिणीची बैठक संपन्न

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

भारतीय पोर्ट अँड डाक मजदूर महासंघाची राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक ३० नोव्हेंबर व १ डिसेंबर २०२४ रोजी मुंबई पोर्ट येथे पार पडली. या बैठकीला देशातील सर्व बंदरातील पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी बंदरातील वेतन करार लवकरात लवकर पास करा, असा ठराव करण्यात आला. तशा प्रकारचे पत्र सर्व पोर्टचे चेअरमन आणि मंत्री महोदयांना देण्यात आले आहे.

भारतीय मजदूर संघाला ७० वर्षे पूर्ण होत आहे. त्या निमित्ताने सर्व बंदरामध्ये संपर्क अभियानाची उपक्रमाची जोरदार तयारी सुरु आहे. अनेक विषयांवर चर्चा करण्यात आली. यात पोर्टचे राहिलेले विषय ताबडतोब पत्रव्यवहार करून त्याची अंमलबजावणी करावी, असा ठराव घेण्यात आला. बैठकीस १० बंदरांतील कामगार प्रतिनिधी उपस्थित होते.

यावेळी महासंघाचे अध्यक्ष श्रीकांत रॉय, महामंत्री सुरेश पाटील, केंद्रीय नेते व महासंघाचे प्रभारी अण्णा धुमाळ, सहप्रभारी व्ही.एम. चावडा, कोषाध्यक्ष सुधीर घरत, विश्वस्त रवी पाटील, के.के. विजयन, विघ्नेश नाईक, समीर मुजुमदार, संजय धंदाळ, प्रभाकर उपरकर, स्नेहल मोरे, श्रेया शेळके, तीवरेकर अशा प्रतिनिधींनी हजेरी लावली होती. याप्रसंगी वेतन करार समितीचे सदस्य सुरेश पाटील यांचा वेतन करार घडवून आणल्याबद्दल विशेष सत्कार करण्यात आला. दरम्यान, संपर्क अभियानच्या माध्यमातून नागरिकांचे कर्तव्य, पर्यावरण, संरक्षण, संवर्धन, एकता, समता, बंधुता आदी मूल्यांची जनजागृती करून ती तळागळात पोहोचविण्याचे काम सुरु असल्याचे महामंत्री सुरेश पाटील यांनी सांगितले.

## निवडक

### दत्त जयंतीनिमित्त कार्यक्रम

**खांब :** पिंपळवाडी-देवकान्हे येथे दत्त जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती ग्रामस्थांकडून देण्यात आली आहे. या उत्सव सोहळ्यानिमित्त पहाटे अभिषेक व पूजाविधी, महापूजा, महाआरती, तद्नंतर सायं.६ वा.कोकण दिंडी वारकरी संप्रदाय रोहा यांची हरिपाठ सेवा,रात्रौ.महाप्रसाद, तद्नंतर दिनेश महाराज कडव यांची सुश्राव्य हरि किर्तनरूपी व जागर भजन आदी धार्मिक तथा अध्यात्मिक कार्यक्रम संपन्न होणार आहेत.

### वधु-वर सूचक मेळावा

**कोलाड :** कुणबी समाजोन्नती संघ मुंबई ग्रामीण शाखा रोहा यांच्या संयुक्त विद्यमाने सानप कुणबी भवन रोहा, मेहेंदळे हायस्कूलच्या मागे वधु-वर सूचक मेळावा आयोजित करण्यात येणार आहे. या मेळावा नावनोंदणीसाठी रामचंद्र सकपाळ, अनंत थिटे, सतिश भगत, सुहास खरिवले, मुकेश भोकटे, शैलेश बाईत, रविंद्र शिंदे, महेश तुपकर, दिपीका भगत, शिल्पा मरवडे, आशा शिर्के, जिज्ञासा तुपकर यांना संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

### माजी विद्यार्थ्यांचे संमेलन

**माणगाव :** लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठातील पदविका विभागातील संगणक विभागातर्फे आयोजित करण्यात आलेल्या माजी विद्यार्थ्यांच्या संमेलनाला उत्साहपूर्ण प्रतिसाद लाभला. या संमेलनामध्ये संगणक क्षेत्रांत यशस्वी झालेल्या माजी विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांच्या स्वागताचे औपचारिक कार्यक्रम पार पडले.

### कॅन्सर जनजागृती शिबीर

**नेरळ :** विद्या विकास शाळेमध्ये महिलांसाठी कॅन्सर जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. महानगर गॅस लिमिटेड आणि सायन्स अँड टेक्नॉलॉजी पार्क यांच्या मदतीने महिलांची तपासणी करण्यात आली. महानगर गॅस लिमिटेड आणि सायन्स अँन्ड टेक्नॉलॉजी पार्क यांच्या मदतीने एचपीव्हीडि एनए टेस्टदेखील मोफत करण्यात आली.या शिबिरामध्ये जवळजवळ ७० महिलांनी उपस्थिती दर्शवत गर्भाशय मुखाचा कॅन्सरबाबतच्या तपासणी सेवेचा लाभ करुन घेतला.

### मोफत नेत्रतपासणी शिबीर

**माणगाव :** माणगावात शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व उद्योजक विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्ट माणगावतर्फे बुधवारी (दि.११) एचडीएफसी बँकेच्या समोर, मुंबई-गोवा महामार्गालगत पेपर विक्रेते नितीन मेथा यांच्या जवळील महेंद्र मेथा यांचा सभागृह जुने एसटी स्टँड माणगाव याठिकाणी मोफत नेत्रतपासणी शिबीर आयोजित करण्यात आले आहे. तरी सदर शिबिराचा लाभ समाजातील सर्व गरीब गरजू रुग्णांनी घ्यावा, असे आवाहन उद्योजक विजयशेठ मेथा यांनी केले आहे.

# यंदा आंबा उशिरा

## चाखण्यासाठी वाट पहावी लागणार



**रायगड जिल्ह्यात आंब्याची ४५ हजार हेक्टरवर लागवड करण्यात आली आहे; ज्यातील १६ हजार हेक्टर उत्पादनक्षम क्षेत्र आहे. दरवर्षी यातून २१ हजार मेट्रिक टन उत्पादन मिळते. लहान बागायतदार तयार होणारा आंबा थेट घाऊक बाजारात न पाठवता ग्राहकांना थेट विक्री करण्याचा प्रयत्न करतात. जिल्ह्यात मेच्या सुट्टीत येणाऱ्या पर्यटकांकडून यास जास्त पसंती असते. बाजारात पाठवताना होणारा खर्च, घाऊक बाजारातील मालाला मिळणाऱ्या कमी किमतीमुळे येथील बागायदार व विक्रेत्यांना आतापासूनच थेट विक्रीसाठी प्रयत्न सुरू आहेत.**

**। रायगड । प्रतिनिधी ।**

आंबा मोहोराला पोषक असणारी थंडी तीन-चार दिवसांपासून गायब झाल्याने आंबा बागायतदार चिंतेत पडले आहेत. फेइंजल वादळाचे पडसाद कोकण किनारपट्टीवर दिसून येत असून, आठवडाभरापासून कोकणात ढगाळ वातावरण आहे.

काही ठिकाणी पाऊस पडल्याने थंडी गायब झाली आहे. आंब्याला मोहोर येण्याच्या प्रक्रियेत यंदा परतीच्या पावसाचा मुक्काम लांबल्याने थंडी पडण्यास उशीर झाला. त्यानंतर फेइंजल वादळाने वातावरणात कमालीचा बदल झाला असून, मोहोर येण्यास विलंब होणार असल्याने आंब्याचा हंगाम दीड ते दोन महिने लांबणीवर पडण्याची शक्यता आहे.

मे महिन्यातील हंगाम जूनपर्यंत गेल्यामुळे पावसामुळे आंब्याला योग्य दर मिळणे कठीण जाईल, त्याचबरोबर जास्त दिवस बागांची रखवाली आणि औषध फवारणी करावी लागणार असल्याने बागायतदारांच्या अर्थकारणावरही परिणाम होण्याची शक्यता आहे. बदलत्या वातावरणाने जिल्ह्यातील आंबा बागायतदारांना सुरुवातीपासून चिंतेत टाकले आहे. हे सातत्य अद्याप कायम आहे.

> ढगाळ वातावरण, वाढलेल्या उष्म्यामुळे फळझाडांवरील मोहोर गळून पडण्याची शक्यता आहे. तसेच नवी पालवी फुटेल. मोहोर न येता पालवी कडक होण्याची शक्यता आहे. मोहोर संरक्षण केलेल्या फळबागांचे फारसे नुकसान होणार नाही. पण मोहोर टिकविण्यासाठी औषधे व किटकनाशके फवारणी केल्यास फळबागांना संरक्षण कवच मिळेल; मात्र या सर्व उपाययोजना करणे सर्वांनाच शक्य होणार नाही. त्यामुळे यंदा आंबा उत्पादनातही घट होऊ शकते.
>
> – महेंद्र निमण , महुरे

नोव्हेंबरअखेरीस हवामानात गारठा जाणवायला सुरुवात झाली. त्यामुळे आंब्याला मोहोर येण्यासाठी पोषक वातावरण तयार झाले होते; मात्र फेइंजल वादळामुळे अचानक थंडी गायब झाल्याने तापमानात वाढ झाली आहे. ढगाळ वातावरणामुळे आर्द्रतेचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे मोहोर येण्याच्या प्रक्रियेस विलंब होणार असून, त्याचा परिणाम आंब्याच्या आर्थिक उलाढालीवरही होईल, असा अंदाज बागायतदारांकडून व्यक्त होत आहे.

कोकणात ऑक्टोबरमध्ये आंबा पिकाला मोहोर येण्याची प्रक्रियासुरूहोते.हीप्रक्रियातीनटप्प्यांत जानेवारीपर्यंत सुरू राहते. पहिल्या टप्प्यातील आंबा हा जानेवारीच्या उत्तरार्धात बाजारात दाखल होण्यास सुरुवात होते. अलिबागचा आंबा यादरम्यान वाशी मार्केटमध्ये दाखल होतो, मात्र त्याची अतिशय चढ्या दराने विक्री होते. दुसऱ्या टप्प्यातील आंबा साधारणपणे मार्चमध्ये बाजारात दाखल होतो. आंब्याची आवक वाढल्याने दर कमी होण्यास सुरुवात होते. तिसऱ्या टप्प्यातील आंबा हा एप्रिल-मेमध्ये दाखल होतो; मात्र यंदा आंब्याची चव चाखण्यासाठी खवय्यांना वाट पाहावी लागणार आहे. कारण आंब्याला मोहोर येण्याची प्रकिया लांबली आहे.

> पाऊस लांबल्याने मोहोरासाठी येणारा ताण झाडांना अद्याप मिळालेला नाही. त्यामुळे अद्याप मोहोर आलेला नाही, तर काही झाडांना आताशी पालवी फुटत आहे. यामुळे यंदा आंब्याचा पीक कमी प्रमाणात राहण्याची शक्यता आहे. एप्रिल-मेपर्यंत येणाऱ्या तिसऱ्या टप्प्यातील आंब्याचा हंगाम जून महिन्यापर्यंत लांबणीवर जाऊ शकतो. याच दरम्यान मोठ्या प्रमाणात पीक येणार असला तरी त्याला योग्य किंमत मिळेल, याचीही शाश्वती नाही.
>
> – मन ठाकूर, शेतकरी, अलिबाग.

रायगड जिल्ह्यात आतापर्यंत सरासरी चार हजार मिलीमीटरपेक्षा अधिक पाऊस झाला आहे. यावर्षी पावसाचे प्रमाण सरासरीपेक्षा जास्त होते. कोकणात यंदा २८ ऑक्टोबरपर्यंत पाऊस सुरूच होता. त्यामुळे जमिनीत अद्याप ओलावा टिकून आहे. ओलाव्यामुळे आंब्याला पालवी येण्याची शक्यता आहे.

# महिसदरा पुलाचे काम निकृष्ट दर्जाचे

**। कोलाड । वार्ताहर ।**

मुंबई गोवा महामार्गावरील कोलाड, पुई या गावानजिक महिसदरा नदीवर पुलाचे काम अनेक वर्षांपासून रखडले आहे. या कामाला १७ वर्षे पूर्ण झालीतरी या कामात कोणतीही प्रगती नाही. हे काम मे २०२५ पर्यंत पूर्ण करण्याच्या इराद्याने सुरु आहे.

हे कामनिकृष्ट दर्जाचे होत असल्याचे येथील ग्रामस्थांच्या लक्षात आल्यानंतर या कामाच्या ठिकाणी जाऊन या कामाची पाहणी केली. यावेळी सिद्धार्थ गायकवाड, अशोक धामणसे, आत्माराम दिवेकर , सखाराम सावंत आदी पुई ग्रामस्थांनी महिसदरा पुलाच्या बाजूला जाऊन पाहणी केली असता महामार्गावरील पहिली टाकलेली डांबर खोदकाम न करता त्यावर मलमपट्टी म्हणून सिमेंट काम सुरु केले आहे. याबाबत विचारणा केली असताना येथील कामगार म्हणतात आम्हाला काहीच माहिती नाही. आम्हाला फक्त जुना



रोड साफ करून साईडपट्ट्या मारून ठेवायला सांगितले आहे.

रोहा तहसीलदार यांना दूरध्वनी वरून संदेश देऊन त्यांच्या निदर्शनास आणले असता रोहा तहसीलदारांनी मला भेटा असे सांगितले. सिद्धार्थ गायकवाड व त्यांचे कार्यकर्ते तहसीदार यांना भेटणार असून यानंतर हे काम असेच सुरु राहिले तर तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा सिद्धार्थ गायकवाड यांनी दिला आहे.



# द्रोणागिरी स्टेशन परिसरात लुटमारीचे सत्र सुरू

## महिला प्रवाशांनी सावधगिरी बाळगावी

**। उरण । वार्ताहर ।**

बोकडविरा ग्रामपंचायत हद्दीतील द्रोणागिरी रेल्वे स्टेशनमधून अनेक प्रवासी नागरी, नोकरदार, विद्यार्थी तसेच काही कामानिमित्त नवीमुंबई शहराकडे जाणाऱ्या महिला या प्रवास करत आहेत.द्रोणागिरी रेल्वे स्टेशन परिसरात, रस्त्यावर वाढलेल्या गवताचा फायदा उठवत भामटे स्टेशनवरून आपल्या घराकडे जाणाऱ्या महिलांच्या अंगावरील दागिने हिसकावून पोबारा करत आहेत. तरी प्रवाशी नागरीकांनी विशेष करून महिलांनी घाबरून न जाता सतर्कता बाळगणे गरजेचे आहे.

मुंबई व नवीमुंबई शहराला जोडणारी उरण रेल्वे सेवा ही २०२४ मध्ये सुरू झाल्याने त्याचा फायदा हा उरणच्या जनतेला, नोकरदार, विद्यार्थी, चाकरमानी, प्रवाशी नागरीकांना मोठ्या प्रमाणात होत आहे.मात्र रेल्वे प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे द्रोणागिरी रेल्वे स्टेशन परिसरात रस्त्यावर मोठ्या प्रमाणात गवताचे साम्राज्य पसरले असल्याने त्यांचा त्रास हा प्रवाशी नागरीकांना सहन करावा लागत आहे.

द्रोणागिरी रेल्वे स्टेशन परिसरात, रस्त्यावर वाढलेल्या गवताचा फायदा उठवत भामटे स्टेशन वरून आपल्या घराकडे जाणाऱ्या महिलांच्या अंगावरील दागिने हिसकावून पोबारा करत असल्याचे महिलांकडून सांगण्यात येत आहे.तरी रेल्वे व सिडको प्रशासनाने खबरदारी म्हणून रेल्वे स्टेशन परिसरात, रस्त्यावर वाढलेले गवत काढण्यासाठी पुढाकार घ्यावा. तसेच रेल्वे पोलीस तैनात करण्यात यावेत अशी मागणी प्रवाशांकडून करण्यात येत आहे.

> द्रोणागिरी रेल्वे स्टेशन परिसरात रस्त्यावर मोठ्या प्रमाणात गवत वाढले आहे.त्याचा व अंधाराचा फायदा उठवत काही भामटे (चोरटे) हे प्रवाशी महिलांच्या अंगावरील दागिने घेऊन पोबारा करत असल्याच्या घटना समोर येत आहेत.यासंदर्भात भयभीत अवस्थेतील महिला या सदर घटनेची तक्रार दाखल करण्यासाठी पुढे जात नाहीत.तरी रेल्वे पोलीस यंत्रणेने महिलांच्या सुरक्षेसाठी सतर्कता बाळगणे आवश्यक असून सिडको व रेल्वे प्रशासनाने परिसरातील व रस्त्यावरील वाढलेले गवत काढण्यासाठी पुढाकार घेणे गरजेचे आहे
>
> –जगदीश भोईर सामाजिक कार्यकर्ते बोकडविरा– द्रोणागिरी नोड

### भैरवनाथ जोगेश्वरी उत्सव सोहळा

**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**

आतोणे येथे श्री भैरवनाथ जोगेश्वरी उसत्व सोहळा संपन्न झाला. या सोहळ्यानिमित्त मंदिराची फुलांची सजावट आकर्षक होती. या उत्सव सोहळ्या निमित्त भैरवनाथ अभिषेक, सत्यनारायण महापूजा, महिलांचा हळदी कुंकु, हरिपाठ, मुली व महिलांसाठी स्पर्धात्मक कार्यक्रम व रात्री ए व्ही आणि ओम साई डान्स अकॅडमी पाली यांच्या वतीने विविध नृत्याविष्कार सादर करून बालकलाकारानी प्रेक्षकांची मने जिंकली. या उत्सवानिमित्त खेळणी विक्रेते, दुकानदार विक्रीसाठी बसले होते. मंदिर परिसरात भाविकांची गर्दी मोठ्या प्रमाणात होती.आतोणे ग्रामस्थ अमेरिका, कॅनडा, मुबई, ठाणे येथून या कार्यक्रमासाठी उपस्थितीत होते.

## किनाऱ्यालगत नांगरलेल्या मत्स्यनौका



● श्रीवर्धन तालुक्यातील भरडखोल येथील डागी बंदराचे विहंगम दृश्य.

(छायाचित्र :मकरंद जाधव)

# उड्डाणपूल उजळणार पथदिव्यांनी!

**। हमरापूर । वार्ताहर ।**

कोकणाचे प्रवेशदार असलेल्या मुंबई-गोवा महामार्गावरील उड्डाण पूल आता पथदिव्यांनी उजळणार आहे.



मुंबई-गोवा महामार्ग हा कोकणात व गोवा पर्यंत जाणारा महत्त्वाचा महामार्ग आहे. तसेच जिल्ह्यात अलिबाग, मुरुड, श्रीवर्धन, हरिहरेश्वर गणपतीपुळे, रत्नागिरी, मालवण, तारकर्ली बीच, सिंधुदुर्ग तसेच गोवा पर्यंत फिरण्यासाठी पर्यटक मोठ्या संख्येने येत असतात. पेण तालुक्यात व जिल्ह्यात बऱ्याच ठिकाणी औद्योगिक कंपन्या असल्यामुळे मोठ्या प्रमाणात अवजड वाहनांची वाहतूकदेखील या महामार्गावरून होते. त्यामुळे या महामार्ग वाहनांची सतत गर्दी असते. परंतु हा महामार्ग पूर्वी एकपदरी असल्याने या महामार्ग सतत अपघात होत होते व वाहतूक कोंडीदेखील सातत्याने होत असे. त्यामुळे प्रवाशांना फार त्रास होत होता.

या महामार्गाचे चौपदरीकरण व्हावे अशी मागणी करत अनेक आंदोलने केली व आजही सुरू आहेत. या आंदोलनाची दखल घेऊन शासनाने महामार्गाच्या चौपदरीकरणाचे सुरु केले. हे काम गेल्या १४ वर्षापासून सुरू आहे.

सध्या हे काम युद्ध पातळीवर सुरू आहे. महामार्गावर पथदिवे नसल्याने बऱ्याच वेळा वाहन चालकांना वाहन चालताना मोठी अडचण निर्माण होत आहे. त्यामुळे बऱ्याचदा अपघात देखील झाले आहेत. त्यामुळे आता महामार्गांवर पथदिवे लावले जात असून प्रथम महामार्गावरील उड्डाणपूलांवर सध्या पथदिवे लावण्याचे काम सुरू असून त्याचे पोल देखील उभारण्यात आले आहेत.

पनवेल पासून पळस्पे, तुरमाळे, तारा, खारपाडा पूल, बाळ गंगा नदी पूल, तरणखोप बायपास, भोगावती नदी पूल, पशुसंवर्धन ते रामवाडी पूल, उचेडा ते वडखळ, डोळवी बायपास पूल पुल ते नागोठणे पासून पुढे विजेचे पोल उभारण्याचे काम सध्या सुरू असून लवकरच महामार्ग पथदिव्यांनी उजाळणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

# तळोजा पाणीसमस्येची लोकायुक्तांकडून दखल

**। खारघर । वार्ताहर ।**

तळोजा परिसरात कमी दाबाने होणाऱ्या पाणीपुरवठ्याची दखल लोकआयुक्त विभागाने घेतली आहे. उप लोकआयुक्त यांच्यासमोर ३० डिसेंबरला सुनावणी होणार असून, या वेळी सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक तसेच पाणीपुरवठा विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांनी ऑनलाइन उपस्थित राहावे, असे महाराष्ट्र लोकआयुक्त विभागाकडून कळविण्यात आले आहे.

तळोजा वसाहतीत गेल्या काही वर्षांपासून कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्यामुळे रहिवाशांना टँकरने पाणी विकत घेऊन गरजा पूर्ण कराव्या लागत आहेत. वसाहतीमधील पाणी समस्या दूर व्हावी, यासाठी रहिवाशांनी सिडकोच्या विरोधात अनेक वेळा मोर्चा, आंदोलन केले आहे. यावेळी पाण्याचा साठा वाढवून योग्य पुरवठा केला जाईल, असे आश्वासन सिडकोकडून देण्यात येते. दोन दिवस सुरळीत पाणीपुरवठा होतो आणि पुन्हा परिस्थिती जैसे थे होत असल्यामुळे रहिवासी नाराज झाले आहेत. तळोजा वसाहतीच्या लोकसंख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे; मात्र सिडकोकडून पाणी वाढीसाठी कोणत्याही प्रकारचे प्रयत्न केले जात नसल्याची बाब लोकआयुक्तांच्या निदर्शनास आणून देण्यात आली आहे.

## अवजड वाहतुकीमुळे नागरिक आले मेटाकुटीला

# कोप्रोली – खोपटापूल रस्त्याला खड्ड्यांचे विघ्न सुरुच

**। उरण । प्रतिनिधी ।**

कोप्रोली - खोपटा पूल रस्त्यावर खड्ड्यांचे विघ्न पाहायला मिळतं आहे. यामुळे कित्येक दुचाकीस्वारांचे या रस्त्यावर अपघात होत आहेत. विशेषतः रात्रीच्या वेळी रस्त्याचा अंदाज येत नसल्याने ही अडचण निर्माण होत आहे. विशेष म्हणजे साईट पट्ट्याच्या बाजूला तसेच गतिरोधक कळण्यासाठी जो रेडीयमयुक्त सफेद रंग द्यावा लागतो तोही देण्यात आलेला नाही. ही परिस्थिती कोप्रोली-खोपटापूल रोडवर नाही तर संपूर्ण उरण पूर्व विभागात पाहायला मिळत आहे एकीकडे खराब रस्ता तर दुसरीकडे रस्त्याच्या दोन्ही बाजूला उभे असलेले कंटेनर ट्रेलर यामुळे नागरिक मेटाकुटीला आले असून, या रस्त्यावर छोटे मोठे अपघात नागरिकांच्या पाचवीला पुजले आहेत.

हा रस्ता सर्वसामान्य नागरिकांसाठी



मृत्यूचा सापळा बनला आहे. विशेष म्हणजे पावसाळ्या पूर्वी या रस्त्यावर खडी टाकण्यात आली होती. ती खडी पावसामुळे व अवजड वाहतुकीमुळे वाहून गेलेली पाहायला मिळतं आहे.

रस्त्याच्या निकृष्ट दर्जाच्या कामामुळे खोपटा-कोप्रोली रस्त्याची दुरवस्था झालेली पाहायला मिळत आहे. तर दुसरीकडे मोठ्या प्रमाणात होणारी जडवाहतूक, व रस्त्याच्या दोन्ही बाजूला उभे असलेले कंटेनर यामुळे सर्वसामान्य नागरिकांनी नेमकं नक्की कुठून आणि कसं जायचं हाच प्रश्न सतावत आहे. अनेक दुचाकीस्वार पडणे अशी स्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे गंभीर दुखापत होऊन दुचाकीस्वारांच्या जीवाला धोका निर्माण होत आहे. त्यामुळे लवकरात लवकर या प्रश्नांकडे लक्ष द्यावे अशी मागणी स्थानिक नागरिक करत आहेत. उरण पूर्व विभागातील खोपटा पूल हा कोप्रोली, पिरकोन, आवरे, गोवठणे, वशेणी, पाले, मोठी जुई, कळंबुसरे, चिरनेर पेण, अलिबाग तालुक्यातील गावांना उरण पश्चिम विभाग, उरण शहर, पनवेल,नवी मुंबई व मुंबईशी जोडणारा अविभाज्य घटक आहे.

> खोपटा कोप्रोली मार्ग पूर्व विभाग पेण अलिबाग, मुंबई, नवी मुंबई व पनवेलशी जोडणारा दुवा आहे. त्यामुळे नेहमी प्रवास करतो, मात्र या रस्त्याची दुरवस्था झाली आहे व खड्ड्यांचे विघ्न या रस्त्यावर पाहायला मिळतं आहे. यामुळे कित्येक दुचाकीस्वार या रस्त्यावर पडतं आहेत. विशेषत: रात्रीच्या वेळी रस्त्याचा अंदाज येत नसल्याने ही अडचण निर्माण होत आहे.
>
> – केशव म्हात्रे
> खोपटे – द.पी.पाडा

एवढा महत्वाचा मार्ग असणाऱ्या रस्त्याची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली आहे. कोप्रोली- खोपटापूल रस्त्यासाठी निधी मंजूर केला होता. ३ कोटी ७५ लाखांच्या निधीतून नेमलेल्या ठेकेदारांनी रस्त्याचे डांबरीकरण व काम अंत्यत निकृष्ट दर्जाचे केले होते. रस्त्याची दुरवस्था झाली आहे. या रस्त्याच्या दुरवस्थेवर प्रवासी नाराजी व्यक्त करीत आहेत. या रस्त्यावर अपघात वाढत असून जीव गमवावा लागेल, अशी भीती प्रवासी व्यक्त करीत आहेत. विशेषतः रात्रीच्या वेळी प्रवाशांना अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. पूर्वी संबधित रस्त्यांचे काम एनएचएआयला हस्तांतरित करण्यात आले होते व त्यांच्या माध्यमातून रस्त्याचे काम करण्यात आले होते.

खोपटा कोप्रोली रोडचे काम पुन्हा सार्वजनिक बांधकाम विभागाला हस्तांतरित झाले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून या रस्त्यावरील खड्डे बुजवले होते , मात्र ही खडी निघून गेल्यानंतर रस्त्याची स्थिती पुन्हा खड्डेमय झाली आहे. पावसाळ्यात रस्त्याची कामे घेता येत नाहीत ती पावसाळा संपल्यावर करण्यात येईल, असे बांधकाम विभागाच्या माध्यमातून सांगण्यात आले होते.

### मोफत ब्लॅकेट वाटप

**। रसायनी । वार्ताहर ।**

रसायनी लायन्स क्लबतर्फे पराडेवाडी येथे मुंबई लायन्स क्लबचेदिनेशरॉययांच्याकुटूंबाच्या वतीने १३० आदिवासी बांधवांना उबदार ब्लॅकेटचे वाटप करण्यात आले. आदिवासी बांधवांना ऐन थंडीत उबदार ब्लँकेट मिळाल्याने त्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे वातावरण दिसून आले. या कार्यक्रमासाठी डिस्ट्रिक्ट लॉयन्स गव्हर्नर संजीव सुर्यवंशी, लॉयन्स गण्णाप्रा, लायन्स अलोक मेहता, लॉयन्स ज्योती देशमाने, नागेश देशमाने, खालापूर लॉयन्स किशोर पाटील आदी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रसायनी लॉयन्स क्लबचे अध्यक्ष दत्तात्रेय जांभळे, लॉयन्स स्वप्निल जांभळे, राम जाधव, हरेश पाटील, नितिन पाटील, चेतन जाधव, अनिल जांभळे, राजेश जांभळे यांच्यासह पराडेवाडी ग्रामस्थांचे सहकार्य लाभले.

# संशय फिटायलाच हवा

सोलापूर जिल्ह्यातील मारकडवाडी सध्या देशभर गाजते आहे. इथून शरद पवार गटाचे उत्तम जानकर निवडून गेले आहेत. मात्र मारकडवाडीमध्ये आपल्याला अपेक्षेपेक्षा कमी मतदान झाले असे त्यांचे म्हणणे आहे. गावकऱ्यांचाही तोच दावा आहे. त्यामुळे त्यांनी पूर्वीच्या रीतीने मतपत्रिकांवर शिक्का मारून मतदान करण्याचे ठरवले. हे एक अभिनव आंदोलन होते. मात्र त्याला घटनाविरोधी ठरवण्यात आले. लोकांवर गुन्हे दाखल करण्याचा इशारा देण्यात आला. त्यामुळे हे निषेधात्मक मतदान बारगळले. मात्र जनतेतील असंतोष आणि अस्वस्थता कायम आहे. रविवारी शरद पवार यांनी या गावाला भेट दिली. त्यावेळी जानकर यांनी आमदारकीचा राजीनामा देऊ केला. निवडणूक आयोग इव्हीएमऐवजी जुन्या पद्धतीने मतदान घेणार असेल तर आपण पुन्हा निवडणूक लढायला तयार आहोत असे त्यांचे म्हणणे आहे. सत्ताधारी युतीच्या नेत्यांनी यावर टीका केली आहे. विरोधकांना पराभव पचवता येत नाही, म्हणून ते सबबी सांगत आहेत असे त्यांचे म्हणणे आहे. पण विरोधकांना धडा शिकवण्याची एक चांगली संधी युतीकडे आहे. राज्यात सध्या युतीची जोरदार लाट आहेच. माळशिरसची जागा गमावली होती तीही युतीला परत मिळवण्याची संधी आहे. त्यासाठी त्यांना केवळ एकदाच जुन्या रीतीने मतपत्रिकेवर शिक्के मारून मतदान घ्यायचे आहे. मात्र युतीचे सरकार आणि निवडणूक आयोग याला तयार नाही. कारण, ते दोघेही या परीक्षेला घाबरत आहेत. या परिक्षेमध्ये समजा महाविकास आघाडीला अधिक मते मिळाली तर इव्हीएमचे भांडे फुटणार आहे. राज्यभरात ते अभूतपूर्व आणि राक्षसी मतदान झाले आहे त्यावरच प्रश्नचिन्ह निर्माण होणार आहे. यावेळच्या निवडणुकीत जानकर यांना विजयसिंह मोहिते पाटील गटाचा पाठिंबा होता. त्यामुळे आपल्याला एक लाख मतांची आघाडी मिळेल असे त्यांना वाटत होते. प्रत्यक्षात ते जेमतेम तेरा हजार मतांनी विजयी झाले. शिवाय, मारकडवाडी हा बालेकिल्ला असतानाही तेथे सातपुते यांना आघाडी मिळाली.

### मारकडवाडीपलिकडे...

हा प्रतिष्ठेचा मुद्दा करून जानकर व शरद पवार यांनी मारकडवाडीला देशाच्या नकाशावर आणि राष्ट्रीय बातम्यांमध्ये आणले आहे. सोलापूरच्या जिल्हाधिकाऱ्यांनी याबाबत खुलासा केलेला आहे. मतदानयंत्राची चाचणी घेताना व नंतर मतदानादरम्यान सर्व राजकीय पक्षांचे पोलिंग एजंट हजर होते व त्यांनी सह्या केलेल्या आहेत असे त्यांचे म्हणणे आहे. मात्र मतदानयंत्रांमध्ये हॅकिंग केले जाते, मते कोणालाही परडलेली दिसत असली तरी प्रत्यक्षात ती दुसऱ्याच उमेदवाराला जातात असा मोठा संशय लोकांच्या मनात आहे. त्याचे निराकरण होणे अत्यंत गरजेचे आहे. मतदानयंत्रामध्ये काहीही घोळ किंवा लबाडी नाही असे गृहित धरून चालले तरी लोकांच्या मनात त्याबाबत प्रचंड शंका आहेत ही वस्तुस्थिती आहे. प्रत्येक निवडणुकीत थोड्याफार फरकाने या शंका व्यक्त होत असतात. मात्र महाराष्ट्रात ज्या एकतर्फीपणे निकाल लागले आहेत ते पाहता राज्यच नव्हे तर देशभरातील जनतेला धक्का बसला. यामुळे निर्माण झालेली अस्वस्थता झटकून टाकणे हे सत्ताधाऱ्यांना सोईचे आहे. चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासारखे लोक तर शरद पवारांना अक्कल शिकवत आहेत. पवारांचे डोके ठिकाणावर नाही असे म्हणत आहे. ही गुर्मी राक्षसी बहुमतामधून आली आहे. वास्तविक निवडणूक प्रक्रिया ही पूर्णपण निर्दोष असायला हवी व लोकांना तिच्यावर पूर्णपणे भरवसा हवा. ही यंत्रणा लोकांसाठी असेल तर लोकांचा तिच्यावर पूर्ण विश्वास हवा. समजा काँग्रेस, शरद पवार वा ठाकरे हे आपल्या स्वार्थासाठी काही भूमिका घेत असतील तर त्याकडे दुर्लक्ष करता येईल. पण जनतेतच जर अस्वस्थता व संशय राहिला तर ते लोकशाहीसाठी घातक आहे. ती दूर करणे हे निवडणूक आयोग, न्यायालये या सर्वांचे कर्तव्य आहे. त्यासाठी निवडणूक यंत्रणेबाबत घेतल्या जाणाऱ्या प्रत्येक बारीकसारीक आक्षेपांचे निरसन झालेच पाहिजे. ते वारंवार केले जायला हवे.

### पोस्टाद्वारे होणारे मतदान

सरकार लाडकी बहीण सारख्या योजनांच्या प्रसिध्दीसाठी अडीचशे कोटी रुपये खर्च करू शकते. तेच सरकार या शंकानिरसनासाठी शंभर कोटी रुपये द्यायला तयार होईल. त्याने ते द्यायला हवेत. मूळ गावात नसलेले सैन्यातले जवान, सरकारी कर्मचारी व अन्य लोक पोस्टाने मतदान करतात. याला पोस्टल बॅलेट म्हणतात. साधारण ही मते आणि सर्वसाधारण यंत्रातून टाकली जाणारी मते यांचा कल एकाच दिशेने असतो. यंदा मात्र बहुतांश ठिकाणी पोस्टल मतदान महाविकास आघाडीला झालेले असताना तिथे युतीला प्रचंड बहुमत मिळाल्याचे दिसते आहे. नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीची तर सर्वत्र चर्चा आहे. विधानसभेच्या जोडीनेच या पोटनिवडणुकीचे मतदान झाले. लोकसभेत काँग्रेसचे उमेदवार निवडून आले. मात्र नांदेड लोकसभेअंतर्गत येणाऱ्या सहाही विधानसभा मतदारसंघात महायुतीने मोठा विजय मिळवला. नांदेड लोकसभेत पोस्टल मतदान जवळपास पूर्णपणे काँग्रेसच्या बाजूने पडले व त्यामुळेच अंतिमतः काँग्रेस उमेदवार जिंकला. याबाबत सर्वांनीच आश्चर्य व्यक्त केले आहे. बूथमध्ये गेल्यानंतर एकाच वेळी लोकसभा व विधानसभा अशा दोन्हीसाठी मतदान करायचे होते. अशा वेळी दोन्ही मते एकाच पक्षाला देण्याकडे साधारण कल आढळतो. याचे भरपूर अभ्यास व सर्वेक्षणेही झालेली आहेत. नांदेडमध्ये मात्र विपरीत घडले. लाखो मतदारांपैकी जवळपास नव्वद टक्के लोकांनी लोकसभेसाठी काँग्रेसला आणि विधानसभेसाठी महायुतीला असा नीट फरक करून मतदान केले असे इथला निकाल सांगतो. हे अर्थातच विश्वास बसू नये असे आहे. त्यामुळे आम जनतेमध्ये नक्कीच हा मुद्दा आहे. महाविकास आघाडीने त्याच्या आधारे लोकांना जरूर संघटित करायला हवे. मात्र यासाठी इव्हीएममध्ये कोणत्या प्रकारे घोटाळे होऊ शकतात याचे सविस्तर निवेदन प्रसृत करायला हवे. शिवाय, निवडणूक आयोगाने सत्ताधाऱ्यांना दिलेले झुकते माप, जप्त केलेल्या पैशांचा न दिलेला हिशेब इत्यादींचा उदाहरणांसहित पाढा वाचायला हवा. ढोबळ आणि तेचतेच आरोप करून भागणार नाही. याबाबत योग्य आखणी करून राज्यभर रान उठवायला हवे.

## विचार

# पुन्हा पुन्हा इव्हीएमवर निशाणा...

**महागाई, दरवाढ, परकीय गुंतवणूक या नियमित विषयांपलिकडच्या काही बातम्या सरत्या काळात नजरेत भरल्या. भारतीय ग्रीसमध्ये सर्वाधिक मालमत्ता खरेदी करत असल्याची बातमी त्यापैकी एक. मायक्रोसॉफ्ट, ॲपलपेक्षा अरामकोचा नफा जगात सर्वाधिक असल्याची वार्ताही अशीच. 'मूडीज'ने अदानींचा मूड खराब केल्याची लक्षवेधी बातमीही अशीच. दरम्यान, दूरसंचार क्षेत्रात एक लाख नवीन नोकऱ्या निर्माण होणार आहेत.**

शंतनु चिंचाळकर

निवडणूक आयोगाने इव्हीएम प्रणालीची विश्वासार्हता आणि पारदर्शकता वेळोवेळी सिद्ध केली आहे. लोकसभेच्या, राज्यांमधल्या निवडणुका इव्हीएमद्वारेच घेतल्या जातात. आता महाराष्ट्रामध्ये महाविकास आघाडीच्या दारुण पराभवानंतर अनेक नेत्यांकडून या प्रणालीवर संशय घेतला जात आहे. पराभव झाल्यानंतरच असा संशय घेणे आणि जनमताचा कौल मान्य करण्याऐवजी हा पर्याय निवडणे मतदारांनाही कोड्यात पाडणारा आहे.

१३ मे रोजी पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीच्या निकालांचा आनंद लुटणारे विरोधक २० नोव्हेंबर रोजी पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीच्या अनपेक्षित निकालाने संभ्रमित झाले. निवडणूक आयोगाने वारंवार प्रणालीद्वारे होत असलेल्या मतदान प्रक्रियेतील पारदर्शकता आणि विश्वासार्हता वेळोवेळी सिद्ध केली असतानाही संशय घेणे, अभ्यासू आणि जाणकार मतदारांनादेखील रुचेल की नाही ही शंका आहे. कोट्यवधी मतदार आणि शेकडो पक्ष अशा प्रचंड पसाऱ्यात भारतातील निवडणुका होत असतात. त्यांचा ठराविक असा कार्यकाळ नाही. त्यामुळे भारतात पूर्ण वर्षभर कोणत्या ना कोणत्या राज्यात निवडणुका होत असतात. लोकसभेच्या, विविध राज्यांमधल्या विधानसभेच्या आणि महानगरपालिकांच्याही निवडणुकाही आता इलेक्ट्रॉनिक वोटिंग मशिनद्वारेच घेतल्या जाऊ लागल्या आहेत. या इव्हीएम मशिन्सबाबत मतदारांमध्ये नेहमीच कुतूहल आणि विरोधकांमध्ये नेहमीच संशय राहिला आहे. निवडणूक आयोगाच्या मते निवडणुकीच्या किचकट आणि आव्हानात्मक प्रक्रियेत मतदार हा केंद्रस्थानी असतो आणि मतांचं पावित्र्य हा सगळ्यात संवेदनशील मुद्दा आहे. असे असतानाही महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर महाविकास आघाडीतल्या अनेक नेत्यांनी इव्हीएम मशिन्सवर संशय व्यक्त केला. लोकसभा निवडणुकीमध्ये महाराष्ट्रात आघाडीला मिळालेले यश आणि केवळ सहा महिन्यांमध्येच आघाडीचा झालेला दारुण पराभव, या घटनांमुळे आघाडीच्या ज्येष्ठ नेत्यांकडून प्रणालीवर संशय घेतला जात आहे.

जून २०२४ च्या लोकसभेच्या निवडणुकीत 'अब की बार ४०० पार'चा नारा देऊन मैदानात उतरलेल्या भाजपला स्वबळावर सरकार स्थापन करता आले नाही. केंद्रात भाजप आणि मित्रपक्षांचे सरकार स्थापन झाले असले, तरी महाराष्ट्रात युतीला १८ आणि आघाडीला ३० जागा मिळणे अनपेक्षित होते. मतदानाची घसरलेली टक्केवारी असेल, भाजपला संविधान बदलायचे आहे हा विरोधकांकडून झालेला अपप्रचार असेल किंवा इतरही काही कारणे असतील, भाजपने पराभव मान्य केला. आजवर ज्या ज्या वेळी दिल्ली, पंजाब, केरळसारख्या राज्यांमध्ये दारुण पराभव झाला; भाजपने आत्मचिंतनाद्वारे पराभवाची कारणे समजून घेण्याचा प्रयत्न केला. २०१७ मध्ये झालेल्या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांमध्येही भाजपचा दारुण पराभव झाला होता.

आपण निवडणुका जिंकतो तेव्हा प्रणाली चांगली असते आणि हरतो तेव्हा त्यात काही तरी गडबड केलेली असते, हा अजब तर्क २०१४ पासून आजवर, म्हणजे गेली दहा वर्षे इव्हीएम मशिन्सविरोधी पक्षांनी उचलून धरला आहे आणि त्याद्वारे मतदानाला नेहमी विरोध दर्शवला आहे. तेच रडगाणे नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्रातील विधानसभेच्या निकालांवरून सुरू केले आहे. इव्हीएम मशिन्सद्वारे घेतलेल्या मतदानाने आजवर तीन तीन निवडणुका जिंकणारे नेते, आज त्याच प्रणालीकडे संशयाने पाहू लागले आहेत. एके काळी एकाच वेळी झालेल्या पाच राज्यांच्या आणि झारखंडमध्ये भाजपच्या झालेल्या पराभवाकडे त्यांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आहे. खरे तर भारतात सध्या लोकशाही पद्धतीने आणि निष्पक्षपातीपणे निवडणुका पार पाडण्यासाठी वापरात असलेली ही प्रणाली आदर्श मानावी लागेल.

भारतामध्ये अखंडतेने मुक्त आणि निष्पक्ष निवडणुका पार पाडण्यासाठी भारतीय निवडणूक आयोगाला जागतिक स्तरावर 'गोल्ड स्टँडर्ड' म्हणून ओळखले जाते. आयोगाने निवडणुकीच्या कार्यक्षम, सुरळीत आणि व्यावसायिक वर्तनाचे नेहमीच उच्च दर्जाचे मानक स्थापित केले आहेत आणि निवडणूक प्रक्रिया आणि प्रणाली सुधारण्यासाठी नवीनतम प्रगत तंत्रज्ञान स्वीकारण्यात, अवलंबण्यात आणि अंमलात आणण्यात आयोग आघाडीवर आहे. गेल्या वीस वर्षांमध्ये आयोगाने इव्हीएम मशिन्सचा वापर करून राज्य विधानसभेच्या १०७ आणि तीन लोकसभा निवडणुका यशस्वीपणे पार पाडल्या आहेत. सप्टेंबर २०१३ पासून, मतदान प्रक्रियेतील पारदर्शकता आणि विश्वासार्हता वाढवण्यासाठी विविध राज्यांच्या विधानसभा आणि संसदीय मतदारसंघांमध्ये व्होटर व्हेरिफायेबल पेपर ऑडिट ट्रेल (व्हीव्हीपॅट) मशिन्सचाही वापर करण्यात आला आहे.

मार्च २०१७ मध्ये पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचे (यूपी, उत्तराखंड, पंजाब, गोवा आणि मणिपूर) निकाल जाहीर झाल्यानंतर ईव्हीएमच्या कार्यप्रणालीवर काही शंका उपस्थित झाल्या होत्या. या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचे निकाल जाहीर झाल्यानंतर काही तक्रारी आणि सूचना आयोगाला प्राप्त झाल्या. आयोगाने या तक्रारींची रीतसर तपासणी केली आणि दाव्यांना समर्थन देणारे पुरावे आणि विश्वासार्ह सामग्रीची माहिती मागितली, परंतु तक्रारकर्त्यांनी कोणतेही पुरावे दिले नाहीत. तेरा राजकीय पक्षांच्या गटाने दहा एप्रिल २०१७ रोजी आयोगाची भेट घेतली आणि ईव्हीएमच्या वापराबाबत काही आक्षेप व्यक्त केले. काही राजकीय पक्षांनी एप्रिल २०१७ च्या पहिल्या आठवड्यात झालेल्या भिंड (पंजाब) आणि ढोलपूर (राजस्थान) पोटनिवडणुकीत ३१ मार्च २०१७ रोजी (वास्तविक मतदानात नाही) वापरल्या गेलेल्या संबंधित घटनांबद्दलदेखील प्रश्न उपस्थित केले. राजकीय पक्षांच्या चिंता समजून घेण्यासाठी आयोगाने सर्वपक्षीय बैठक बोलावली. त्याच दिवशी पुढील परिणामांसाठी एक प्रेस स्टेटमेंटदेखील जारी करण्यात आले.

आयोगाने राजकीय पक्षांसमोर सांगितले की भविष्यातील सर्व निवडणुका अनिवार्यपणे ईव्हीएमद्वारे घेतल्या जातील. भविष्यातील सर्व निवडणुकांमध्ये सर्व मतदान केंद्रांवर सोबत मशिन्सचा वापर केल्याने -आधारित मतदान व्यवस्थेत कमालीची पारदर्शकता आणि विश्वासार्हता येईल, असा आयोगाचा ठाम विश्वास आहे. प्रत्येक मतदाराला आपले मत योग्य उमेदवाराला गेले आहे की नाही हे व्हीव्हीपॅटमध्ये पाहणे शक्य होईल. आयोगाने या प्रणालीवर विश्वास व्यक्त केला आहे आणि ईव्हीएमची अखंडता, गैरछेडछाड आणि विश्वासार्हता यावर आयोगाचा ठाम विश्वास आहे. आयोगाने ईव्हीएमचे उत्पादन, वाहतूक, स्टोरेज, मतदान आणि मतमोजणी प्रक्रियेदरम्यान कोणत्याही प्रकारच्या छेडछाडीपासून संरक्षणाची नेहमी हमी दिली आहे. तरीही या प्रणालीची अखंडता आणि विश्वासार्हता आणखी कशी सुधारता येईल, याविषयी सर्व राजकीय पक्षांच्या सूचना प्राप्त करण्याची ग्वाही आयोगाने आजवर दिली. ईव्हीएमच्या कामकाजाबाबत कोणत्याही प्रकारे संशयाची छटाही जाणवू देणार नाही, हा विश्वासही आयोगाने दिला आहे.

बॅलेट पेपरद्वारे मतदान घ्यायचा विरोधकांचा आग्रह आश्चर्यजनक म्हणावा लागेल. बिहार आणि उत्तर प्रदेशसारख्या काही राज्यांमध्ये मतपेट्या पळवणे, निवडणूक अधिकाऱ्यांना धमकावून मतदान केंद्रे ताब्यात घेणे, मतदारांनी प्रत्यक्षात मतदान केले नसतानाही बॅलेट पेपरवर हव्या त्या उमेदवाराच्या चिन्हावर शिक्के मारणे आणि काही परिस्थितीत तर मतपेट्या चक्क पळवून नेणे, असे प्रकार पूर्वी घडलेले आहेत. अशा परिस्थितीत मतदान प्रक्रियेत पारदर्शकता आणि विश्वासार्हता येण्याच्या दृष्टीने अस्तित्वात आणलेल्या ईव्हीएमप्रणालीचे स्वागतच व्हायला हवे. असे असूनही अलिकडच्या काळात ईव्हीएम मशिन हॅक होऊ शकते का, हा चर्चेचा विषय बनला. बीबीसीचे प्रतिनिधी सौतिक बिस्वास यांनी २०१९ च्या निवडणुकांवेळीही सखोल आढावा घेतला होता. त्यांच्या मते निवडणूक आयोग ही स्वतंत्र स्वायत्त संस्था आहे. मतदान करताना मतदार मशीनवरचे बटण दाबून आपले मत नोंदवतात. आणखी एका बटणाद्वारे, मतदान अधिकारी मतदानाची प्रक्रिया पूर्ण करतात. मतदानाची वेळ संपल्यानंतर हे बटन दाबून प्रक्रिया थांबवली जाते. याव्यतिरिक्त मतदान केंद्र ताब्यात घेतल्यास किंवा मतदान प्रक्रियेत बाधा आणल्यास हे बटन दाबून प्रक्रिया थांबवली जाते. मतदान यंत्राबरोबर कोणतीही छेडछाड होऊ नये यासाठी मतदान अधिकारी लाखेने सीलबंद करतात. निवडणूक आयोगातर्फे पुरवण्यात आलेल्या खास धाग्याने ते बांधले जाते. याला एक सीरियल नंबर दिला जातो. या मशिन्समुळे वेळ वाचतो, तीन ते पाच तासात गणना होऊन एकेका मतदारसंघातील यंत्रातील मतांचा निकाल लागू शकतो. कागदी मतपत्रिका असताना यासाठी ४० तास लागत असत. इव्हीएम मशीन्समुळे अवैध मतांचा मुद्दा निकाली निघाला आहे. यामुळे होणारा पैशाचा अपव्ययही टळला आहे. आयोगाच्या मते इतक्या पारदर्शक आणि सुटसुटीत प्रणालीवर संशय घेणे अनाकलनीय आहे. ईव्हीएमद्वारे घेतलेल्या मतदानाने आजवर तीन तीन निवडणुका जिंकणारे नेते आज या प्रणालीकडे संशयाने पाहू लागले आहेत. या दुटप्पीपणाचे कुठेतरी उत्तर द्यावेच लागेल.

## आजकाल

# समाधी घेऊन जाई ज्ञानदेव

डॉ. प्रतिमा जगताप

गुरुवार सकाळची प्रसन्न वेळ. 'विविध भारती'च्या पुणे केंद्रावर सात वाजून ४५ मिनिटांनी मराठी भक्तिगीतांचा कार्यक्रम सुरू झाला. एक एक गीत प्रसारित होत होतं. गुरुवार असल्यामुळे श्री दत्तगुरूंचं भजन... त्यानंतर थोड्या जाहिराती, पुन्हा एकदा एक भक्तिगीत, त्यानंतर ठळक बातम्या... अशा क्रमानं कार्यक्रम सुरू होता आणि शेवटचं भक्तिगीत सुरू झालं. मंदिरातला घंटानाद आणि अतिशय व्याकूळ करणारी बासरी... बासरीमागून सुमन कल्याणपूर यांच्या गोड गळ्यातून अवतरले अशोकजी परांजपे यांचे बोल...

**समाधी घेऊन जाई ज्ञानदेव**
**सोहळा अपूर्व जाहला गे माये...**

काळजातून दु:खाची एक कळ उमटली, गळ्यात हुंदका दाटून आला... मन:चक्षूंपुढे उभी राहिली ज्ञानेश्वर माऊलींची मूर्ती... कमलाकर भागवत यांच्या अपूर्व संगीतरचनेनं, सुमनताईंच्या कमालीच्या भावविव्हळ स्वरांमधून आणि अशोकजी परांजपे यांच्या कवितेतून संजीवन समाधी सोहळ्याचं वर्णन याचि देही याचि डोळा मी अनुभवत होते. पुणे आकाशवाणीवर उद्घोषिका म्हणून कार्यरत असल्याने कितीतरी वेळा हे गीत प्रसारित केलं होतं; पण माऊलींच्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त हे गीत प्रसारित होत असताना आणि मी घरी बसून ऐकताना त्या गीतातून भावसमाधी अनुभवत होते. एकेक कडवं पुढे जात होतं, नव्हे माऊलींचं समाधीस्थळाकडं प्रस्थान होत होतं. आपणही समाधी सोहळ्यास उपस्थित आहोत, असं वाटत होतं... खरं म्हणजे ही शब्दांची, स्वरांची आणि सुरांची ताकद होती. सुमनताई गात होत्या...

**निवृत्तिनाथांनी चालविले हाती**
**पाहूनी ती मूर्ती धन्य वाटे**
**आपण निर्गुण मागे परि रान**
**विश्वाचे कल्याण निरुपण...**

अवघ्या विश्वाचं कल्याण व्हावं, असं पसायदान मागणारी ज्ञानेश्वरमाऊली निघाली होती, शांतपणे समाधिस्त होण्यासाठी... समाधी घेण्यापूर्वी माउलीनं वर्षभर तीर्थयात्रा केली होती. पंढरपूरला कार्तिकी एकादशीची यात्रा आटोपली आणि संतसज्जनांसह आळंदीला परत आले. समाधी घेण्याची तयारी सुरू झाली. यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान आणि शेवटची पायरी 'समाधी' असं अष्टांगयोगात मानलं जातं. असं म्हणतात, विवेकजागृतीनं ज्ञानप्राप्ती झाल्यानंतर फलेच्छेचा त्याग करणाऱ्यालाच समाधी प्राप्त होते. ज्ञानप्राप्ती, पण ती कशी? तर विवेकजागृतीनं. किती महत्त्वपूर्ण आहे ही गोष्ट! ज्ञान मिळवण्याच्या नादात कितीतरी अविवेकी गोष्टी करणाऱ्या आजच्या संगणक युगातील ज्ञानीजनांनी ही गोष्ट लक्षात घ्यायला हवी असं मला क्षणभर वाटलं. गाणं सुरू होतं... संजीवन समाधी सोहळ्याचा प्रसंग गीतामधून मी अनुभवत होते. पुढचं कडवं सुरू झालं होतं...

**सोपान मुक्ताई जाहली व्याकूळ**
**मायेचे हे बळ राया बोले**
**ब्रह्माशी ही गाठ अमृताचे ताट**
**फुटली पहाट ब्रह्मज्ञान...**

निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताई या भावंडांबद्दल बालपणापासून ऐकलं, वाचलं होतं. पुन्हा पुन्हा त्या प्रसंगाशी मन घोटाळत राहतं. डोळ्यापुढं दिसते इवलीशी मुक्ता. ज्ञानदेवांच्या खांद्याला झोळी. त्या झोळीत काहीच पडलेलं नसतं. त्या दिवशी घरा-घरातून त्या बालजिवांची झालेली उपेक्षा, अवहेलना... ज्ञानोबाला सहन होत नाही सारं... तो झोपडीचं दार बंद करून घेतो... मनाचंही कवाड बंद करून घेतो... मुक्ताई बावरते, घाबरते. ज्ञानादादा ताटी उघडा म्हणते... रागावू नको म्हणते. 'विश्व रागे झाले वन्ही। संत सुखे व्हावे पाणी' असं म्हणत 'ताटी उघडा ज्ञानेश्वरा...' अशी आर्त हाक देते... गाणं ऐकता ऐकता सगळं सगळं आठवत राहतं. मनात विचार चमकून जातो, किती छळलं समाजानं या चिमुकल्यांना! त्यांचा दोष कोणता? दु:खाच्या, अपमानाच्या डागण्या दिलेल्या समाजाबद्दल मनात यत्किंचितही राग न ठेवता सर्वांच्या कल्याणाची त्या परमेश्वराकडे प्रार्थना करणारी, पसायदान मागणारी ज्ञानेश्वर माऊली समाधिस्त होणार होती. आळंदीत ग्रामदैवत श्री सिद्धेश्वराजवळ समाधीची जागा निश्चित झाली. नामदेवांनी आपल्या मुलांसह समाधीची जागा स्वच्छ केली. नामदेवगाथेत वर्णन केल्याप्रमाणे बेल, तुळशी आणि निरगुडीच्या पानांचं आसन तयार केलं होतं.

**चिद्रत्न आसन उन्मनीची धुनी।**
**समाधी सज्जनी पाहियेली।**
**धुवट वस्त्राची घडी ते अमोल।**
**तुळशी आणि बेल आंथरिले।**

नामदेवगाथेत माउलींच्या संजीवन समाधीचं वर्णन करणारे अभंग आहेत. ते वाचताना आपले डोळे भरून येतात. अशोकजी परांजपे यांनी लिहिलेली ही रचना ऐकताना असं वाटतं, की एकदा तरी या कवीची भेट व्हायला हवी होती. त्यांनी ही कविता लिहिताना अश्रूंना आवर कसा घातला असेल, हे विचारलं असतं.

**नीर वाहे डोळा वैष्णव नाचतो**
**वैकुंठासी जातो ज्ञानराया**
**सोन्याचा पिंपळ झालासे निश्चल**
**सज्जनांचे बळ समाधान।**

या कडव्यातील 'निश्चल' हा शब्द सुमनताईंनी असा काही उच्चारला आहे, की ज्ञानदेवांच्या समाधीनंतर सर्वत्र कशी नि:शब्दता, नीरवता आणि नि:स्तब्धता पसरली याचा अनुभव येतो.

**गुरू देई शिष्य समाधी आपण**
**देवा ऐसे मन का बा केले?**
**पद्माचे आसन घालविले जाण**
**ओंकार ते पूर्ण पंचप्राण...**

या कडव्यानंतर सुमनताईंचा स्वर बदलतो. संगीतरचना बदलते. सनईच्या करुण रसानं ओतप्रोत असा सूर सुमनताईंच्या स्वरांत मिसळतो. कवीचे शब्द वर्णन करण्यासाठी सज्ज होतात...

**पैलतीरी हाक आली आज कानी**
**करूनि निर्वाणी बोलविले**

**ज्ञानाचा पुतळा तेजी विसावला**
**कैवल्यचि झाला भक्तजन...**

गाण्याच्या शेवटी समूहस्वरातला हरिओम व्याकूळ मनाला शांती देणारा... माझंही मन शांत झालं... डोळ्यांतल्या अश्रूंना तसंच वाहू दिलं... हात जोडले... डोळे मिटले... डोळ्यापुढे होती पद्मासनात बसलेली शांत मुद्रा ल्यालेली ज्ञानेश्वर माऊलींची प्रतिमा! समाजकंटकांनी, दुष्टांनी केलेले अपमान, अवहेलना विसरून सर्वांच्या कल्याणासाठी पसायदान मागणारी ज्ञानेश्वर माऊली पाहता पाहता संजीवन समाधी सोहळ्यात मी ही नकळत सहभागी झाले... स्वत:ला विसरून गेले... दिवसभर माझं मन मात्र या एकाच भावव्याकुळ गीताभोवती घोटाळत राहिलं. कानात शब्दस्वरांचा अलौकिक संजीवन सोहळा सुरूच होता. नामदेवांच्या अभंगाच्या ओळी आठवत होत्या.

**अजानवृक्षदंड आरोग्य अपार।**
**समाधीसमोर स्थापियेला।**
**कोरड्या काष्टी फुटियेला पाला।**
**तेव्हा अवधियाला नमस्कारी।।**

असं म्हणतात, की ज्ञानदेवांच्या समाधीजवळ अजानवृक्षाची फांदी रोवून ठेवली होती. तिला पुन्हा पालवी फुटली. हे संजीवन समाधीचं महत्त्वाचं लक्षण मानलं गेलं. कार्तिक वद्य त्रयोदशी शके १२१६... हाच तो दिवस... सर्व संतांच्या साक्षीनं माऊलीनं संजीवन समाधी घेतली. इतक्या शतकांनंतरही माऊलींच्या प्रति असलेला भक्तिभाव आजही आपल्याला भक्तजनांच्या मनात जागृत असलेला दिसतो. अवघा आळंदीचा परिसर वैष्णवांच्या गर्दीनं फुलून आलेला दिसतो. म्हणून तर अशोकजी परांजपे यांच्या शब्दांतून अवतरलेलं संजीवन समाधी सोहळ्याचं गीतसुद्धा किती अपूर्व आहे, याची मनाला साक्ष पटते. कमलाकर भागवत यांनी स्वरबद्ध केलेली आणि सुमन कल्याणपूर यांनी गायिलेली ही कविता ज्ञानेश्वरमाऊलींसाठी वाहणारी शब्दस्वरांची इंद्रायणीच वाटते...

**समाधी घेऊन जाई ज्ञानदेव**
**सोहळा अपूर्व झाला गे माये...**

संपर्क : ९४२२२ ९२३८४

(लेखिका पुणे आकाशवाणी केंद्रातून वरिष्ठ उद्घोषिका म्हणून सेवानिवृत्त झाल्या आहेत.)

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**१० डिसेंबर**

**१८८०:-** लेखक, प्राच्यविद्या संशोधक डॉ. श्रीपाद कृष्ण बेलवलकर यांचा जन्म. 'गीता व अभिज्ञान शांकुतल' या ग्रंथासह महाभारतातील भीष्मपर्व व शांतिपर्व याचे संपादन त्यांनी केले. **१८९४:-** लेखक प्राचार्य परशुराम महादेव लिमये यांचा जन्म. 'भारतीय शासनपद्धती व शासनविषयक कल्पना' हे त्यांचे महत्त्वपूर्ण पुस्तक. **१९१४ :-** कथा, काव्य आणि बालसाहित्य आदी स्वरुपाचे लेखन करणारे नरहर दिनकर दुगल यांचा ह्यांच्या बालकुमार साहित्य संपदेत 'आधुनिक सांदीपनी आश्रम', 'कुमार पुस्तक', 'गुलाबी कावा', 'सॅम हॅपी' इ. तसेच 'एक होती सिंहीण', 'मंगलवाडी' ही कादंबरी, 'देशप्रेमा तुझे नाव सावरकर' हे स्वा. सावरकरांचे चरित्र, 'मंतरलेली तलवार' ही नाटिका अशी साहित्य संपदा. **१९२३ :-** सामाजिक शास्त्रावर लेखन करणारे प्रा. डॉ. माधव गुरुराव कुलकर्णी यांचा जन्म. 'भारतीय समाज', 'भारतीय समाजव्यवस्था' ह्या पाठयपुस्तकांचे लेखन त्यांनी केले आहे. **१९२६ :-** कथा, कादंबरी, एकांकिका, प्रवासवर्णन आदी स्वरुपाचे लेखन करणाऱ्या प्रा. शकुंतला सदाशिव खोत यांचा जन्म. ह्यांनी 'तू दूर दूर तेथे', 'तुळशीपत्र' या कादंबऱ्यातून स्त्रीमनाच्या व्यथा, 'नवरंग', 'निळे डोळे', 'मोतिया', 'सोनेरी पाने' हा कथासंग्रह आणि 'नाट्यस्वगत स्वरुप आणि समस्या' हा मराठी नाटकांतील स्वगतांचा सर्वांगीण अभ्यास करणारा ग्रंथ अशी साहित्य संपदा. **१९२७:-** सृजनशील साहित्यिक, कवी विश्वासकुमार तथा गायकवाड संपत विश्वासराव यांचा जन्म. ह्यांची 'आले तुझिया दारी' ही आंतरजातीय विवाहावर, 'जोडीदारीण' ही कुष्ठरोगावर, 'वाघीण' ही हुंडा विरोधी चळवळीवर बेतलेल्या कादंबऱ्यांसह 'जाता साताऱ्याला' हा कथासंग्रह, 'पाणी लाजते' हा काव्यसंग्रह, 'मजेदार गोष्टी', 'मुलांचा मेवा' हे बालसाहित्य आणि विकास शालेय दैनंदिन परिपाठ अशी साहित्य संपदा. **१९३६:-** नभोनाट्य लेखिका पुष्पा वसंत काणे यांचा जन्म. ह्यांची 'तुषार्त' ही कादंबरी प्रकाशित झाली आहे. **१९३८ :-** लेखिका सखा कलाल यांचा जन्म. त्यांच्या 'ढग' या कथासंग्रहास राज्यपुरस्कार. याशिवाय 'साज' हा कथासंग्रह प्रसिद्ध. 'पार्टी' हा ललित लेखसंग्रह ही त्यांच्या नावावर आहे. **१९४२:-** विविध नियतकालिकांतून लेख लिहिणारे लेखक विजय विनायक हंबर्डे यांचा जन्म. ह्यांचे 'वनस्पतींचे औषधी गुणधर्म', 'फहांचे औषधी महत्त्व', 'वृक्षांचे औषधी महत्त्व' आणि 'आपले एक औषधालय' हे माहितीपर ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. **१९५२ :-** स्थापत्य आणि साहित्य असा दुहेरी समन्वय साधणारे लेखक, कवी अशोक महादेव वाडकर यांचा जन्म. 'अक्षरघून', 'पैलस्वर' या काव्यसंग्रहासह 'राखणदार' या चित्रपटासाठी गीतलेखन तसेच 'किमया' या वास्तुशिल्पिय द्वैमासिकाचे संपादकपद त्यांनी भुषविले. 'आविष्करण : आधुनिक वास्तुकलेचे' या पुस्तकास महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार. १९५५ :- गांधीवादाचे भाष्यकार व लोकशक्ती (वृत्तपत्र) आणि साधना साप्ताहिकाचे माजी संपादक शंकर दत्तात्रय जावडेकर यांचे निधन. 'लोकशाही', 'समाजवाद', 'अर्थशास्त्र' आदी विषयांवर त्यांची ११ पुस्तके प्रसिध्द झाली होती. याशिवाय स्वातंत्र्य चळवळीतही त्यांनी सहभाग घेतला होता.१९६४:- सूचिकार शंकर गणेश दाते यांचे निधन. लोककथा (दोन खंड) व स्वतः २३ हजार ग्रंथ चाळून मराठी ग्रंथसूचींचे दोन खंड त्यांनी प्रसिध्द केले. राष्ट्रीय ग्रंथसूचीतील मराठी विभागाची जबाबदारी त्यांनीच पार पाडली. मराठी नियतकालिक सूची मात्र त्यांच्या अकाली निधनाने अपूर्ण राहिली. तथापि त्यांचे हे कार्य शं. ग. दाते सूचिमंडळ मुंबई मराठी ग्रंथालयाने स्थापून हा ग्रंथ तडीस नेला.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**१० डिसेंबर**

१) श्री. हरिश्चंद्र बाळकृष्ण पाटील
कुरूळ, अलिबाग, १०-१२-१९४०
२) श्री. विठोबा धर्मा गावंड
थळ, अलिबाग, १०-१२-१९४६
३) श्री. रविंद्र शंकर पंडित
चेंढरे, अलिबाग, १०-१२-१९५५
४) श्री. प्रकाश रामदास भगत
अलिबाग, १०-१२-१९६१
५) श्री. नितीन जगन्नाथ मयेकर
दिवेआगर

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**



# आपत्कालीन होड्यांना प्रशासनाच्या बेफिकीरीचा फटका

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

**पावसाळी हंगामात संपूर्ण चिपळून शहरातील ८० टक्के भागाला दरवर्षी पुराचा वेढा बसत असतो. या भागात असलेल्या नागरी वस्तीतील नागरिकांना सुरक्षितस्थळी हलविण्यासाठी शासन व नगरपरिषद प्रशासनाच्या माध्यमातून विविध उपाययोजनांची जय्यत तयारी असते. त्या अंतर्गत प्रामुख्याने पुरात अडकलेल्या नागरिकांना सुरक्षितस्थळी हलविण्यासाठी नगरपरिषदेने काही यांत्रिकी होड्या खरेदी केल्या असून शासनाकडून यांत्रिकी होड्या मिळाल्या आहेत. मात्र, सध्या या होड्या यंदाच्या पावसाळी हंगामानंतर काही ठिकाणी धूळखात उताण्या पडल्याचे दिसून येत आहे. हंगाम संपल्यानंतर या होड्या नगरपरिषद प्रशासनाने योग्य ठिकाणी हलविण्याची गरज असतानाही प्रशासनाची बेफिकीरी दिसून येत आहे.**

चिपळूण शहरातील नागरिक पावसाळी हंगामात कायमच पूर व महापुराच्या भीतीखाली वावरत असतात. शहराला २००५ पासून मोठ्या महापुराचा फटका बसून करोडो रूपयांची आर्थिक हानी झालेली आहे. जुलै २०२१ मध्ये आलेल्या महापुरामुळे शहरातील नागरिक संकटात सापडल्याने त्यांनी आवाज उठवला होता. त्याचबरोबर नगरपरिषद प्रशासनाने देखील २००५ नंतर आलेल्या महापुरांचा अभ्यास करीत शहरातील ८० टक्के नागरी वस्तीमध्ये महापुराचे पाणी जात असल्याचे लक्षात आल्यावर त्या-त्या ठिकाणी नागरिकांना सुरक्षितस्थळी हलविणे व त्यांना आवश्यक त्या सेवा पुरविण्याकरिता यांत्रिकी होड्या खरेदी करण्यात आल्या होत्या. त्याचप्रमाणे सर्वपक्षिय नेते व लोकप्रतिनिधींच्या दबावानंतर शासनाने जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत यांत्रिकी होडयांची उपलब्धता करून देण्यात आली होती.

या वर्षीच्या पावसाळी हंगामात महापुराचे पाणी शिरले नसले तरी शहरातील पाण्याचा जोर जास्त असलेल्या विविध ठिकाणी यांत्रिकी होड्या सज्ज ठेवण्यात आल्या होत्या. आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत जून ते सप्टेंबर अंतर्गत होड्यांसह आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सज्ज ठेवली जाते. सप्टेंबरनंतर पावसाचा जोर कमी झाल्यावर सर्व यंत्रणा सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी नगरपरिषद प्रशासनाची असते. त्यानुसार विविध ठिकाणी ठेवण्यात आलेल्या नगरपरिषदेच्या मालकीच्या यांत्रिकी होड्यादेखील प्रशासनाकडून सुरक्षित व योग्य ठिकाणी ठेवल्या जातात. मात्र, यंदाच्या पावसाळी हंगामात विविध ठिकाणी ठेवण्यात आलेल्या होड्या अद्यापही त्याच ठिकाणी धूळखात उताण्या पडल्या आहेत. प्रशासनाच्या बेफिकिरीचा फटका यांत्रिकी फायबर होड्यांना बसणार आहे. या गंभीर विषयाकडे नगरपरिषद प्रशासनासहीत सर्वपक्षिय नेते व लोकप्रतिनिधींकडूनही दुर्लक्ष झाल्याने नागरिकांतून संताप व्यक्त होत आहे.

# शृंगारतळीच्या वेशीवर कचऱ्याचे ढीग

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

शृंगारतळीच्या वेशीवर पुन्हा कचऱ्याचे ढीग दिसून येत आहेत. यापूर्वी टाकलेल्या कचऱ्याची विल्हेवाट पाटपन्हाळे ग्रामपंचायतीने लावून ध्वनीक्षेपाद्वारे जनजागृती करून सुद्धा वेशीवर कचरा आणून टाकला जात आहे. मॉर्निंगवॉकचे निमित्त साधून हा कचरा काही सुशिक्षित नागरिकांकडून टाकला जात असल्याची चर्चा असून ग्रामपंचायतीच्या स्वच्छता जनजागृतीला त्यांच्याकडून ठेंगा दाखवण्यात येत असल्याचे चित्र आहे.

घनकचरा व्यवस्थापनामध्ये जिल्हास्तरावरून नीला पॉलिकॅप व ऑल इंडिया या दोन कंपन्यांना ठेका देण्यात आला आहे. प्रत्येक गावाचा घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत डीपीआर तयार करून सार्वजनिक शोषखड्डे, वैयक्तीक शोषखड्डे, सार्वजनिक कुंड्या, कचरा संकलन, इलेक्ट्रिकवर चालणाऱ्या सायकलही दिली आहे.

पोस्टर व बॅनरबाजीने स्वच्छतेचा संदेश दिला जात आहे. स्पीकरवरून कचरा उघड्यावर टाकू नये, कारवाई केली जाईल, असा संदेशही निरूपयोगी ठरत आहे. पाटपन्हाळे गावच्या शृंगारतळी हद्दीत कचरा जमा करणारी घंटागाडी रोज फिरत असते. कित्येक नागरिक हातात कचरापेटी घेऊन घंटागाडीत कचरा टाकण्यासाठी रस्त्यावर उभे असतात आणि कचरा घंटगाडीत टाकतात. त्याच हद्दीत जानवळे फाटादरम्यान, रस्त्यालगत कचऱ्याचे ढीग कसे काय तयार होतात, हा संशोधनाचा विषय ठरला आहे.






# थकबाकीदारांविरुद्ध धडक मोहीम

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

विधानसभा निवडणुकीच्या कामात महापालिका कर्मचारी गुंतल्यामुळे मालमत्ता कराच्या वसुलीवर परिणाम झाला होता. आचारसंहिता संपताच कर्मचारी पुन्हा एकदा कामाला लागले असून दहा लाखापेक्षा जास्त थकबाकी असणाऱ्या सुमारे पावणे दोनशे थकबाकीदारांना नोटीस पाठवून कारवाई सुरू करण्यात आली आहे. तसेच, मालमत्ता कर विभागाने ५०० कोटी वसुलीचा टप्पा देखील पार केला आहे.

ठाणे महापालिका क्षेत्रात ६ लाख १५ हजार मालमत्ता ग्राहक असून या सर्वांना मालमत्ताकराची देयके पाठवण्यात आली आहेत. त्यापैकी १० लाखापेक्षा जास्त कर असलेल्या १७९ मालमत्ता ग्राहकांना थकबाकीच्या नोटीसा पाठवण्यात आल्या आहेत. या ग्राहकांनी वेळेवर करभरणा करावा, यासाठी त्यांच्या मोबाईलवर एसएमएस देखील पाठवण्यात आले आहेत. थकबाकीदार ग्राहकांनी वेळेवर करभरणा केला नाही तर त्यांना दंड आकारून त्यांच्या घरातील मालमत्ता जप्त केली जाणार असल्याचे या विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले आहे. करभरणा करणाऱ्या नागरिकांना ऑनलाईन कर भरता येणार आहे. तसेच, सुट्टीच्या दिवशी देखील महापालिकेचे कार्यालय सुरु ठेवण्यात येणार आहे.

## अपघातात दुचाकीस्वाराचा मृत्यू

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

संगमेश्वर तालुक्यातील तुळसणी येथील अमीर मुकादम (३५) या तरुणाचा अज्ञात वाहनाच्या धडकेत शुक्रवारी मृत्यू झाला आहे. अमीर मुकादम कामानिमित्त आपल्या दुचाकीवरून तुळसणीहून बावनदीच्या दिशेने जात होता. देवरुख-रत्नागिरी मार्गावरील वायंगणे फाटा येथे अज्ञात वाहनाने अमीर याच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या धडकेत दुचाकीसह अमीर रस्त्यावर कोसळला. या मार्गावरून ये-जा करणाऱ्या स्थानिकांना दुचाकी व अमीर पडलेला दिसून आला. त्याला तात्काळ उपचारासाठी रत्नागिरी येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करून अमीर याला मृत घोषित केले. याची माहिती अजय सुर्वे यांनी देवरुख पोलीस ठाण्यात दिली. या अपघात प्रकरणी अज्ञात वाहन चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# ट्रक पलटी होऊन अपघात




**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

जाकादेवी परचुरी मुख्य मार्गावर उक्षी रेल्वेस्टेशनकडे जाणाऱ्या उतारावर चिरा भरून जाणारा ट्रक पलटी होऊन अपघात झाला आहे. या अपघातात एकाचा मृत्यू झाला असून चारजण किरकोळ जखमी झाले आहेत. हा अपघात शनिवारी दुपारच्या सुमारास घडला आहे.

रत्नागिरी तालुक्यातील सावंत यांच्या मालकीच्या ट्रकमध्ये चिरे भरून चालक आनंद धरसिंग राठोड हा चवे येथून परचुरी बौद्धवाडी येथे जात होता. परचुरी येथे उक्षी रेल्वेस्टेशनकडे जाणाऱ्या वळण असलेल्या उतारावर येताच ट्रकचा ब्रेक निकामी झाला आणि ट्रक रस्त्याबाहेर जाऊन पलटी झाला. यावेळी त्याच्याबरोबर चिरे उतरवण्यासाठी अन्य सहा कामगार देखील ट्रकच्या कॅबिनमध्ये अडकले होते. त्यावेळी तेथून येणाऱ्या-जाणाऱ्या वाहनांमधील लोकांनी ट्रक कॅबिनमध्ये अडकलेल्या चालक तसेच अन्य कामगारांना बाहेर काढले. या अपघातात सिद्धू मोतीराम चव्हाण (३२) याच्या डोक्याला मार लागला होता. तर, अन्य सहाजणांना किरकोळ दुखापत झाली होती. या सर्वांना जाकादेवी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान सिद्धू चव्हाण याचा मृत्यू झाला आहे.

# विद्यूत वाहिनीचे निकृष्ट दर्जाचे काम

**। सिंधुदुर्ग । प्रतिनिधी ।**

मालवण तालुक्यातील वायंगणी येथे रस्त्याच्या कडेला सुरू असलेले भूमिगत विद्यूत वाहिनीचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याने संतापलेल्या वायंगणी ग्रामस्थांनी हे काम शनिवारी सायंकाळी उशिरापर्यंत रोखून धरले होते. यावेळी उपस्थित संबंधित ठेकेदाराला जाब विचारत धारेवर धरण्यात आले होते. प्रोजेक्टर मॅनेजरने संबंधित काम निकषाप्रमाणे करुन देण्याची ग्वाही दिल्यानंतर हे काम सुरू करण्याला ग्रामस्थांनी परवानगी दिली.

वायंगणी येथे भुमिगत विद्यूत वाहिनीचे काम सुरू करण्यात आले आहे. भूमिगत विद्युत वाहिनी टाकण्यासाठी वायंगणी ग्रामस्थांनी दिलेल्या माहितीनुसार ४ फुटांची चर मारुन त्यात खाली वाळू टाकणे, नंतर विद्युत वाहिनीचा पाईप टाकून त्यावर अर्धगोल झडपे टाकून बुजवायचे असताना सध्या सुरू असलेले काम या निकषाप्रमाणे नसून अर्धवट खणूनच वाळू न टाकताच पाईप टाकून चर बुजवले जात आहेत. तसेच, रस्त्याच्या कडेला चर खोदून ठेवल्याने ग्रामस्थांना स्वतःची वाहने बाहेर काढतानाही अडचण होत होती. याबाबत संबंधित कामगारांना विचारणा केल्यास उडवाउडवीची उत्तरे दिली जात असल्याने संतप्त ग्रामस्थांनी शनिवारी सायंकाळी उशिरा संबंधित ठेकेदाराला जाब विचारला. निकषाप्रमाणे काम होत नसेल तर काम बंद करा, असे सांगत काम बंद पाडले होते.



## सीएनजी टँकरमधून गॅस गळती

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

रत्नागिरी शहराजवळ टीआरपी येथे डीमार्ट समोर राष्ट्रीय महामार्गावर खड्ड्यांमुळे सीएनजी टँकरमधून मोठ्या प्रमाणात वायू गळती सुरू झाली. यावेळी अचानक झालेल्या मोठ्या आवाजाने परिसरात भीतीचे वातावरण पसरले होते. हा प्रकार घडल्यानंतर एमआयडीसी आणि नगर परिषद अग्निशमन पथकांनी तातडीने धाव घेतल्याने होणारा मोठा अनर्थ टळला. दरम्यान, गॅस लिकेजवर वेळीच नियंत्रण मिळवण्यात यश आले. या घटनेमुळे सुमारे तासभरापेक्षा जास्त काळ मार्गावर वाहतूक कोंडी झाली होती. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी सायंकाळी ८ वाजण्याच्या सुमारास कुवारबावकडून एका खासगी गॅस कंपनीचा टँकर रत्नागिरीच्या दिशेने येत होता.

# भरधाव टेम्पोच्या धडकेत चिमुकलीचा दुर्दैवी मृत्यू

**। सिंधुदुर्ग । प्रतिनिधी ।**

मामाच्या गावची जत्रा आटोपून आईसह घरी परतणाऱ्या एका सात वर्षांच्या चिमुकलीवर काळाने घाला घातला आहे. या चिमुकलीचा टेम्पोच्या धडकेत मृत्यू झाल्याची दुर्देवी घटना झरेबांबर तिठा येथे शुक्रवारी दुपारी घडली आहे.

श्रीया गवस ही आईसोबत झरेबांबरला जत्रोत्सवाला मामाकडे आली होती. या माय-लेकी शुक्रवारी आपल्या गावी परत जाण्यासाठी निघाल्या होत्या. त्या झरेबांबर तिठा येथे बसची वाट पाहत उभ्या होत्या. त्यावेळी श्रिया ही रस्ता ओलांडून पलीकडे जात असताना दोडामार्ग दिशेने भाजी घेऊन येत असलेल्या एका भरधाव टेम्पोची धडक श्रिया हिला बसली. यावेळी मुलीच्या आईने मोठ्याने टाहो फोडला. तिठ्यावर उभे असलेले प्रवासी व दुकानदारांनी देखील आरडाओरडा केला. मात्र, श्रिया क्षणार्धातच टेम्पो खाली गेली.चालकाने टेम्पो न थांबविल्याने ती टेम्पोच्या समोरच्या चाकाखाली गेली आणि तिच्या मानेवरून व डोक्यावरून टेम्पोचे पुढील चाक गेले. चालकाने तिला फरफटत नेल्याने ती मागच्या चाकाखाली आली. बस स्टॉपवर उभ्या असलेल्या काहींनी व आसपासचे दुकानदार, ग्रामस्थ आदींनी टेम्पो चालक सुरेश पुंडलिक पवार (२०) याला खेचून बाहेर काढले व बेदम चोप देण्यात आला.

# अल्पवयीन मुलीचा विनयभंग



**। सिंधुदुर्ग । प्रतिनिधी ।**

घरात कोणीही नसल्याची संधी साधून १० वर्षांच्या अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याप्रकरणी सावंतवाडी पोलिस ठाण्यात संशयित प्रशांत चंद्रकांत दळवी (३५) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रविवारी त्याला अटक करुन त्याची रवानगी न्यायालयीन कोठडीत करण्यात आली आहे.

दरम्यान, अल्पवयीन मुलीची आई कामाला गेली असल्याने घरी मुलगी एकटीच असल्याची संधी साधून संध्याकाळच्या सुमारास संशयिताने मुलीच्या घरात प्रवेश केला. यावेळी त्याने त्या मुलीच्या पाठीवरुन हात फिरवत विनयभंग करण्याचा प्रयत्न केला. ही माहिती त्या मुलीने तिच्या आईला दिली. त्यानंतर आईने पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली आहे. त्यावरून संशयित प्रशांत चंद्रकांत दळवी यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याला अटक करुन न्यायालयात हजर केले असता त्याची रवानगी न्यायालयीन कोठडीत करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. अधिक तपास पोलीस करत आहेत.

# खेड-भोस्ते मार्गाची चाळण

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

खेड-भोस्ते रेल्वेस्थानक मार्गावर ग्रामसडक योजनेतून कोट्यवधी रुपयांचा निधी खर्चुनही या मार्गाची चाळण झाली आहे. याच मार्गावरून प्रशासकीय अधिकाऱ्यांचाही सातत्याने प्रवास सुरू असतो. मार्गाच्या डागडुजीसाठी संबंधित खात्याला आदेश देण्याची तसदी घेतली जात नसल्याने वाहनचालकांची कसरत कायम आहे.

येथील रेल्वेस्थानकात ये-जा करण्यासाठी या मार्गाचा वापर होतो. याशिवाय रिक्षा व्यावसायिकांच्या दृष्टीनेही हा मार्ग सोयीचा ठरत आहे. ग्रामसडक योजनेतून वेरळ-भोस्ते कोंडिवली शिवमार्गावर तब्बल ९ कोटींहून अधिक रुपयांचा खर्च करून खड्ड्यांमुळे वाहनचालकांची कसरत कायमच आहे. रस्त्याच्या कामाला प्रारंभ झाल्यापासूनच कामाच्या दर्जाबाबत पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी प्रश्न उपस्थित केले होते. या मार्गावरील दर्जाहीन कामाबाबत ग्रामस्थांनी सातत्याने संबंधित खात्याच्या अधिकाऱ्यांकडे तक्रारी करूनदेखील ठेकेदाराला पाठीशी घालण्याचा प्रताप केला आहे. तसेच, खड्ड्यांमुळे अपघातही घडत असल्याने वाहनचालकांची सुरक्षितता ऐरणीवर आली आहे.

# बेकायदा माती डेब्रिज भराव

**। पालघर । प्रतिनिधी ।**

मीरा-भाईंदर शहरात विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणात बेकायदा माती भराव केला जात आहे. बेकायदा माती वाहतूक करणाऱ्या डंपरमधून रस्त्यावर माती, चिखल पडून धूळ उडत आहे. त्यामुळे प्रदूषण वाढले असून पर्यावरणाचे देखील नुकसान होत आहे. बेकायदा वाहतूक करणाऱ्या डंपरवर महापालिका, वाहतूक पोलीस व महसूल विभागाकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप सामाजिक संस्थांनी केला आहे.

मीरा- भाईंदर शहरात अनेक ठिकाणी मोठ मोठ्या इमारतींची बांधकामे सुरू आहेत. तसेच, शहरात अनेक ठिकाणी जागा सपाट करण्यासाठी जागा बेकायदा माती भराव केला जात आहे. मीरा रोड पूर्वेला मोठ्या प्रमाणात माती भराव केला जात आहे. यात मोठा आर्थिक व्यवहार झाल्याचे बोलले जात आहे. माती भराव करण्यासाठी शहरात रात्रंदिवस शहराबाहेरून डंपर बेकायदा माती, इमारतीतून निघालेला राडारोडा, चिखल वाहतूक करुन आणला जात आहे. या डंपरमधून वाहतुकीच्या रस्त्यावर माती, चिखल सांडत असल्याने शहरात मातीचा धुराळा उडत आहे. त्यामुळे रस्त्यांवर वाहतूक कोंडी होत असून अनेक अपघात देखील होत आहेत. महसूल विभागाच्या डोळ्यादेखत अनेक ठिकाणी बेकायदा माती भराव होत असताना त्यावर कोणतीही कारवाई केली जात नसल्याने पर्यावरणप्रेमी नागरिकांनी तीव्र भावना व्यक्त केल्या आहेत.

### ठाणेकरांची तहान भागणार

# स्टेम प्रकल्पाची पाणीक्षमता वाढणार

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

**ठाणे, भिवंडी-निजामपूर आणि मीरा-भाईंदर महापालिका क्षेत्राला पाणीपुरवठा करणाऱ्या स्टेम प्रकल्पात ५०० दशलक्ष लिटर क्षमतेचे नवीन पंप हाऊस आणि १२ किमीची नवीन जलवाहिनी या कामाचा शुभारंभ महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या हस्ते नुकताच करण्यात आला आहे.**

मूलभूत सोयी सुविधांचा विकास करण्यासाठी विशेष तरतुदी अंतर्गत महापालिकांना राज्य शासनाकडून अनुदान मिळते. त्या अंतर्गत, ठाणे, भिवंडी-निजामपूर, मीरा-भाईंदर महापालिका क्षेत्राला पाणीपुरवठा करणाऱ्या स्टेम प्रकल्पाची पाणी उचल क्षमता वाढवण्यासाठी, नवीन पंप हाऊसचे बांधकाम, नवीन जलवाहिनी टाकणे आणि जुन्या जलवाहिनीची दुरुस्ती करणे या कामासाठी २७८ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या निधीला ऑक्टोबरमध्ये मान्यता दिली होती. तांत्रिक मान्यता होऊन सुमारे तीन वर्षे प्रलंबित राहिलेल्या या प्रकल्पासाठी ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी पाठपुरावा केला होता.



स्टेम अंतर्गत येणाऱ्या महापालिका क्षेत्राची वाढीव पाण्याची आवश्यकता लक्षात घेऊन नवीन पंप हाऊस आणि नवीन जलवाहिनी यांचे काम पूर्ण करण्यासाठी दोन वर्षांचा अवधी देण्यात आला असला तरी ते काम दीड वर्षातच पूर्ण करावे. त्यामुळे या परिसराला कोणत्याही अडथळ्याशिवाय पाणीपुरवठा करणे शक्य होईल. तसेच, भविष्यात वाढीव पाणी उपलब्ध झाल्यास तेही या यंत्रणेमार्फत पुरवणे शक्य होईल, असे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी याप्रसंगी स्पष्ट केले आहे.

> **नवीन पंप हाऊसमुळे पाणी उचलण्याची क्षमता तर वाढेलच. शिवाय नवीन जलवाहिनी अंथरल्यामुळे पाण्याची गळती तसेच घट कमी होईल. तसेच, सध्या नऊ पंप चालवून पाणी उचलावे लागते. नवीन व्यवस्थेत सहा पंप चालवावे लागतील. त्यामुळे विजेची मोठ्या प्रमाणात बचत होईल.**
>
> **– संकेत घरत, व्यवस्थापकीय संचालक**

## मौज.. मज्जा.. मस्ती अन् धम्माल...



● सलग तीन दिवस सुट्ट्या आल्याने रायगड जिल्ह्यातील पर्यटन स्थळ पर्यटकांनी बहरले होते. अलिबाग समुद्रकिनारी घोडगाडी सफर, उंटावरून सफारी आणि एटीएम बाईक राईडची मजा पर्यटकांनी मनसोक्त लुटली. यामुळे स्थानिक व्यावसायिकांना चांगला धंदा मिळाला. दरम्यान, समुद्राला ओहोटी लागल्याने अलिबाग समुद्रकिनारी पर्यटनाला आलेल्या पर्यटकांनी शिवकालीन कुलाबा किल्ल्यात चालत जाणे पसंत केले. तीन दिवसात हजारो पर्यटकांनी किनाऱ्यावर मौज, मस्ती, धम्माल केल्याचे दिसून आले. (छायाचित्र : समीर मालोदे)

# अखेर फणसापूर-गायचोळे रस्ता होणार

**■ ॲड. राकेश पाटील यांच्या अर्जाची जि.प.कडून दखल ■ कार्यकारी अभियंत्यांकडून कार्यवाहीचे आदेश**

**। रायगड । प्रतिनिधी ।**

**रायगड जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत येणाऱ्या अलिबाग तालुक्यातील फणसापूर येथून सुरू होणारा व जवळपास चौल-गायचोळे येथे संपणारा अंदाजे ०७ किलोमीटरचा रस्ता असून, सदरच्या रस्त्याचे सुमारे २० वर्षांपूर्वी डांबरीकरण करण्यात आले होते. त्यानंतर या रस्त्याला डांबरच माहिती नव्हती, हे सूर्यप्रकाशाइतके सत्य आहे. सदरच्या रस्त्याचे तात्काळ नूतनीकरण करण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते ॲड. राकेश पाटील यांनी रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी भारत बास्टेवाड यांना निवेदन दिले होते.**



सदरच्या निवेदनामध्ये रस्त्याची अवस्था दयनिय झालेली आहे. या रस्त्यावरून कुदे, सुडकोली, नवखार, भागवाडी, भोनंग, नवघर, महान, मोरोंडे, उमटे, रामराज, रामराज विभागातील ७ ते ८ अदिवासी वाड्या, बोरघर, ताजपूर, मोरखोल, भिलजी, फणसापूर, बापळे, दिवी पारंगी, चिंचोटी, फुडेवाडी, चौल कातळपाडा, वळवळी, वळवळी आदिवासीवाडी सुमारे २३ गावांतील नागरिकांचा रोजच्या रहदारीचा हा रस्ता असून, वरील २३ गावांतील विद्यार्थी-विद्यार्थिनी रेवदंडा कॉलेजला याच रस्त्याने जाणारे आहेत. चौल व रेवदंडा या ऐतिहासिक शहरांना जोडणारा कमी वेळ लागणारा रस्ता आहे. आग्राव कोळीवाड्यातील कोळी महिला मासे विक्रीसाठी ग्रामीण भागात येण्यासाठी हा एकमेव रस्ता आहे. मात्र, तो रस्ता ही शेवटच्या घटिका मोजत आहे. सदरच्या रस्त्यावरून २३ गावांतील नागरिक हे ग्रामीण भागांतील असून, हातावर पोट भरणारे आहेत. शेती आणि मासेमारी तसेच दुग्ध व्यवसाय करणारे येथील नागरिक असून, या विभागातील नागरिकांसाठी शेती, शिक्षणासाठी जवळची बाजारपेठ म्हणून चौल, रेवदंड्याची बाजारपेठ आहे.

ॲड. राकेश पाटील यांनी रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिलेल्या पत्राची रायगड जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता राहुल देवांग यांनी रस्त्याची दयनिय अवस्था पाहून जिल्हा परिषदेच्या कार्यकारी अभियंता (प्रमाग्रासयो) महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था रायगड अलिबाग यांना पत्र देऊन कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे फणसापूर येथून सुरू होणारा व जवळपास चौल-गायचोळे येथे संपणाऱ्या रस्त्याचा वनवास संपण्याचे चित्र दिसत असल्याचे ॲड. राकेश पाटील यांनी मत व्यक्त केले.

> **रायगड जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता राहुल देवांग यांचे आम्ही आभार मानतो. त्यांनी फणसापूर ते चौल गायचोळे या रस्त्याच्या दयनिय अवस्थेची दखल घेऊन कार्यकारी अभियंता (प्रमाग्रासयो) महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था रायगड अलिबाग यांना रस्त्याच्या बाबतीत कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. या रस्त्याचे काम लवकरात लवकर जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाने सुरू करून तेथील नागरिक व विद्यार्थ्यांचा वनवास संपवावा.**
> **ॲड. राकेश नारायण पाटील, सामाजिक कार्यकर्ते.**



# रिक्षाचालकाचा प्रामाणिकपणा

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

पॅनकार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, आरसी बुक, एटीएम कार्ड, अशी तेरा प्रकारची महत्त्वाची कागदपत्रे व कार्ड तसेच पंधराशे रुपयांची रोख रक्कम असलेली, रस्त्यात पडलेली लेडीज पर्स एका रिक्षा चालकाला सापडली. मात्र, ही सापडलेली लेडीज पर्स या रिक्षा चालकाने संबंधित महिलेला परत करून आपला प्रामाणिकपणा दाखविला आहे.

चिरनेर येथील रिक्षा चालक श्याम चौलकर पनवेल येथे भाडे घेऊन गेले असता, त्यांना पंचरत्न हॉटेलच्या सर्कल जवळ रस्त्यामध्ये एक लेडीज पर्स पडलेली दिसली. ती त्यांनी उचलून, उघडून पाहिली असता, त्यात महत्त्वाची कागदपत्रे व कार्ड आणि पंधराशे रुपयांची रोख रक्कम असल्याचे दिसून आले. यादरम्यान संजय परदेशी यांनी त्यांच्या ओळखीच्या व्हॉट्सअॅप ग्रुपवर या सर्व महत्त्वाच्या कागदपत्रांचे फोटो व्हायरल केले. आणि हरवलेली पर्स परत करण्याचे आवाहन केले. त्यानंतर श्याम चौलकर घरी आल्यानंतर त्यांनी पोलीस कॉन्स्टेबल सचिन कडू यांच्याशी संपर्क साधून, त्यांनादेखील ही पर्स दाखवली असता, सचिन कडू यांनी या पर्समध्ये असलेल्या कार्डवरून सरगम सिंग या महिलेबरोबर मोबाईलद्वारे संपर्क साधून, या महिलेला या घटनेची माहिती दिली. त्यानंतर महिला श्याम चौलकर यांच्या घरी पोहोचली. श्याम चौलकर यांनी या महिलेस पोलिसांच्या समक्ष पर्स सरगम हरपाल सिंग यांना देऊ केली.

# खारघरमधील सहा पान शॉपवर पोलिसांचे छापे

**। पनवेल । वार्ताहर ।**

राज्यात प्रतिबंधीत असलेला गुटखा, सुंगधीत तंबाखू, पान मसाल्याची साठवणूक करुन त्याची छुप्या पध्दतीने विक्री करणाऱ्या खारघरमधील ६ दुकान आणि पान शॉपवर अंमली पदार्थ विरोधी पथकाने छापे मारुन हजारो रुपये किंमतीचा गुटखा आणि सुगंधीत तंबाखू, पान मसाल्याचा साठा जप्त केला आहे.

अंमली पदार्थ विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप निगडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत नायडू आणि त्यांच्या पथकाने खारघरमधील ६ दुकाने आणि पान शॉप तसेच टपऱ्यांवर छापे मारी करुन हजारो रुपये किंमतीचा गुटखा, सुगंधीत तंबाखू आणि पान मसाल्याचा साठा जप्त केला आहे. या कारवाईत अंमली पदार्थ विरोधी पथकाने खारघर, सेक्टर-३ बेलपाडा मधील दिव्या कॉर्नर, राजेश टी., आच्छाद कम्युनिकेशन या ३ दुकानांवर छापेमारी केली.

या तिन्ही दुकानांची तपासणी केली असता सदर तिन्ही दुकानांमध्ये हजारो रुपये किमतीचा तंबाखुयुक्त पानमसाला आणि गुटखा आढळून आला. त्यामुळे अंमली पदार्थ विरोधी पथकाने या तिन्ही दुकानात सापडलेला गुटखा आणि सुगंधीत पान मसाल्याचा साठा जप्त केला आहे. तसेच तिन्ही दुकानाचे मालक अनुज भगवानदिन साहु, इंद्रा रमेश पाल आणि धनंजय मातादीन गुप्ता या तिघांना ताब्यात घेतले आहे. त्यानंतर ब्रम्हांड अपार्टमेंट लगत असलेल्या पानाच्या टपरीवर तसेच खान-पान शॉपवर त्याचप्रमाणे खारघर, सेक्टर- २ मधील गुरुप्रसाद पान शॉपवर छापे मारुन त्यांची तपासणी केली.या तिन्ही पान शॉपचे मालक प्रमोद वुमार साहु, राजू नथ्थु खान, सोनु अजयवुमार या तिघांना ताब्यात घेतले.



# तालुक्यात पशुगणनेस शुभारंभ

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यात शेतकरी वर्गाकडे असलेल्या पशुंची गणना करण्यास सुरुवात झाली आहे. या गणनेमध्ये सर्व पशुपालकांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन पशुवैद्यकीय विभागाने केले आहे.

राज्य शासनाचे पशुसंवर्धन विभागाने राज्यात पशुगणना कार्यक्रम हाती घेतला आहे.या २१ व्या पशुगणना कार्यक्रमाला कर्जत तालुक्यात सुरुवात झालेली आहे.पंचायत समिती कर्जत येथे पशुगणना करण्यासाठी २०२४ करीता निवडलेले प्रगणक यांचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. पंचायत समिती कार्यालय येथे गट विकास अधिकारी पंचायत समिती कर्जत सुशांत पाटील यांच्या उपस्थितीत प्रगणक यांना प्रशिक्षण देण्यात आले.या प्रशिक्षण मध्ये पशुधन विकास अधिकारी, पंचायत समिती कर्जत डॉ. मिलिंद जाधव तसेच गट विकास अधिकारी श्री. सुशांत पाटील यांनी पशुगणनेसाठी निवडलेल्या प्रगणकांना सविस्तर मार्गदर्शन केले.

> **शेतकरी पशुपालकांच्या घरोघरी, गोठ्यात, हाऊसिंग सोसायटी येथे भेट देणाऱ्या प्रगणकांना पशुगणना संबंधित सर्व आवश्यक माहिती द्यावी आणि प्रगणक यांना सहकार्य करावे.**
> **- सुशांत पाटील, गटविकास अधिकारी, कर्जत पंचायत समिती**

# प्रशिक्षण कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

'एनसीडीसी' चे लक्ष्मणराव इनामदार' नॅशनल अकॅडमी फॉर को-ऑपरेटिव्ह रिसर्च अँड डेव्हलपमेंट प्रशिक्षण केंद्र' आणि केंद्र शासनाच्या मत्स्य व्यवसाय विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मच्छिमारांसाठी प्रशिक्षण कार्यशाळा घेण्यात आली. अलिबागमधील रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या मुख्य कार्यालयातील सभागृहात शुक्रवारी ही कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

पंतप्रधान मत्स्यसंपदा योजनेअंतर्गत आयोजित या कार्यशाळेच्या प्रशिक्षणा दरम्यान वात्सल्य ट्रस्टच्या उपप्रकल्प प्रमुख वरदा मेहेंदळे, मत्स्य व्यवसाय विभाग रायगडचे सहाय्यक आयुक्त संजय पाटील, (दुग्ध) सहकारी संस्थेचे सहाय्यक निबंधक राजेंद्र मरकड, अक्रिष्टा रितू आदी मान्यवरांसह जिल्ह्यातील मच्छीमार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सहकाराचे महत्त्व, महिलांचा मत्स्यव्यवसायातील महत्त्वपूर्ण सहभाग याबद्दल आपले मत व्यक्त करीत वरदा मेहेंदळे पुढे म्हणाल्या, गुणवत्ता पूर्ण बीज निर्मिती, बीज संकलन त्याची उपलब्धता मत्स्य व्यवसायातील यशाचा गाभा आहे. मच्छीमार बांधवांनी कोल्ड स्टोरेज, मत्स्य विपणन, माशांची बाजारपेठेतील उपलब्धता या बाबीकडे लक्ष देणे आवश्यक आहे. मत्स्यव्यवसायात महिलांचे प्रमाण अत्यल्प असून महिलांनी एकत्र येऊन मत्स्य सहकारी संस्था स्थापन करायला हव्यात असे त्यांनी सांगितले.

जिल्हा मच्छिमार मध्यवर्ती सहकारी संघाचे समन्वयक, अमोद साळगावकर यांनी अनुदानाचे प्रस्ताव जलद संघांकडे सादर करावे असा आग्रह केला. जेणेकरून ते प्रस्ताव एनसीडीसीला सादर करून मच्छिमार संघांना, प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजने अंतर्गत मिळणाऱ्या अनुदानाचा लाभ घेता येईल आणि संघांचे सशक्तीकरण करण्यास मदत होईल असेही ते म्हणाले. यावेळी संजय पाटील, रविंद्र मरकड आदी मान्यवरांनी किसान क्रेडिट कार्ड, अपघात गटविमा, पंतप्रधान मत्स्य संपदा योजनेअंतर्गत येणाऱ्या विविध राज्य शासनाच्या योजनांची माहिती दिली. मत्स्य शेतकरी उत्पादक संस्थांसाठी असलेल्या योजनांसाठी प्रस्ताव तयार करण्याबाबत सुरभी मेश्राम, एनसीडीसी प्रोग्राम ऑफिसर यांनी मार्गदर्शन केले. अक्रिष्टा रितू यांनी प्रास्तावना करून मान्यवरांचे स्वागत केले.

## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

● **अलिबाग येथील गिरीष इंटरप्रायसेस करिता साईट वर काम करण्याकरिता १८ ते ३० वर्ष वयोगटातील मुलांची आवश्यकता आहे..... शिक्षणाची अट नाही... संपर्क : ८२३७३१६२१८**

● **नोकरी! नोकरी !! नोकरी!!! * नवोदित पाहिजेत..* केवळ पुरुष उमेदवार, शिक्षण -१२वी, पदवीधर, द्वी पदवीधर . पगार - ₹१०,०००/- ते १२०००/- पर्यंत. (योग्यतेनुसार) कामकाज कालावधी - दिवस पाळी ८ तास. ठिकाण - अलिबाग, चेंढरे. ९८२२०९५८०३.**

● **अलिबाग-रिसॉर्टमध्ये कामासाठी माणसे पाहिजेत.** Reception-House Keeping-Waiter-Helper-Cook- etc. Phone: 8208459424 9323152990. SSEmail: csskshirishkar@gmail.com

● **अलिबाग एस्टीस्टँन्डजवळ दुकान गाळा विक्री करणे आहे. ९७६४५४८६७९**

● **अलिबागमध्ये ऑफिस कामासाठी कॉम्प्युटर नॉलेज असलेली मुलगी पाहिजे. संपर्क :- ९२६०१०१४४७**

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**

## तालुका कृषी विभागाची सामाजिक बांधीलकी

# श्रमदानातून बांधले वनराई बंधारे

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुका कृषी विभागामार्फत तालुका कृषी अधिकारी ऋतुजा नारनवर यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील चिरनेर ग्रामपंचायत हद्दीत येणाऱ्या निसर्गरम्य अक्कादेवी धरण परिसरातील ओढ्यांवर रविवार (दि.८) रोजी, श्री महागणपती सेंद्रिय गटातील शेतकऱ्यांच्या श्रमदानातून दोन वनराई बंधारे बांधण्यात आले आहेत.



वनराई बंधारे शेतकऱ्यांसाठी आणि पशु पक्षांसाठी वरदान ठरत आहेत. वनराई बंधारे बांधून पाणी अडविले तर या पाण्यामुळे विविध प्रश्न मार्गी लागत असतात. सध्या कृषी विभागामार्फ वनराई बंधारे बांधण्याची मोहीम सुरू झाली असून, तालुक्यात अजून बऱ्याच ठिकाणच्या ओढ्यांवर वनराई बंधारे बांधण्यात येणार असल्याची माहिती तालुका कृषी अधिकारी ऋतुजा नारनवर, कृषी सहाय्यक सुरज घरत, प्रफुल्ल खारपाटील यांनी दिली. यावेळी शेतकरी संजय पाटील, अनिल केणी, भास्कर ठाकूर, दामोदर मुंबईकर, बाळकृष्ण ठाकूर, समाधान पाटील, विजय म्हात्रे, मिलिंद ठाकूर, शशिकांत ठाकूर, रघुनाथ ठाकूर आदींनी श्रमदानातून बंधारा उभारण्यास सहकार्य केले.

> **सिमेंटच्या गोणीमध्ये माती भरून प्रवाह असलेल्या ठिकाणी माती भरलेल्या गोणी एकावर एक रचून ठेवल्यास काही महिने पाणी या ठिकाणी जमा होऊन भूजल पातळी वाढण्यास मदत होते.**
> **- सूरज घरत, कृषी सहाय्यक अधिकारी**

> **पाण्याशिवाय कोणताही सजीव जिवंत राहू शकत नाही. पशुपक्षी, झाडे, मानव यांच्यासाठी पाण्याचा वापर मोठ्या प्रमाणात होत असतो. यासाठी पाण्याचे महत्त्व जाणून बंधारा बांधून पाणी अडविले, तर या पाण्याचा वापर गुरांची तसेच जंगली प्राण्यांची तहान भागवण्यासाठी करता येईल. शिवाय परिसरातील शेतकऱ्यांना भाजीपाल्याचे उत्पादन घेता येईल. यातून रोजगाराचा प्रश्न मार्गी लागण्यास मदत होईल.**
> **- ऋतुजा नारनवर, तालुका कृषी अधिकारी**

# वातावरण बदलाचा आरोग्यावर परिणाम

**। रायगड । प्रतिनिधी ।**

नोव्हेंबरच्या अखेरीपासून हवेत गारवा निर्माण झाला होता. त्यामुळे थंडीची चाहूल लागण्यास सुरुवात झाली होती. त्यात डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात चक्रीवादळामुळे वातावरणात बदल झाला अन् उष्णतेत वाढ झाली होती. त्यानंतर सोमवारपासून अचानक वातवरणात गारवा निर्माण झाला आहे. या वातावरणीय बदलाचा परिणाम रायगडकरांच्या आरोग्यावर होऊ लागला आहे.

या अचानक बदललेल्या वातावरणामुळे अंगदुखी, सर्दी-खोकला, घसा दुखणे, ताप या आजाराने नागरिक त्रस्त झाले आहेत. दवाखान्यात रुग्णांच्या संख्येत वाढ झाल्याचे दिसून येत आहे.

नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यात जिल्ह्यात पारा घसरल्याची नोंद झाली होती. वातावरणात गारवा पसरला होता, तर दुपारीदेखील हा गारवा कायम असायचा; मात्र डिसेंबर महिन्याच्या सुरुवातीला वातावरणातील बदलामुळे तापमानात पुन्हा वाढ झाल्याचे दिसून आले. जणू काही ऑक्टोबर हिटसारखी गरमी वाढली होती. अशातचे दिवसभर वातावरणात गारवा कायम असल्याचे जाणवू लागले होते. या वातावरणातील वारंवार होणाऱ्या बदलाचा परिणाम थेट आरोग्यावर होत आहे. लहानांपासून ते थोरांपर्यंत अनेकांना सर्दी-खोकला, ताप, अंगदुखी आणि घसादुखीचा त्रास जाणवू लागला आहे. त्यामुळे विविध आजारांमुळे शहरातील छोटे दवाखाने, तसेच जिल्हा सामान्य रुग्णालय, पालिकेच्या आरोग्य केंद्रात या आजाराच्या रुग्णांच्या संख्येत वाढ झाली आहे. मागील दिवसांपासून दररोज या आजाराचे ३०-४० रुग्ण दवाखान्यात उपचारासाठी येत असल्याची माहिती आरोग्य विभागाने दिली आहे.

हिवाळ्याच्या दिवसात तापमान वाढले असले, तरी थंड पेयाचे सेवन करणे टाळले पाहिजे. सध्या प्रदूषणदेखील वाढले आहे. ज्यांना श्वसनाचा त्रास होतो, अशांनी मुखपट्टीचा वापर केला पाहिजे, असा सल्ला डॉक्टरांनी दिला.

# पेणमध्ये सुक्या मासळीची विक्री जोरात



## सोडे १,४०० तर सुरमई ६०० रुपये किलोचा दर

## स्थानिकांना मिळतेय रोजगाराचे साधन

**। वडखळ । वार्ताहर ।**

मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणामुळे पेण तालुक्यातील असंख्य स्थानिकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. त्याच अनुषंगाने महामार्गावरील दुरशेत फाट्यावर सुक्या मासळीची विक्री जोरात सुरू आहे. स्थानिक बाजारपेठेपेक्षा कमी दराने सुकी मासळी मिळत असल्याने मुंबई-पुण्यातील पर्यटकांकडून त्याला पसंती दिली जात आहे.

यंदा मासळीच्या प्रमाणात वाढ झाली आहे. त्यातच येथील अनेक बंदरांवर मोठ्या प्रमाणावर सुक्या मासळीची निर्मिती करण्यात येत आहे. यामध्ये सुरमई, सुकट, बोंबील आदींचे प्रमाण सर्वाधिक आहे. या सुक्या मासळीची येथील स्थानिक मच्छी मार्केटसह मुंबई-गोवा महामार्गावर मोठ्या प्रमाणात विक्री केली जाते. येथील दुरशेत फाट्यावर स्थानिक मासेविक्रेत्यांकडून मोठ्या प्रमाणावर सुक्या मासळीची विक्री केली जात आहे.

या सुक्या मासळीत सोडे १,४०० तर वाकट्या ५००, सुरमई ६००, बोंबील ५००, काली वाकटी ४००, दांडी सुकट ४००, साधी सुकट २००, जवला ३००, मांदेली २०० रुपये किलोने विकली जात आहे. त्यामुळे या महामार्गावरून प्रवास करणारे हजारो प्रवासी या ठिकाणी थांबून सुकी मासळी खरेदी करताना दिसून येतात. तालुक्याच्या वरेडी, दादर, नवघर, अंतोरे, दुरशेत या भागातील अनेक कोळी बांधव मोठ्या प्रमाणात मासेमारी करतात.

महामार्गाच्या रुंदीकरणामुळे येथील स्थानिकांना रोजगार मिळत आहे. स्थानिक कोळी बांधव सुकी मासळी येथील बंदरावरून आणून त्याची विक्री करीत आहेत. सध्या महामार्गावरील दुरशेत फाटा हा सुक्या मासळीचा स्पॉट बनला असून, कोकणात तसेच मुंबईकडे ये-जा करणारे प्रवासी येथे थांबून मोठ्या प्रमाणावर मासळीची खरेदी करीत आहेत. सोडे सर्वात महाग आहेत. यासह इतरही खूप सुकी मासळी विक्रीसाठी ठेवली जाते, असे मासळी विक्रेतीने सांगितले.

**राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फर्टिलायझर्स लिमिटेड**
(भारत सरकारचा उपक्रम)
प्रशासनिक भवन, चेंबूर, मुंबई 400 074.
सीआयएन नं.: L24110MH1978GOI020185
नवरत्न कंपनी

**ॲक्ट ॲप्रेंटिसची भरती/जाहिरात क्र.01122024**

मुंबई ट्रॉम्बे व थळ युनिट मध्ये ॲक्ट ॲप्रेंटिस अधिनियम, 1961 च्या अंतर्गत ट्रेड ॲप्रेंटिसची भरती करण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फर्टिलायझर्स लिमिटेड, भारत सरकारचा उपक्रम आहे, जी खते व रसायनांचे उत्पादन करणारी नवरत्न कंपनी आहे. आरसीएफ लिमिटेड ची उत्पादन करणारी दोन युनिट्स आहेत, जी ट्रॉम्बे, मुंबई येथे व दूसरे थळ, रायगड येथे आहेत.

इच्छुक असणारे उमेदवार कंपनीच्या **www.rcfltd.com** संकेत स्थळावर एच.आर. सेक्शनच्या अंतर्गत **Recruitment** सेक्शन मध्ये ऑनलाइन अर्ज करू शकतात.

इच्छुक उमेदवार ऑनलाइन अर्ज दिनांक **10/12/2024** पासून **24/12/2024** पर्यंत करू शकतात.

**कार्यकारी संचालक (मानव संपदा)**

समृद्धिची एकत्र वाटचाल

## जाहीर सूचना

याद्वारे **सूचना** देण्यात येत आहे की **अलिबाग फार्मिंग अँड ॲग्रिकल्चरिस्ट कंपनी प्रायव्हेट लिमिटेड** ज्याचे कार्यालय डेल्टा हाऊस, २रा मजला, प्लॉट क्र. १२, हॉर्नबी वेलार्ड इस्टेट, डॉ. ऐनी बेझंट रोड, कॉपर चिमनी रोडच्या पुढे, वरळी, मुंबई - ४०००१८ (**"द कंपनी"**), यांनी आमच्या अशिलांना सर्व अडथळ्या, ताबा आणि शंकापासून मुक्त येथे खाली लिहलेल्या **परिशिष्टात** अधिक विशेषत्वाने वर्णन केलेल्या शेतजमीन (**"सदर जमीन"**) विकण्यास आणि हस्तांतरण करण्यास सहमती दर्शविली आहे आणि त्या उद्देशासाठी आम्हाला कंपनीच्या सदर जमिनीच्या शीर्षकाची चौकशी करण्याची सूचना देण्यात आली आहे.

सर्व व्यक्तिं, संस्था, संस्थे समाविष्ट कोणतेही बँक, वित्तीय संस्था आणि/ किंवा नॉन-बँकिंग वित्तीय संस्था, कंपनी, फर्म, व्यक्तिंची संघटना किंवा व्यक्तिंचा समूह अंतर्भूत असो किंवा नसो, सावकार आणि / किंवा कर्जदाराचा सदर जमीन किंवा त्याच्या कोणत्याही भागावर (समाविष्ट कोणत्याही हस्तांतरणीय विकास हक्क (टीडीआर), फ्लोर स्पेस इंडेक्स (एफएसआय) किंवा सदर जमिनीवर कोणतेही बांधलेले आणि / किंवा बांधले जाणारे कोणतेही बिल्ट-अप क्षेत्र) कोणतेही प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष दावा, आक्षेप, मागणी, हिस्सा, हक्क, शीर्षक, हितसंबंध जसे की विक्री, बेचनपत्र, हस्तांतरण, देवाणघेवाण, गहाण (समान किंवा अन्यथा), ताबा, हमी, मृत्युपत्र, भेट, विश्वस्त संस्था, देखभाल, ताबा, भाडेपट्टी, भाडेकरार, उप-भाडेकरार, वारसाहक्क, उत्तराधिकार, वहिवाटीचा हक्क, करार, कौटुंबिक तजवीज, सेटलमेंट, धारणाधिकार, परवाना, वाटप पत्र, सामंजस्य करार, इरादा पत्र, मुदत पत्र, पर्याय करार, नुकसानभरपाई, हमीपत्र, सुरक्षा कागदपत्रे, व्यवस्था, मुखत्यारपत्र, विकास हक्क, खटला, लिस-पेंडन्स किंवा कोणतेही विश्वस्त संस्थे अंतर्गत फायदेशीर हक्क/ हितसंबंध, राईट ऑफ प्रिस्क्रीप्शन किंवा प्रिएम्प्शन किंवा कोणत्याही स्वरुपाचे करार अंतर्गत किंवा इतर प्रकार किंवा इतर मनोरचना किंवा कोणत्याही हुकूम, मनाई हुकूम, संलग्नक हुकूम किंवा कोणत्याही न्यायालय, न्यायाधिकरण किंवा प्राधिकरण किंवा लवादच्या हुकूम किंवा आदेश किंवा अन्यथा असेल त्यांनी लेखी स्वरुपात त्याची सूचना सहाय्यक कागदोपत्रांसह निम्नस्वाक्षरीकारांना त्यांचे कार्यालय **१०११-१०१५ रहेजा चेंबर्स, १०वा मजला, नरीमन पॉइंट, मुंबई - ४०० ०२१** किंवा इमेलद्वारे **sirisha_sampat@sngpartners.in** येथे ह्या सूचना प्रसिध्द झाल्यापासून **१४ (चौदा) दिवसांच्या** आत सूचित करावे, अन्यथा, सर्व किंवा कोणतेही कथित दावे/आक्षेप, हितसंबंध किंवा मागणी सोडून देण्यात आले आहेत, वापरात नाहीत, त्याग केले आहेत, सोडले गेले आहे असे मानले जाईल आणि आमचे अशिल प्रस्तावित व्यवहार करिता पुढे जाईल.

**येथे उपरोक्त उल्लेखित परिशिष्ट**

("सदर जमिनी" चे वर्णन)

जमिनीचे सर्व तुकडे आणि हिस्से मोजमाप ४२.३१ आर्स समतुल्य ४३२१ चौरस मीटर्स जे मोठ्या जमीन ज्याचे गट क्र. १६/६/२ एकूण मोजमाप ६९ आर्स चे भाग मौजे फुफादेवी पाडा, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड आणि चतु:सीमा खालील प्रमाणे:

उत्तरेकडे: प्लॉट ज्याचे क्र. १६/७
दक्षिणेकडे: प्लॉट ज्याचे क्र. १६/९ए
पश्चिमेकडे: प्लॉट ज्याचे क्र. १६/६ (भाग)
पूर्वीकडे: प्लॉट ज्याचे क्र. १६/६ (भाग)

१० डिसेंबर, २०२४ रोजी दिनांकित.

**एसएनजी ॲण्ड पार्टनर्स** करिता
सही/-
सिरिषा वी. संपत
भागीदार
ॲडव्होकेटर्स ॲण्ड सॉलिसिटर्स

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीने असे कळविण्यात येते की, माझ्या अशिलांनी मौजे-धोंडखार तर्फे उमटे, ता. रोहा जि. रायगड येथील श्री. मधुकर झिटू म्हात्रे, रा. धोंडखार तर्फे उमटे, ता. रोहा, जि. रायगड यांच्या मालकीची खालील वर्णनाची जमीन मिळकत खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| धोंडखार तर्फे उमटे, ता. रोहा, जि. रायगड | ७४ | जिरायत ०-५५-०० पो.ख. ०-१०-४० एकूण ०-६६-३० | ५.९५ |

तरी वर वर्णन केलेली मिळकत विद्यमान मालकांचे ताबेकब्जा वहिवाटीत, निर्वेध, बोजाविरहीत, विकण्यायोग्य असल्याची हमी विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिली आहे. तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही कसल्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास अथवा त्यांनी या व्यवहारास हरकत असल्यास आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ०७ दिवसांचे आत माझेकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा संदर्भित मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ०९/१२/२०२४

सही/-
**ॲड. नितेश पी. ठाकूर**
मो. ८९८३४५८३६०

(कार्यालयीन पत्ता : ठाकूर अँड असोसिएटस ए-२०३, वसंतपुष्प को.ऑप.हौ. सो.लि. अलिबाग-रायगड

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे मुळगाव तर्फे वासरे, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेल्या जमीन मिळकती आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालकांकडून खरेदी घेण्याचे ठरविले आहे. सदर जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे मुळगाव तर्फे वासरे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकती**

| जमीन मालकाचे नाव | सर्व्हे नं./ हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| अरूणा अजय मोदी | ५८/४ | ०-०८-०० | ०-०८ |
| अरूणा अजय मोदी नयनिका सुनिल नायक | ५९/१ | ०-२९-३० | ०-९४ |
| सिद्धार्थ अजय मोदी | ५९/४ | ०-०५-०० | ०-१९ |

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ, वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुलअखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत खालील सही करणार यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. १०-१२-२०२४

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**किशोर तुकाराम देशमुख**
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो. ९४२२०६८७५५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार १) श्री. समीर सफरअली विराणी, २) श्री. झहीर अब्बास रजबअली लाखानी, ३) श्री. असदअली शब्बीरअली मुकादम यांनी खालील वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे मालक १) श्री. रविंद्र जनार्दन गंध्रे, २) श्री. राजन जनार्दन गंध्रे, ३) श्री. नरेंद्र जनार्दन गंध्रे, ४) श्री. संजय जनार्दन गंध्रे, ५) श्री. विजय जनार्दन गंध्रे यांचेकडून विकत घेण्याचे ठरवले आहे.

**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे ममदापूर, ता. कर्जत, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|
| ६७ | १/अ/१ | ३-२०-०० पो.ख. १-५२-०० एकूण ४-७२-०० | ४ | ९४ |
| | | ................ पैकी खरेदी देणार यांच्या हिश्श्याचे ३-१४-०० पो.ख. १-५२-०० एकूण ४-६६-०० | ४ | ८५ |

**४-६६-०० हे.आर.चौ.मी. पैकी, खरेदी घेण्याचे ठरलेले क्षेत्र ०-४०-०० हे.आर.चौ.मी.**

सबब सदर बाबत कोणाचीही दान, गहाण, साठेकरार, खरेदीखत, ताबा, कब्जा, वहिवाट, बक्षीसपत्र, लिज अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांच्या आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांच्याकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत दाखल करावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार केला जाईल. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक :- ०८/१२/२०२४
पत्ता : १०१, १०२, १०३, बुरहान प्लाझा,
दिलकप कॉलेज रोड, ममदापूर, नेरळ,
ता. कर्जत, जि. रायगड- ४१०१०१
मो. ९०११५५५८०१

**ॲड. अल्ताफ लियाकत डोंगरे**
(वकिल उच्च न्यायालय)

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल/मालक यांनी खालील नमूद केलेल्या वर्णनाच्या मौजे आवास, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील मिळकती विकण्यासंदर्भात खरेदीदारांशी बोलणी चालू केली असून सदर मिळकतीचा विक्री व्यवहार करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. हिस्सा नं. | क्षेत्रफळ (हे.आर) | आकार (रू.पै.) | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| आवास ता. अलिबाग | २७९/१ | ०-२०-०० पो.ख.०-०२-०० एकूण ०-२२-०० | ३.४७ | श्री.मिलिंद मधुसुदन घाणेकर |
| आवास ता. अलिबाग | २७९/२ | ०-२१-५० पो.ख.०-०२-०० एकूण ०-२३-५० | ३.४७ | सौ.अनिता अंकुश चव्हाण |

सदरच्या मिळकती निर्वेध असल्याबाबत माझ्या अशिलांनी/मालकांनी हवाला दिलेला आहे. तरी सदरहू वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क असा अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगरी तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसाच्या आत खाली सही करणार यांच्याकडे ४०१/ए, अमरनगर को.ऑप.हौ.सोसायटी लि, सास्मीरा मार्ग, वरळी बस डेपोच्या मागे, वरळी मुंबई ४०००३० येथे लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्र पुराव्यांसहित सादर करावी.

सदरहू मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहित धरून माझे अशिल/मालक आलेल्या खरेदीदाराबरोबर व्यवहार पूर्ण करतील व मागाहून कुणाचाही तक्रार अगर हरकत आल्यास ती विचारात घेतली जाणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

स्थळ : अलिबाग
दिनांक : १०/१२/२०२४

सही/-
**सौ.नयना संकेत ठाकूर**
वकील

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की मौजे मोहिली तर्फे वासरे ता.कर्जत जि.रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे आशिलांनी कब्जेदारांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

**मौजे. मोहिली तर्फे वासरे ता. कर्जत जि. रायगड येथील बिनशेती जमिन मिळकत**

| जमिन मालकाचे नाव | स.नं./ हिस्सा नं | क्षेत्र. (चौ.मी) | आकार (रू.पै ) |
|---|---|---|---|
| १. रमेश नारायण विचारे<br>२. राकेश रमेश विचारे<br>३. सायली सुबोध सालवेकर | ३९ | १५.७०.०० | ३२.०० |

तरी सदर मिळकतीवर कोणाचाही गहाण, दान, लिज, विक्रीचा करार, पोटगी, चार्ज, बक्षिस, वहिवाट, इजमेंट, बोजा, तारण वारसा, ट्रस्ट, कुळहक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी आपली लेखी हरकत सकृतदर्शनी पुराव्यासह खाली नमुद ॲडव्हाकेट यांचेकडे सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन २१ (एकवीस) दिवसाचे आत नोंदवावी. वरील मुदतीत कोणाचीही काहीही हरकत न आल्यास सदरची मिळकत ही निर्वेध बोजारहीत असल्याचे गृहीत धरून आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. ०९/१२/२०२४
मो.नं.८००७५३७६५६

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**ॲड.महेश कमलाकर थोरवे**
रा.कर्जत ता.कर्जत

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की, मौजे चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या बिनशेती मिळकतीचे विद्यमान मालक श्री. शिवलाल वालजी रायका रा. चेंढरे, ता.अलिबाग, जि. रायगड यांच्या नावे असून त्यांच्या हिश्श्याच्या ०-०१-९६ आर.चौ.मी. पैकी ०-००-९८ आर.चौ.मी. मिळकत माझे अशील यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाचा साठेकरार विद्यमान मालकांबरोबर झालेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र.व उपविभाग क्र. | क्षेत्र (आर.चौ.मी.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| चेंढरे ता.अलिबाग | ८/४/ड/४ | ३-९२-०० | ३९.२० |

वर नमूद बिनशेती मिळकतीपैकी श्री. शिवलाल वालजी रायका यांच्या हिश्श्याच्या ०-०१-९६ आर.चौ.मी. पैकी ०-००-९८आर.चौ.मी. क्षेत्राची मिळकत

सबब सदर मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी त्यांच्याजवळ असलेले सर्व मालकीहक्का संदर्भात सर्व कागदपत्रे दाखवून खातरजमा करुन दिलेली आहे. या उपरही सदर मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, बयाणा पावती, साठेकरार, खरेदीखत, बँक गहाण सरकारी व पतसंस्था, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहेत असे गृहीत धरून माझे अशील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील, व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : ९/१२/२०२४

सही / -
**ॲड. एम. एम. पारकर**
**जिल्हा न्यायालय, अलिबाग-रायगड**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक श्रीमती जयश्री नितीन जैन रा.अभिलाषा बंगला, प्लॉट क्र. एल/ए, आय.टी.आय कॉलेजजवळ, श्रीबाग नं.२, अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड यांच्या खद्द मालकीची व त्यांचे कब्जातील खालील वर्णन केलेली मिळकत आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**मिळकतीचे वर्णन**

मौजे अलिबाग, ता.अलिबाग जि.रायगड येथील सि.स.नं ५६०, क्षेत्र ९४.४६ चौ.मी. सत्ताप्रकार-क व या मिळकतीमधील नगरपालिका घर क्र.७३८अ व सि.स.नं.५६० मधील असणाऱ्या शौचालय व विहिरीसाठी जाणाऱ्या मार्गाच्या हक्कासह मिळकतीबाबत.

तरी सदरहू मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, ताबा कब्जा, भाडेपट्टा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकतीबाबत कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे असे गृहीत धरून माझे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधीतांनी नोंद घ्यावी.

दिनांक : १०/१२/२०२४

सही/-
**ॲड.विवेक रमेश साळवी**
शॉप नं.५, दुय्यम निबंधक कार्यालयासमोर
अलिबाग, ता.अलिबाग जि.रायगड

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे खिडकी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील नमूद मिळकत सदर मिळकतीचे मालक श्री. अमित काशिनाथ पाटील व सुरज काशिनाथ म्हात्रे यांजकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे.

संदर्भित जमीन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिला आहे. याउपरही संदर्भित, मिळकतीत अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १४ दिवसांचे अवधीत माझेकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास आमचे अशिल त्यांचा संदर्भित मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे खिडकी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील भूमापन क्रमांक ९/५ एकूण क्षेत्र ०-३०-३० हे.आर. आकार ४.३१ ही मिळकत

अलिबाग
दिनांक : ९.१२.२०२४

सही/-
**ॲड. श्री. प्रसाद विजय वर्तक**
जिल्हा न्यायालय
अलिबाग-रायगड

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे-बेलकडे, ता. अलिबाग, जि. रायगड, गट नं. ४९९, क्षेत्र ०-१८-५०; पो.ख. ०-०४-१० हे.आर; एकूण क्षेत्र ०-२२-६० हे.आर. आकार ५.१२ रू.पै. ही मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक १) रमेश सदानंद नाईक २) प्रणिता सदानंद नाईक ३) निलीमा नरोत्तम नाईक ४) महेश नरोत्तम नाईक ५) हरेश नरोत्तम नाईक यांच्याकडून आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग
तारीख : ०९/१२/२०२४

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता : श्रुती सारंग को.ऑप.हौ.सो; ए विंग,
रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राह्मण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड

## जाहीर निविदा

**ग्रुप ग्रामपंचायत मुठवली तर्फे तळे**
**ता. माणगाव, जि. रायगड**

**दिनांक - ०९/१२/२०२४**

**ग्रुप ग्रामपंचायत मुठवली तर्फे तळे, ता.माणगाव, जि. रायगड**
**सन २०२३-२४ अंतर्गत १५ वा वित्त आयोग विकास कामांची व साहित्यांची निविदा खालीलप्रमाणे**

| अ. क्र | कामाचे नाव/साहित्याचे नाव | प्रशासकीय मान्यता अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा फी | इसारा रक्कम | ग्रा.प.कडे निविदा सादर करणेचा दिनांक | निविदा उघडण्याचा दिनांक | कामाची मुदत | योजनेचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | उमरोली-दिवाळी येथील मंगेश दळवी ते अशोक दळवी यांचे घरापर्यंत गटार बांधणे. | ५१२३५/- | २००/- | ५१२/- | १९/१२/२०२४ सायं ०५:०० वा | २०/१२/२०२४ सकाळी ११.३० वा | ३१/३/२०२५ | १५ वा वित्त आयोग |
| २. | मागासवर्गीय वस्तीमध्ये भांडी खरेदी करणे | ७००००/-/- | २००/- | ७००/- | १९/१२/२०२४ सायं ०५:०० वा | २०/१२/२०२४ सकाळी ११.३० वा | ३१/३/२०२५ | ग्रामनिधी |
| ३. | उमरोली-दिवाळी बौद्धवाडी येथील विनिता गायकवाड ते मिलिंद साळवी यांचे घरापर्यंत रस्ता करणे | १०००००/- | २००/- | १०००/- | १९/१२/२०२४ सायं ०५:०० वा | २०/१२/२०२४ सकाळी ११.३० वा | ३१/३/२०२५ | १५ वा वित्त आयोग |
| ४. | निवी बौद्धवाडी येथे अंतर्गत रस्ता करणे | ५००००/- | २००/- | ५००/- | १९/१२/२०२४ सायं ०५:०० वा | २०/१२/२०२४ सकाळी ११.३० वा | ३१/३/२०२५ | १५ वा वित्त आयोग |

**अटी व शर्ती :**

१.सदर निविदा बाबत अधिक माहिती ग्रामपंचायत मुठवली/तळे येथे कार्यालयीन वेळेत मिळेल.
२.निविदा मंजूर व नामंजूर करण्याचा अधिकार हा सरपंच तथा ग्रामपंचायत मुठवली/तळे यांचा राहील. निविदा नामंजूर झाल्यास कोणताही पत्र व्यवहार केला जाणार नाही.
३.उपलब्ध निधीनुसार देयके आदा करणेत येईल.
४.निविदा सरपंच तथा ग्रामपंचायत मुठवली/तळे,ता.माणगाव, जि. रायगड या पत्त्यावर पाठविण्यात याव्यात. निविदा बंद लिफाफ्यात पाठविण्यात याव्यात.
५. देयकातुन शासन निर्णयाप्रमाणे कपाती केल्या जातील.
६. अपूर्ण व उशिरा पोहोचलेल्या निविदांचा विचार ग्रामपंचायत करणार नाही.
७. ठेकेदारांनी वर्क आर्डर दिलेल्या तारखेपासून मुदतीत काम पूर्ण न केल्यास कोणतेही कल्पना न देता ठेका रद्द करण्यात येईल.

सही/-
**ग्रामसेवक**
**ग्रुप ग्रामपंचायत मुठवली तर्फे तळे**
**ता.माणगाव जि.रायगड**

सही/-
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत मुठवली तर्फे तळे**
**ता.माणगाव जि.रायगड**

## निवडक

### पंतच्या रिटेंशनबाबत खुलासा

**नवी दिल्ली :** आयपीएलच्या लिलावात ऋषभ पंतच्या बोलीने इतिहास घडवला. लखनौ संघाने त्याला तब्बल २७ कोटी रुपयांची बोली लावत संघात घेतले. तथापि, पंत गेली अनेक वर्षे दिल्लीकडून खेळला होता. दरम्यान, दिल्लीचे मालक पार्थ जिंदाल यांनी स्पष्ट केले होते की, पैसे हा पंतला रिटेन न करण्यामागील प्रमुख मुद्दा नव्हता. पंतनेही त्याच्या रिटेंशनबाबत पैसे हा मुद्दा नसल्याचे स्पष्ट केले होते. पंतला वाटत होते त्याने एकदा मार्केटचा अनुभव घ्यावा, त्याला मोठी किंमत मिळू शकते.

### कारवाई होण्याची शक्यता

**ॲडलेड :** भारत-ऑस्ट्रेलिया संघात ॲडलेडला झालेला कसोटी सामना मोहम्मद सिराज आणि ट्रेविस हेड यांच्यात वाद झाले. सामन्यात दुसऱ्या दिवशी हेड दीडशे धावांच्या जवळ असताना त्याला सिराजने बोल्ड केले. त्यावेळी सिराजने सेलीब्रेशन केले. याचदरम्यान हेडही त्याला काहीतरी बोलला. सिराजनेही त्याला चिडून सेंडऑफ दिला. यानंतर तिसऱ्या दिवशी सिराज आणि हेडने एकमेकांशी बोलून वाद मिटवले. मात्र, या प्रकरणामुळे दोघांवरही आयसीसीकडून कारवाई होण्याची शक्यता आहे.

### 'कांबळीची वागणूक कारणीभूत'

**नवी दिल्ली :** भारताचे माजी क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर आणि विनोद कांबळी यांची मैत्री जगजाहीर आहे. हे दोघेही लहानपणापासूनचे मित्र असून शालेय क्रिकेटपासून एकत्र खेळले आहेत. सचिनच्या निवृत्तीच्यावेळीही कांबळीची गैरहेजेरी अनेकांना जाणवली होती. दरम्यान, त्यांच्या मैत्रीला त्याआधीही ९० च्या दशकातही धक्का लागला होता, यामागे कांबळीची वागणूक कारणीभूत ठरली होती. याबाबत संजय मांजरेकरांनी तीन वर्षांपूर्वी खुलासा केला होता.

### 'बुमराहला सर्व सामने खेळवा'

**नवी दिल्ली :** सुनिल गावसकर म्हणाले की, बुमराहला सर्व ५ सामने खेळवा. भारतासाठी खेळत आहात, तर वर्कलोड वैगरे गोष्टींचा प्रश्नच उद्भवत नाही. जोपर्यंत दुखापत नाही, तोपर्यंत सर्व ५ सामने खेळायला हवेत. ॲडलेड सामना अडीच दिवसातच संपला आहे. त्यामुळे बुमराहला ५ दिवसांची विश्रांती मिळत आहे. जर त्याला काही समस्या असेल, काही दुखापत असेल तर ठीक आहे. जर त्याला सर्व ५ सामने खेळवले नाहीत, तर सर्व २० बळी घेण्याची शक्यताही कमी करून घेत आहात.

### भारताची धडधड वाढली

**गकेबरहा :** दक्षिण आफ्रिकेने श्रीलंकेविरूद्धचा दुसरा सामना जिंकून भारतीय संघाची धडधड वाढवली आहे. दुसऱ्या कसोटीत आफ्रिकेने श्रीलंकेवर १०९ धावांनी मात केली आणि मालिकेतील दोन्ही सामने जिंकून मालिका आपल्या नावे केली आहे. आफ्रिकेने या विजयानंतर जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या क्रमवारीत ऑस्ट्रेलियाला मागे टाकत अव्वल स्थान गाठले आहे. त्यामुळे तिसऱ्या क्रमांकावरील भारतासाठी हा मोठ्ठा धक्का मानला जात आहे.

## गुकेशचे विश्वविजेतेपदाकडे दमदार पाऊल

# गतविजेत्या डिंगवर सनसनाटी विजय

**। सिंगापूर । वृत्तसंस्था ।**

डी. गुकेश याने जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद लढतीतील ११व्या फेरीत सनसनाटी विजयाची नोंद केली आहे. या विजयासह त्याने पहिल्यांदाच आघाडी मिळवली आहे. या प्रतिष्ठेच्या लढतीतील तीन फेऱ्या शिल्लक असून, गुकेश सहा गुणांसह आघाडीवर आहे. गतविजेता चीनचा डिंग लिरेन याच्याकडे पाच गुण आहेत.



जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद लढतीतील ११वा डाव रिव्हर्स्ड ब्लुमेन्फेल्ड ओपनिंगने सुरू झाला. यावेळी गुकेशने डिंगच्या फ्रेंच बचावाचा सामना करणे टाळले. डिंगला हे ओपनिंग अनपेक्षित असावे. कारण त्याने पहिल्या पाच खेळी करायला ५० मिनिटे घेतली होती. यानंतर वेळ भरून काढण्यासाठी त्याने पटापट खेळी करायला सुरुवात केली तेव्हा गुकेशचा विश्वविजेतेपदाच्या लढतीतील अनुभव दिसून आला. स्वतःकडे भरपूर वेळ असताना त्यानेही जरूर नसताना पटापट खेळी केल्या. त्यामुळे त्याच्या हातून वजिराच्या बाजूचे एक प्यादे पुढे ढकलण्याची घोडचूक झाली. परिस्थिती सावरण्यासाठी गुकेशनेही ५० मिनिटे विचार केला. दोन्ही खेळाडू वेळेच्या दबावाखाली आले. त्यांच्या हातून सर्वोत्कृष्ट खेळी झाल्या नाहीत. गुकेशने स्वतःला सावरत वजिराच्या बाजूचे प्यादे पुढे ढकलले आणि एक प्यादे देऊन आपले सर्व मोहरे आक्रमक ठिकाणी आणून ठेवले.

डिंगने बचाव करण्याचा आटोकाट प्रयत्न केला, परंतु त्याने गुकेशची एक चाल बघितली नाही आणि एक मोहरा गमावला. डिंगने लगेचच आपला पराभव मान्य केला. या विजयामुळे गुकेशने एक दमदार पाऊल विश्वविजेतेपदाकडे टाकले आहे. डिंगचा प्रत्येक डाव बरोबरीत सोडवून टाय ब्रेकमध्ये जाण्याचा मनसुबा गुकेश फोल ठरविणार असे वाटत आहे. अर्थात गेल्या विश्वविजेतेपदाच्या लढतीत रशियन खेळाडू नेपोमिनीआची विरुद्ध मागे पडल्यावर डिंगने लगेच पुढचा डाव जिंकून लढतीत बरोबरी साधली होती. तसे त्याला पुन्हा करू न देण्याची किमया गुकेशने आता उरलेल्या तीन डावांत करण्याची शक्यता आहे.

उरलेल्या तीनही डावांत जरी बरोबरी झाली तरी गुकेश ही लढत आरामात जिंकेल. तीनपैकी दोन डावांत पांढऱ्या मोहऱ्या घेऊन खेळताना डिंग जिंकायची पराकाष्ठा करणार हे निश्चितच आहे. सध्या तरी लढतीचे पारडे स्वतःच्या बाजूने झुकविण्यात गुकेशला यश मिळाले आहे.

- **प्रतिष्ठेच्या लढतीत पहिल्यांदाच सहा गुणांसह आघाडीवर**
- **डिन लिरेन पाच गुणांवर**

**जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद लढतीतील अकराव्या फेरीत भारताच्या डी. गुकेशने सनसनाटी विजयासह पहिल्यांदाच आघाडी मिळवली आहे. या सामन्यात वेळ भरून काढण्यासाठी दोघांनीही पटापट खेळी केल्या. त्यामुळे वेळेच्या दबाबाखाली खेळत असताना त्यांच्या हातून सर्वोत्कृष्ट खेळी होत नव्हत्या. अखेर गुकेशची एक चाल डिंगकडून दुर्लक्षित राहिली आणि सामना गमावला.**

# नऊ वर्षीय आरीतने घडवला इतिहास

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतामध्ये बुद्धिबळ खेळाला गेल्या काही वर्षात सुगीचे दिवस आले आहेत. गेल्या अनेक वर्षात युवा भारतीय खेळाडूंनी जगात डंका वाजवला आहे. आता दिल्लीतील ९ वर्षीय बुद्धिबळपटू आरीत कपिल याने मोठा पराक्रम केला आहे. त्याने चक्क एका ग्रँडमास्टरला पराभूत केले आहे. त्यामुळे तो ग्रँडमास्टरला पराभूत करणारा सर्वात कमी वयाचा भारतीय ठरला आहे.



आरीतने केआयआयटी आंतरराष्ट्रीय ओपन टूर्नामेंटमध्ये त्याने रविवारी (दि.८) अमेरिकेच्या ग्रँडमास्टर रुसेट झियात्दिनोव यांना ९ व्या आणि अखेरच्या फेरीत पराभूत केले आहे. आरीतने जेव्हा रुसेट झियात्दिनोव यांना पराभूत केले, तेव्हा त्याचे वय ९ वर्षे २ महिने आणि १८ दिवस इतके होते. त्यामुळे तो ग्रँडमास्टरला पराभूत करणारा भारताचा सर्वात युवा, तर जगातील तिसऱ्या क्रमांकाचा सर्वात युवा खेळाडू ठरला आहे. ग्रँडमास्टरला सर्वात कमी वयात पराभूत करण्याचा विश्वविक्रम भारतीय वंशाच्या सिंगापूरमधील अश्वथ कौशिकच्या नावावर आहे. त्याने यावर्षाच्या सुरुवातीलाच ८ वर्षे २ महिने वय असताना पोलंडचा ग्रँडमास्टर जेसेक स्टुपा याला पराभूत कले होते. दुसऱ्या क्रमांकावर सर्बियाचा लिओनीद इवानोविक आहे. त्याने ८ वर्षे ११ महिने वय असताना ग्रँडमास्टरला पराभूत केलं होते.

दरम्यान, ६६ वर्षीय झियात्दिनोव यांनी आरीतविरुद्ध अनुभव वापरत खेळण्याचा प्रयत्न केला होता. पण आरीतने पांढऱ्या मोहऱ्यांसह संयमाने खेळ केला.

# दिव्यांग क्रिकेटपटूंना मदत




**। पनवेल । वार्ताहर ।**

सिंधुदुर्ग जिल्हा रहिवासी हितवर्धक संघाने सिंधुदुर्गातील दिव्यांग क्रिकेटपटूंना मदतीचा हात दिला आहे. दरम्यान, राष्ट्रीय दिव्यांग महिला क्रिकेट स्पर्धेसाठी सिंधुदुर्गातुन महाराष्ट्राच्या संघात निवडण्यात आलेल्या दिव्यांग खेळाडूंचे सिंधुदुर्ग जिल्हा रहिवासी हितवर्धक संघातर्फे पनवेल स्टेशनवर स्वागत करून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. मंडळाच्या सदस्या संध्या मिराशी यांनी दिवंगत जेष्ठ सदस्य सूर्यकांत मिराशी यांच्या स्मरणार्थ भोपाळ येथे क्रिकेट सामने खेळण्यासाठी जाणाऱ्या या खेळाडूंना प्रवास खर्चासाठी १५ हजार रुपये दिले होते, सोबत त्यांना मंडळाच्या सदस्यांतर्फे भेट वस्तू देण्यात आल्या. पनवेल स्टेशनवर खेळाडूंचे स्वागत करण्यासाठी मनोहर मराळ, दीपक तावडे, प्रदीप रावले, बाबाजी नेरुरकर, प्रसन्न कुमार घागरे, मंगेश सावंत, स्वप्ना राणे तसेच इनरव्हीलच्या अध्यक्षा शुभदा भगत, सचिव शुभांगी बहिरा ही सर्व मंडळी जमली होती.

# क्रीडा स्पर्धा उद्‌घाटन सोहळा



**। तळा । प्रतिनिधी ।**

एस.एस. निकम इंग्लिश स्कूल तळाच्या वार्षिक क्रीडा स्पर्धेचे उद्‌घाटन सोमवारी (दि.९) बाळूभाऊ ढेबे यांच्या हस्ते करण्यात आले.

मुख्याध्यापक राजेश आगिवले यांनी आपल्या प्रास्ताविकांत शाळेच्या क्रीडा विभागाचा आढावा घेतल्यानंतर शाळेतील विद्यार्थी तालुका व जिल्हा स्तरीय क्रीडा स्पर्धेत उत्तम यश प्राप्त करीत असून वेगवेगळ्या क्रीडा स्पर्धेत शाळेचे नाव उज्वल केलेले आहेत. तसेच, शालेय उपक्रमांत विज्ञान प्रदर्शन शैक्षणिक अभ्यासक्रम यासह समाज उपयुक्त उपक्रमांत शाळेतील विद्यार्थी नेहमीच अग्रेसर असतात. त्यासाठी चेअरमन विक्रांत सप्रे व शाळा व्यवस्थापन समितीचे मोलाचे सहकार्य लाभले, असे त्यांनी सांगितले.

# पाटणाचा जयपूरवर रोमहर्षक विजय

**। बालेवाडी । प्रतिनिधी ।**

पाटणा पायरेट्स संघाने सहा गुणांच्या पिछाडीवरून उत्तरार्धात सामन्याला कलाटणी दिली आणि जयपूर पिंक पँथर्स संघावर ३८-२८ असा रोमहर्षक विजय नोंदविला आहे. श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल म्हाळुंगे बालेवाडी येथील बॅडमिंटन हॉलमध्ये सुरू असलेल्या प्रो कबड्डी स्पर्धेत मध्यंतराला जयपूर संघाकडे १८-१२ अशी आघाडी होती.



सुरुवातीपासूनच दोन्ही संघांनी सावधच पवित्रा घेतला होता. त्यामुळे दहाव्या मिनिटाला ५-५ अशी बरोबरी होती. तरीही दोन्ही संघांचे आघाडी मिळवण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू होते. हळूहळू जयपूर संघाने उत्कृष्ट अष्टपैलू खेळाच्या जोरावर आघाडी घेत वाढवण्याचा प्रयत्न केला आणि त्यामध्ये त्यांना यश आले. मध्यंतरापर्यंत शेवटच्या मिनिटात त्यांनी पहिला लोण नोंदवत आपली बाजू वरचढ केली. उत्तरार्धात सुरुवातीपासूनच पाटणा संघाच्या खेळाडूंनी जयपूर संघाची आघाडी कमी करण्याचा प्रयत्न केला. उत्तरार्धानंतर पाचव्या मिनिटालाच त्यांनी जयपूर संघावर लोण चढविला आणि आघाडी घेतली. ३०व्या मिनिटाला त्यांच्याकडे २४-२० अशी आघाडी होती. पुन्हा आणखी एक लोण चढवत त्यांनी आपली बाजू बळकट केली.

शेवटची पाच मिनिटे बाकी असताना पाटणा संघाकडे ३२-२४ अशी आघाडी होती. पाटणा संघाकडून देवांक (१४ गुण) व अयान (६ गुण) यांनी खोलवर चढाया केल्या, तर अंकित (५ गुण) याने उत्कृष्ट पकडी केल्या. जयपूर संघाकडून अर्जुन देशवाल (७ गुण), नीरज नरवाल (५ गुण) यांनी चढाईत, तर अंकुश राठी (३ गुण) याने पकडीत चांगली लढत दिली.

# मोहम्मद शमीची उल्लेखनीय कामगिरी

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

मोहम्मद शमी शेवटच्या दोन कसोटी सामन्यांसाठी उपस्थित रहाण्याची शक्यता आहे. शमी सध्या सय्यद मुश्ताक अली स्पर्धा खेळत असून त्याच्यावर मेडिकल प्रशिक्षक लक्ष ठेवून आहेत. त्याने चंदीगड विरूद्धच्या सामन्यात दमदार फकटेबाजी केली आहे. घोट्याच्या शस्त्रक्रियेनंतर शमी प्रथमच रणजी ट्रॉफी स्पर्धेत मैदानावर उतरला होता. त्यानंतर त्याला पुन्हा पायाची समस्स्या उद्धवली होती. परंतु, सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी स्पर्धेत शमी उल्लेखनीय कामगिरी करताना पाहायला मिळत आहे. त्याने चंदीगडविरूद्ध फलंदाजी करताना जलद खेळी केली. शमीने ३२ धावांची नाबाद खेळी केली.

# सहकार नगर स्मृती चषकाचा मानकरी



**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

खालापूर तालुक्यातील ग्रामीण टेनिस सामन्यांना सुरूवात झाल्याने ग्रामीण क्रिकेट खेळाडूंमध्ये नवचैतन्य पसरले आहे. ग्रामीण क्रिकेट खेळाडूंमधील दडलेल्या खिलाडू वृत्तीला वाव मिळावा या उद्देशाने कै. रामकृष्ण पालांडे व लहू अर्जून पिंगळे यांच्या स्मरणार्थ अविनाश पालांडे यांनी श्री दत्त क्रिकेट संघ घोडीवली, कांढरोली आणि मित्र परिवार यांच्यावतीने क्रिकेट चषकाचे आयोजन करण्यात आले होते.

चार दिवसीय सामन्यांमध्ये प्रथम क्रमांक सहकार नगर, द्वितीय धामणी, तृतीय माडप तर चतुर्थ क्रमांक घोडीवली संघाने पटकावल्याने या सर्व विजयी संघाना घोडीवली ग्रामस्थ व प्रमुख अथितींच्या हस्ते रोख रक्कम आणि आकर्षण चषक देऊन गौरवण्यात आले. तसेच, उकृष्ट गोलंदाज, उकृष्ट फलंदाज, मालिकावीर खेळाडूंना आकर्षक चषक देऊन गौरवण्यात आले. या क्रिकेट चषकाचे आयोजन अविनाश पालांडे, अतुल पिंगळे, सोहम पिंगळे, रोहिदास पिंगळे, रवी भोपी, अनिल, समीर पवार, बाबू पारंगे, प्रशांत पिंगळे, सुभाष दुधावडे, अरुण पिंगळे, संजय सोलखी यांनी केले होते.

# वहाळ गावचा ऋषिकेश नाईकांची निवृत्ती

**। रायगड । क्रिडा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा हा संपुर्ण विश्वात टेनिसबॉल क्रिकेटसाठी खूप प्रसिद्ध आहे. गेल्यावर्षी एका सर्वे नुसार रायगड जिल्ह्यात लहान मोठ्या जवळपास २ हजार टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. करोडो रुपयांची उलाढाल या टेनिस बॉल क्रिकेटच्या माध्यमातुन जिल्ह्यात दरवर्षी होत असते. याच टेनिस बॉल क्रिकेटमध्ये रायगड जिल्ह्यासह परदेशात सुद्धा नावलौकिक असलेला पनवेल तालुक्यातील वहाळ गावचा सुपरस्टार खेळाडू ऋषिकेश कुमार नाईक यांने खारघर येथे झालेल्या रायगड प्रीमिअर लीग टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेच्या वेळी आपली निवृत्ती जाहीर केली आहे.



ऋषी नाईक (३७) हा सिव्हिल इंजिनिअर उच्चशिक्षित खेळाडू असून सिडकोमध्ये सहाय्यक कार्यकारी अभियंता पदावर कार्यरत आहे. आपल्या तडाखेबंद फलंदाजी मुळे सर्वत्र प्रसिद्ध असणाऱ्या ऋषी नाईक याने आतापर्यंत अनेक स्पर्धेत सामनावीर, उत्कृष्ट फलंदाज व मलिकावीराचे पन्नास पेक्षा जास्ती किताब पटकावले आहेत. त्याच्या नावावर आतापर्यंत ४ दुचाकी व मालिकावीराची पारितोषिके आहेत. आपल्या वहाळ गावच्या व व्यावसायिक संघासाठी त्यांनी २२ वर्ष योगदान दिले आहे.

निवृत्ती जाहीर केल्याच्या नंतर माध्यमांशी बोलताना ऋषी नाईक खूप भाऊक झाला होता. त्याने सर्व सहखेळाडू, प्रेक्षक, हितचिंतकांनी दिलेल्या आजवरच्या प्रेमाबद्दल आभार मानले. या पुढे आपण फक्त व्यवसायिक लेदर बॉल क्रिकेट खेळणार असून आपले योगदान रायगड जिल्हा क्रिकेट असो.च्या युवा व होतकरू खेळाडूंसाठी देणार असल्याचे नाईक याने सांगितले आहे.

- **तडाखेबंद फलंदाजीमुळे सर्वत्र प्रसिद्ध**
- **व्यावसायिक लेदर बॉल क्रिकेट खेळणार**

## जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा २०२४-२५

# चेंबूर, एसआयईएसची अंतिम फेरीत धडक

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

कांदिवलीतील दादोजी कोंडदेव क्रीडांगणावर जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. चेंबूर क्रीडा केंद्र व एसआयईएस यांनी या कबड्डी स्पर्धेत पूर्व विभाग किशोरी गटाच्या अंतिम फेरीत धडक दिली आहे. तर, अभिनव मंडळ व बालवीर स्पोर्टस् यांनी पूर्व विभाग किशोर गटाच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे.



चेंबूर क्रीडा केंद्राने किशोरी गटाच्या उपांत्य सामन्यात नवशक्ती स्पोर्टस्‌चा ३२-१३ असा सहज पराभव करीत अंतिम फेरी गाठली आहे. आक्रमक सुरुवात करीत चेंबुरने पूर्वार्धात २ लोण देत २१-०६ अशी आघाडी घेतली होती. उत्तरार्धात आणखी एक लोण देत सामना अगदीच एकतर्फी केला. दुसऱ्या किशोरी गटाच्या उपांत्य सामन्यात एसआयईएस संघाने हिड इंडियाचा ४१-०४ असा धुव्वा उडविला. एसआयईएसने पहिल्या डावात २१-०१ अशी भक्कम आघाडी घेत आर्धी लढाई जिंकली होती. दुसऱ्या डावात तोच जोश कायम राखत ३७ गुणांच्या मोठ्या फरकाने अंतिम फेरीत धडक दिली आहे.

किशोर गट पूर्व विभागाच्या उपउपांत्यपूर्व फेरीत अभिनव मंडळाने चेंबूर क्रीडावर ३४-२४ अशी मात करीत उपांत्यपूर्व फेरी गाठली आहे. विश्रांतीला लोण देत २९-०७ अशी आघाडी अभिनवने घेतली होती. विश्रांतीनंतर अभिनवने आणखी एक लोण देत आपला विजय निश्चित केला. दुसऱ्या किशोर गटाच्या सामन्यात उपांत्यपूर्व फेरी गाठताना बालवीर स्पोर्टस्‌ने महाशक्तीला ३३-११ असे नमविले. मध्यांतराला १६-०५ अशी आघाडी घेणाऱ्या बालवीरने नंतर देखील त्याच जोमाने खेळ करीत आपला विजय साकारला आहे.

कुमारी गटाच्या पूर्व विभागात स्वराज्य स्पोर्टस्‌ने आराध्य स्पोर्टस्‌चा २४-०४ असा सहज पराभव करीत चौथी फेरी गाठली आहे. पूर्वार्धात १७-०७ अशी स्वराज्यकडे आघाडी होती. प्रथम श्रेणी गटात स्वस्तिक मंडळाने सन्मित्र मंडळावर ३८-२१ असा विजय मिळवित तिसरी फेरी गाठली आहे.

# चिन्मय, सेनहोराची जेतेपदाला गवसणी

**। पुणे । प्रतिनिधी ।**

राज्य अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धेत पुरुष गटात चिन्मय सोमय्या (टीएसटी मुंबई) याने तर महिलांमध्ये सेनहोरा डीसूझा (मुंबई शहर) यांनी प्रथमच विजेतेपद पटकावले आहे. नाशिकच्या तनीषा कोटेचा हिने मुलींच्या १९ वर्षाखालील गटात सलग चौथ्यांदा विजेतेपद पटकावले तर मुलांमध्ये नाशिकच्याच कुशल चोपडा याने विजेतेपदाची हॅट्ट्रिक साधली आहे.



पुरुषांच्या अंतिम सामन्यात चौथ्या मानांकित चिन्मय सोमय्या याने ठाण्याच्या द्वितीय मानांकित दिपीत पाटील याच्यावर मात केली. अतिशय चुरशीने झालेला सामना त्याने ११-८, ११-६, १४-१२, ८-११, ७-११, ९-११, ११-८ असा जिंकला. सेनहोरा डीसूझा (मुंबई शहर) हिने अंतिम सामन्यात मनुश्री पाटील (टीएसटी मुंबई) हिचा पराभव केला. चुरशीने झालेला हा सामना तिने ७-११,१२-१०,१३-११,११-७, ११-८ असा जिंकला. सातव्या मानांकित तनीषाने अटीतटीने झालेली ही लढत ११-९, ११-६, ७-११, ८-११, ११-७, ८-११, १२-१० अशी जिंकली. दोन्ही खेळाडूंनी अष्टपैलू खेळ करीत चाहत्यांना खेळाचा आनंद मिळवून दिला. मुलांच्या अंतिम लढतीत कुशल याने अव्वल मानांकनास साजेसा खेळ करीत शर्वेय सामंत याच्यावर ११-७, ११-५, ११-८, ११-७ असा सफाईदार विजय मिळविला.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)